म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.
संग्रहालयाचा
अनुक्रम नं. | विभाग | क्रमांक
पुस्तकाचें नांव
लेखक
पुस्तकाची मराठी करूं नका.
REFBK-0006150

चन-माला



प्राध्यापक-शं. वा. दांडेकर, एम्. ए.

किंमत १। रुपया.

वाङ्मय-विवेचन-माला

वाद-विवेचन माला : :: पुष्प १० वें

# ईश्वरवाद

REFBK-0006150

लेखक
प्रो. शंकर वामन दांडेकर, एम्. ए.
रामनारायण रुइआ कॉलेज, माटुंगा

दा. क्र. ६१५०

प्रथमावृत्ति ] [ किंमत १॥ रु.

प्रकाशक :
यशवंत गोपाळ जोशी,
६२३।१५, सदाशिव पेठ, पुणे २

[ सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ]

संपादक
**पां. वा. गाडगीळ**

मुद्रक :
लक्ष्मण सखाराम केळकर,
जनार्दन सदाशिव लि. चा प्रेस
२९४ सदाशिव पेठ, पुणे नं. २

# लेखकाचे चार शब्द

**म्हणोनि विसुरा काय येणें ।**

**तो ईश्वरु कवळावा कवणें ।**

**जो आपुलें मान नेणें ।**

**आपणचि ॥** -- ज्ञानेश्वरी ५-१७४

ईश्वराविषयीं पुढील चार शब्द लोकांपुढें ठेवतांना मन चांचरत आहे. कारण एक तर ' आम्हां तया मूग एकें पांतीं ' असें म्हणून वेदाचा व आपला पत्ता तेथें कांहीं लागत नाहीं असें जेथें श्रीज्ञानदेव म्हणतात त्या ठिकाणीं माझ्या सारख्याचा काय पाड ! शिवाय तूर्त तर महायुद्धाचा वणवा पेटून त्यांत हजारों लोकांच्या पडणाऱ्या आहुतीबरोबर हजारों लोकांची जगन्नियंत्याविषयींची श्रद्धा जळून भस्म होत आहे ! अशा वेळीं ईश्वरासंबंधीं आग्रहानें कांहीं विधानें करणें धाष्ट्यांचेंच होईल.

अशी परिस्थिति असतांनासुद्धां हें पुस्तक प्रसिद्ध करीत आहोंत याचें कारण युद्धाचा प्रसंग हा एका दृष्टीनें श्रद्धा हलवणारा जरी असला तरी दुसऱ्या दृष्टीनें तो डोळे उघडणाराहि आहे. म्हणून जुनेच पण या विषयाला लागू असणारे विचार या पुस्तकांत ग्रथित केलेले आहेत.

प्रस्तुत लेखकाची ईश्वराच्या अस्तित्वावर पूर्ण श्रद्धा आहे. व त्याचें या विषयींचें मत वैदिक धर्माचें म्हणून जें मत दिलें आहे

त्यासारखेंच आहे. पण ईश्वराचें अस्तित्व सर्वांना पटवून आपणाला देतां येईल असें त्यास वाटत नाहीं. ग्रंथकर्त्याची या विषयींची भूमिका त्यानें एका प्रसंगीं आपल्या विद्यार्थ्यास दिलेल्या उत्तरानें स्पष्ट कळून येणारी आहे.

एकदां एक विद्यार्थी प्रस्तुत लेखकाकडे येऊन म्हणूं लागला कीं मला तुमच्या देखरेखीखालीं ईश्वरावर निबंध तयार करावयाचा आहे. त्यावर प्रस्तुत लेखकानें उत्तर दिलें कीं 'ठीक आहे.' त्यावर तो म्हणाला " अहो, पण मी ईश्वर नाहींच असें सिद्ध करणार आह ! " त्यावर प्रस्तुत लेखक म्हणाला, " ईश्वरानें मला त्याचें अस्तित्व प्रत्येकासमोर सिद्ध करण्याकरतां वकील पत्र दिलें नाहीं. त्याचें स्वतःचे खांदे इतके विशाल आहेत कीं तो असल्या टीकांचे भारे सहज सहन करील. तुझ्या पूर्वींहि ईश्वर नाहीं म्हणणारे होऊन गेले, हल्लीं आहेत, व होतीलहि. ईश्वर आपली काळजी घेण्यास समर्थ आहे. तो आपलें अस्तित्व सिद्ध करण्याकरतां मजसारख्या दुर्बलावर अवलंबून नाहीं. तूं खुशाल ईश्वर नाहीं असें सिद्ध कर ! "

प्रस्तुत लेखक लेखणीचा अत्यंत जड. अशा स्थितींत हा छोटासा ग्रंथ बाहेर पडत आहे याचें सर्व श्रेय श्री. य. गो. जोशी यांना आहे. त्यांनीं जर आग्रह धरला नसता व अवकाश दिला नसता तर हा ग्रंथ पुरा झालाच नसता.

हा छोटासा ग्रंथ तयार करीत असतां माझे स्नेही व रामनारायण रुइआ कॉलेजांतील मराठीचे प्राध्यापकद्वय श्री. न. र. फाटक बी. ए. व श्री. द. के केळकर बी. ए. यानीं हस्तालिखित वाचून ज्या सूचना

केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. इतरहि अनेक स्नेह्यांचें सहाय्य वेगवेगळ्या प्रकारानें मला मिळालें आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

प्रस्तुत वादविवेचन मालेनें ग्रंथाचें नांव 'ईश्वरवाद' असें आधींच प्रसिद्ध केलें आहे. ईश्वरवाद हा शब्द जडवाद, चिद्‌वाद या सारखा आहे. भाषाशास्त्रदृष्ट्या 'ईश्वरवाद' हा शब्दप्रयोग सदोष असण्याचा संभव आहे तरी वाचकांनीं ह्या शब्दाचा अर्थ ईश्वरसत्तावाद अथवा ईश्वर-आस्तिक्यवाद अथवा ईश्वरास्तित्ववाद असाच घेणें इष्ट आहे.

आतां अनंत असा जो ईश्वर त्याची यथातथ्य व संपूर्ण चर्चा व तीहि इतक्या थोड्या अवकाशांत करणें अशक्यच आहे. व या पुस्तकाचा तसा हेतुहि नाहीं. अर्वाचीन कालांत ईश्वराविषयीं उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या प्रश्नांची चर्चा समजण्यास मराठी वाचकांची भूमिका तयार करावी येवढाच या पुस्तकाचा हेतु आहे. तो सुद्धां अगदीं ताजी अशी चर्चा देऊन पुरा करणें एवढ्या अवकाशांत कठीण आहे. तेव्हां वाचकांस विनंति कीं—

न्यून तें पुरतें । अधिक तें सरतें । करुनि घेयावें हें
तुमतें । विनवितु असें ॥

कार्तिक शु॥ १ शके १८६३
पुण्यपत्तन

शं. वा. दांडेकर

# अनुक्रमणिका


| | | पान |
|---|---|---|
| १ | विषय प्रवेश ... ... ... | १ |
| २ | चर्चेचें महत्त्व व ती करण्याची पद्धत ... | ५ |
| ३ | ईश्वराच्या कल्पनेचा उगम ... ... | ९ |
| ४ | आर्यदर्शनांतील ईश्वराची कल्पना ... | २६ |
| ५ | पाश्चात्य देशांतील ईश्वरसिद्धीचे पुरावे ... | ४३ |
| ६ | आस्तिकवादांतील कांहीं मतें ... ... | ६३ |
| ७ | एकेश्वरीवाद ... ... ... | ६७ |
| ८ | ईश्वरसिद्धीचे अर्वाचीन पुरावे ... ... | ७७ |
| ९ | नास्तिकवाद व ईश्वर ... ... | ८८ |
| १० | भौतिकविज्ञानावर उभारलेला नास्तिकवाद ... | १०६ |
| ११ | धर्म व ईश्वर ... ... ... | १२५ |
| १२ | ईश्वरविषयक कांहीं भोळ्या समजुती ... | १४७ |
| | परिशिष्ट ... ... ... | १५४ |

म. ग्रं. सं. ठाणे
ग्रं० नं० ७१२९

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।
भ्रामयन् सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥

—भगवद्गीता ( अ. १८ )

# या विषयावरील कांहीं वाचनीय पुस्तकें


| | |
|---|---|
| A Seth Pringle-Pattison | : The Idea of God |
| Ward | : The Realm of Ends |
| | : Naturalism And Agnosticism |
| William James | : The Varieties of Religious Experience |
| Lindsay Dewar | : Man And God |
| L. D. Weatherhead | : How can I find God ? |
| Spalding | : Desire And Reason |
| Eddington | : Science And the Unseen World |
| Westaway | : Science And Theology |
| Thilly | : History of Philosophy |
| Patrick | : Introduction to Philosophy |
| I believe; The Personal Philosophies of Twenty-three Eminent men & Women of our time; | |
| S. Radhakrishnan | : Indian Philosoply Vols. I & II |
| Prof. Hiriyanna | : Outlines of Indian Philosphy |
| The Life of Ramkrishna Paramhansa; Mayavati Edition | |
| Shri Babu Aurobind Ghose | : The Life Divine |
| Kellett | : A Short History of Religions |
| पतंजलि | : योगसूत्रें |
| उदयनाचार्य | : न्याय कुसुमांजलि |
| पंडित मदनमोहन मालवीय | : ईश्वर |
| श्री. बर्वे यांचे लेख | : चित्रमयजगत अंक १९३७ |
| ईश्वरांक | : गीता प्रेस गोरखपूर |

# ईश्वरवाद

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ६९५६

## विषयप्रवेश :

मनुष्य व मनुष्येतर प्राणी यांत मुख्य भेद असा आहे कीं, मनुष्याच्याच ठिकाणीं स्वतःचें व इतरांचें ज्ञान करून घेण्याची पात्रता आहे. दुसऱ्याच्या अस्तित्वाची अंधुक जाणीव कांहीं कांहीं मनुष्येतर प्राण्यांत आढळून येते. पण तिचा उपयोगाच्या दृष्टीनें विचार करतां ती नसल्यांतच जमा आहे असें म्हटल्यास हरकत नाहीं. मनुष्यास मात्र स्वतःच्या अस्तित्वाबद्दल पूर्ण ज्ञान आहे. तसेंच इतरांच्याबद्दल ज्ञान करून घेण्याची पात्रता आहे. मनुष्यांत असणारी जी ही स्वपरज्ञानाची योग्यता तीमुळेंच मनुष्य हा इतर प्राण्यांपेक्षां श्रेष्ठ समजला जातो व या त्याच्या स्वसंविदतेंतच सर्व शास्त्रीय ज्ञानाचा उगम आहे. मनुष्याला बुद्धि आहे, तशी इतर प्राण्यांनाहि थोडीबहुत आहे असें कहलर, म्यॉग्डूगल वगैरे मानसशास्त्रकोविद यांनीं सिद्ध केलें आहे; पण ही जी मनुष्य व मनुष्येतर प्राणी यांत समानतेनें आढळणारी बुद्धि, तिची व्याप्ति आपले हेतु साधण्याकरितां उपयोगांत आणण्याच्या साधनापुरतीच आहे. आपले हेतु बरे आहेत कां वाईट आहेत, ते साध्य होण्यासारखी जगाची रचना आहे किंवा नाहीं, ज्याचा मी अंश आहे व ज्यांत माझे हेतु सिद्धीस जावयाचे त्या या जगाचें स्वरूप काय, याचा कोणी कर्ता आहे किंवा नाहीं, इत्यादि विचार करण्याचें सामर्थ्य मनुष्येतर प्राण्यांच्या बुद्धींत नाहीं.

हा मनुष्यबुद्धीचाच विलास आहे, हें तिचेंच वैभव आहे. आणि यामुळेंच मानवांनीं ज्याप्रमाणें ज्योतिष, भूस्तर, रसायन, धर्म, राजकारण, नीतिवगैरेविषयक शास्त्रें निर्माण केली, तशीं मनुष्येतर प्राण्यांपैकीं कोणीहि निर्माण करूं शकला नाहीं. इंद्रियांनीं जें पुढें आणून ठेवावें–जें आपल्या ऐंद्रियिक अनुभवास येतें–त्याच्यावर स्वभावानुसार राग-द्वेषमूलक प्रतिक्रिया करीत जीवित कंठणें येवढेंच मनुष्येतर प्राण्यांच्या जीविताचें सामान्यतः स्वरूप होय. हे प्राणी म्हणजे निसर्गाच्या हातांतील कळसूत्रीं बाहुलींच होत. हें प्रतिक्रियारूप जीवन मनुष्यांत आढळून येतें. पण याशिवाय मनुष्यास आणखी वेगळ्या प्रकारचें जीवन संभवनीय आहे. व त्याचें मूळ वर निर्दिष्ट केलेल्या स्वसंविद्-तेंत आहे. या स्वसंविद्रूप ज्ञानशक्तिमुळेंच मनुष्य हा निसर्गाचें नियमन करूं शकतो. या शक्तीमुळें तो अतींद्रिय गोष्टींचाहि विचार करूं शकतो. या शक्तीमुळेंच ऐंद्रियिक जीवनापेक्षां अधिक वरच्या दर्जाचें जीवन घालविणें त्यास शक्य होतें.

या ज्ञानशक्तीमुळेंच दृश्य जगताचें कोडें उलगडण्याचाहि तो प्रयत्न करतो व त्याकरितां अदृश्य वस्तूंची कल्पना करतो. अशा प्रयत्नांतूनच निसर्गाचे कायदे, नीतिनियम, धार्मिकबंधनें यांची उत्पत्ति होते. मनुष्यानें अशा ज्या अनेक कल्पना केल्या त्यांपैकीं अत्यंत महत्त्वाची, जिचा मानवी जीवनाशीं जिव्हाळ्याचा संबंध आहे व जिला नीति, धर्म, इत्यादि शास्त्रांत फारच महत्त्वाचें स्थान आहे अशी ईश्वराची कल्पना आहे. ही ईश्वराची कल्पना इतकी सर्व-व्यापक आहे कीं, असें म्हटलें तरी वावगें होणार नाहीं कीं, असा मनुष्यच जवळजवळ सांपडणें कठीण आहे, कीं ज्याच्या मनाला केव्हां ना केव्हां तरी ईश्वराची कल्पना शिवलीच नाहीं. तात्पर्य, ज्या ईश्वराच्यामुळें धर्मास महत्त्व चढलें, नीतियुक्त आचरणास गोडी

आली, मानवी जीवनास नवजीवन मिळालें, शेंकडों लोकांच्या दुःखित मनाला ज्याच्या चिंतनानें आश्वासन मिळतें, अशा ईश्वराचा पुढील पानांत विचार करण्याचें योजलें आहे.

## या विषयासंबंधीं उत्पन्न होणारे प्रश्नः—

ईश्वर हा विषय असा आहे कीं,त्याच्याकरितांच आपलें जीवित-सर्वस्व वाहिलेले असे कित्येक लोक होऊन गेले, हल्लीं आहेत व होतील! जगत् ज्यांना मोठे समजतें, त्यांपैकीं वामदेव, क्राइस्ट् महंमद, शंकराचार्य, रामानुजाचार्य, चैतन्य, ज्ञानदेव, तुकाराम, रामकृष्ण परमहंस वगैरे द्रष्टे असे होऊन गेलेले आहेत कीं, ईश्वर हा त्यांच्या 'जीवाचा जीव' होता. मासोळीची जीवनाविरहित जशी स्थिति व्हावी, तशी नुसत्या त्याच्या विस्मरणानें आमची स्थिति होते असें ते सांगतात.

जर कित्येकांना ईश्वर हा मनबुद्ध्यादिकांना गोचर होणाऱ्या कार्यकारणसंघातापेक्षां अधिक सत्य वाटत असला, तर कित्येकांना तो ईश्वर म्हणजे मानवनिर्मीत शब्द व त्याला अधिष्ठान फक्त मानवी बुद्धीची कल्पना यापलीकडे कांहीं नाहीं असें वाटतें. त्यामुळें ईश्वर-विषयक प्रश्नांत हा पहिला व अत्यंत महत्त्वाचा प्रश्न होऊन राहिला आहे.

तात्पर्य, ईश्वर हा कित्येकांना सत्यांतला सत्य असा जरी वाटत असला, तरी सूर्य, चंद्र, तारागण, घरेंदारें, स्नेहीसोबती वगैरे स्थूल पदार्थ जसे दृग्गोचर होतात तसा तो दिसत नसल्यामुळें किंबहुना ऐंद्रियिक अनुभवाच्या कक्षेंत तो पडत नसल्यामुळें ईश्वराच्या चर्चेस प्रारंभ ईश्वर आहे किंवा नाहीं, येथूनच करण्याची पाळी येते.

एकदां ‘ ईश्वर आहे ’ असें सिद्ध झालें, कीं मग खालील वेगवेगळे प्रश्न उत्पन्न होतातः—

( १ ) ईश्वराची कल्पना मनुष्याच्या मनांत उत्पन्न कशी झाली ? तिची वाढ कसकशी होत गेली ?

( २ ) ईश्वर एक, कां दोन, कां अनेक ?

( ३ ) ईश्वर हा सत्, चित्, अनंत, आनंद, निर्गुण, निराकार असा आहे, का सत्, चित् पण सगुण, साकार, अपरिमित असा आहे ? का ईश्वर निर्गुणहि आहे व सगुणहि आहे ?

( ४ ) ईश्वराचा व जगाचा संबंध काय? ईश्वर हा जगताला व्यापून आहे, कां त्याहून वेगळा, कोठें आहे ? का जगतास व्यापून उरला आहे ? तो जगाचें, या जगांत राहून नियंत्रण करतो, कां बाहेरून करतो, कां हा जगताला ‘ सृजी, पाळी, संहारी ’ असें म्हणतात तें केवळ अज्ञानमूलकच आहे ?

( ५ ) ईश्वर व ब्रह्म एकच का दोन आहेत ? एक असल्यास, ब्रह्माचा ईश्वरांत समावेश होतो, कां ब्रह्मांत ईश्वराचा समावेश होतो ?

( ६ ) ईश्वराचा व धर्मशास्त्र, नीतिशास्त्र यांचा कशा प्रकारचा संबंध आहे ? ईश्वर न मानतां धर्म व नीति राहूं शकेल कीं नाहीं ?

इत्यादि अनेक प्रश्न उत्पन्न होण्यासारखे आहेत.

प्रस्तुतसारख्या पुस्तकांत या सर्व प्रश्नांचा सांगोपांग विचार करणें तर कठीणच आहे, पण यांतील कांहीं प्रश्नांबाबत तर अशा प्रकारचे प्रश्न आहेत असा त्यांचा निर्देश करूनच स्वस्थ बसणें प्राप्त आहे. कारण, ईश्वराविषयीं उत्पन्न होणाऱ्या वेगवेगळ्या गूढ प्रश्नांची पौर्वात्य व पाश्चात्य देशांत जी चर्चा केलेली आढळते ती समजण्यास जिज्ञासूंची तयारी करावी येवढाच या पुस्तकाचा हेतु असल्यानें फार गूढ अशा प्रश्नांची चर्चा या पुस्तकांत केलेली नाहीं व

म्हणूनच ज्या प्रश्नांची चर्चा केलेली आहे त्यांचीसुद्धां सांगोपांग व विस्तृत अशी चर्चा यांत आढळणार नाहीं. पौर्वात्य व पाश्चात्य ईश्वरविषयक चर्चेंत जिज्ञासूचा सुलभ प्रवेश व्हावा येवढाच या पुस्तकाचा हेतु आहे.

---

## चर्चेचें महत्त्व व ती करण्याची पद्धत : : : २

### चर्चेचें महत्त्व

ईश्वरविषयक चर्चा सर्वांनाच उपयोगी आहे. ती ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यालाहि आहे व न ठेवणाऱ्यालाहि आहे. कारण प्रस्तुत लेखकाचें मत असें आहे कीं, श्रद्धा आणि अश्रद्धा दोन्हीही डोळस असाव्यात.

जे श्रद्धावान् आहेत ते व्याख्यानप्रवचनांतून, कीर्तनांतून, मनुष्यजन्माचें ध्येय ईश्वरप्राप्ति आहे असें ऐकतात; धार्मिक ग्रंथांतून तसेंच वाचतात. तेव्हां ईश्वर खरोखरीच 'आहे किंवा नाहीं, असल्यास त्याचें स्वरूप काय, तो रहातो कोठें, हांक मारली तर त्याला ऐकूं येतें किंवा नाहीं व तीं हांक ऐकावयास त्याला कान आहेत किंवा नाहीं, आपल्याजवळ जी साधनसामुग्री आहे त्यापैकीं कशानें त्याचें दर्शन होईल इत्यादि गोष्टींचा विचार प्रत्येक सश्रद्ध मनुष्यानें करणें अवश्य आहे. कारण आपण जी क्रिया करतो तिच्या बुडाशीं असणारें ज्ञान स्वच्छ नसेल, तें गढूळ असेल तर आपल्या क्रियेचें योग्य फल आपल्या पदरांत पडणार नाहीं. 'श्रमस्तस्य श्रमफलो' अशीच

आपली स्थिति होईल. एखाद्या अंधळ्याला गरुडाचे पंख जरी मिळाले तरी त्याचा काय उपयोग? कारण त्या पंखाच्या योगानें तो गगनांत विहार करणारा खालीं उतरूं लागला कीं, आपण खाड्यांत पडतो कां तलावांत बुडतो हें कोठें त्याला दिसणार आहे? तेव्हां दृष्टि नसलेल्या आंधळ्या मनुष्याची गरूडभरारी फुकटच! तशीच गत शुद्ध ज्ञानावाचून कर्म करणाऱ्यांची आहे. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'कर्माचे डोळे ज्ञान। तें शुद्ध होआवें' तुकारामबोवा तर म्हणतात, 'शंख करिसी ज्याच्या नांवें' त्याला ओळखण्याचा थोडा तरी प्रयत्न करशील कीं नाहीं! शिवाय 'यद् हि विद्यया क्रियते तद्वीर्यवत्तरंभवति' या न्यायानेंसुद्धां सश्रद्ध मनुष्यास या चर्चेचा उपयोग होईलच.

पण ज्याची श्रद्धा नाहीं त्यालाहि हिचा उपयोग आहेच. कारण त्याला पुनः एकवार याविषयीं विचार करून या चर्चेनें आपलें मत कायम करतां येईल. ईश्वराचा प्रश्न इतका महत्त्वाचा आहे कीं, नुसता एकदां थोडा वेळ विचार करून मनुष्यानें तो आपल्या मनाबाहेर टाकणें योग्य नव्हे. या विषयावर हजारों ग्रंथ झालेले आहेत. संपूर्ण विश्व ज्यांना शहाणे म्हणतें अशांनीं या विषयावर पानेंच्या पानें लिहिलीं आहेत, नव्हे त्याच्या भेटीकरतां व लोकांना त्याची ओळख करून देण्याकरतां आयुष्येंच्या आयुष्यें खर्चीं घातली आहेत. तेव्हां हा ग्रंथ ज्यांच्यांत श्रद्धाच नाहीं अशांना अशा महत्त्वाच्या प्रश्नाबाबत 'नेति', अथवा 'नास्ति' असा सिद्धांत ठाम करण्यापूर्वीं त्याचा विचार एकवार करण्याची त्यांना संधि देईल, इतका तरी त्याचा उपयोग होईल.

## चर्चा करण्याची पद्धत

मागील प्रकरणांत निर्दिष्ट केलेले व आणखीहि निर्देश करतां

येण्यासारखे जे ईश्वरविषयक प्रश्न आहेत त्यांची चर्चा तीन वेगवेगळ्या पद्धतींनीं करणें शक्य आहे. (१) स्वानुभव, (२) शास्त्रप्रामाण्य आणि (३) सारासार विचार करणारी बुद्धि या तीन कसोट्यांचा उपयोग करून तीन वेगवेगळ्या पद्धतींचा उपयोग करतां येणें शक्य आहे. पैकीं पहिली पद्धत स्वानुभवाचें अवलंबन. ही ज्ञानेश्वरमहाराज, तुकारामबोवा, रामकृष्ण परमहंसादि ज्यांना ईश्वराचा अनुभव मिळाला आहे अशा महात्म्यांनाच शक्य आहे. असें सांगतात कीं, रामकृष्ण परमहंसांचें शिष्यत्व पत्करण्यापूर्वीं स्वामी विवेकानंद त्यांच्याकडे गेले असतां एकदां ते परमहंसांना म्हणाले, “ भगवन् ! आपण देव पाहिला आहे काय? ” यावर त्या दक्षिणेश्वराच्या महात्म्यानें तत्काल निःशंकपणें उत्तर दिलें, “ होय ! मीं देव पाहिला आहे ! किंबहुना, तुझ्यापेक्षां देवच मला अधिक प्रत्यक्षपणें अनुभवास येत आहे. आणि तुझी इच्छा असल्यास मी तुला त्याची प्रत्यक्ष भेट करून देईन ! ” ‘ हा गे माझा अनुभव । भक्तिभाव भाग्याचा ॥ ’ असें म्हणण्याची ज्यांची शक्ति आहे, त्यांनाच या स्वानुभवावर अधिष्ठित अशा पद्धतीचा अवलंब करतां येईल. या पद्धतीनें लिहिणें म्हणजे फक्त ‘ अनुभव सांगणें ’ येवढेंच; पण मग तेथें चर्चेला वावच नाहीं. या पुस्तकांत ही पद्धत अवलंबिली नाहीं हें वाचकाच्या सहजच लक्षांत येईल.

(२) दुसरी पद्धत शास्त्रप्रामाण्यावर भर देणारी. या पद्धतीनें चर्चा करावयाची म्हटल्यास एक वा अनेक ग्रंथांचीं नांवें सांगून ते मान्य कां आहेत हें सांगितलें पाहिजे. पण असें करण्यामध्यें एकदोन मोठे दोष येण्यासारखे आहेत. एक तर या पद्धतीची संपूर्ण उभारणी आंधळ्या श्रद्धेवरच होणार. कारण श्रद्धा डोळस असली म्हणजे मग ती श्रद्धा या सदरांत रहात

नाहीं. ती बुद्धीचाच एक कार्यकारी अंश होते. पण जेथें डोळे मिटून अमुक एक ग्रंथ प्रमाण आहे असें समजून चालावयाचें, तेथें त्या ग्रंथांत दिलेल्या गोष्टींची पूर्वोत्तर भाग पाहून संगति लावणें यापलीकडे कामच उरणार नाहीं. आणि या पद्धतींत दुसरी उणीव म्हणजे सर्व जगाला मान्य होईल असा एक ग्रंथ सांगणें अवश्य आहे. पण तें तर फारच कठीण आहे. अलीकडे आपण ज्यांना 'हिंदु' म्हणतों, पण ज्यांना 'वैदिक' म्हणणें अधिक सयुक्तिक आहे, ते वेद व तदनुसारी 'गीता' वगैरे ग्रंथ मानतात, तर येशूचे अनुयायी 'बायबल' मानतात. पारशी झरथुष्ट्राच्या शब्दांना ईश्वरप्रेषितांचीं वचनें म्हणून मानतात तर मुसलमान लोक 'कुराण' हा पवित्र ग्रंथ समजतात. तेव्हां या पद्धतीनें लिहिणें म्हणजे यांपैकीं एक प्रमाण मानून तरी लिहिलें पाहिजे, अथवा या सर्वांचा समन्वय तरी केला पाहिजे. पण तीहि पद्धत या पुस्तकांत अवलंबिली नाहीं. कारण कीं, या ग्रंथाचा जो हेतु आहे, त्याशीं ती जुळती नव्हे.

(३) तिसरी पद्धत म्हणजे आपणाजवळ असणारी सारासार विवेचकबुद्धि हिचा उपयोग करून तिला जें पटेल तें मान्य करणें.

सध्यांचें युग नास्तिक म्हणून जरी समजलें जात असलें, तरी त्यांतील लोकांत एक मोठा गुण आहे. त्यांना ढोंग, लबाडी हीं कोणत्याच क्षेत्रांत पसंत पडत नाहींत. तेव्हां आपल्या विवेचकबुद्धीस प्रमाण मानून वेगवेगळ्या प्रश्नांचा विचार करणें ही जी पद्धत आहे, तीच सर्वांना या काळांत मान्य होण्यासारखी पद्धत आहे. या पद्धती-वरहि आक्षेप येण्यासारखे नाहींत असें नाहीं. सर्वांची बुद्धि सारखीच वाढली आहे कां? बुद्धींत बदल होतो, मग तिला प्रमाण कशी मानावी? इत्यादि प्रश्न या पद्धतीसंबंधीं विचारतां येतील. पण सूक्ष्म दृष्टीनें या सर्व पद्धतींचा विचार केल्यास असें आढळून येईल

कीं, सरतेशेवटीं मनुष्य हा आपल्या बुद्धीवरच अवलंबून राहतो. तेव्हां बुद्धि प्रगल्भ झाली असतां तिचा उपयोग करून, विषयाच्या दोन्ही बाजू पाहून बुद्धीला जें पटेल तेंच ग्रहण करणें हीच पद्धत योग्य ठरते. वास्तविक पहिली व तिसरी यांत विरोध नाहीं. कारण विवेचकबुद्धि ही त्या त्या विषयांत ज्यांनीं परिश्रम केले आहेत त्यांचे अनुभव हें एक मोठें प्रमाण म्हणून मान्य करतेच करते.

---

## ईश्वराच्या कल्पनेचा उगम : : : २

ईश्वराचा विचार करूं लागलें असतां मनांत अनेक प्रश्न उत्पन्न होतात. त्यांपैकीं कांहीं फार गूढ असे आहेत व कांहीं तुलनेनें साधे, सोपे असे आहेत. ईश्वर आहे का? असल्यास त्या अनंतैश्वर्यसंपन्न ईश्वराचें स्वरूप काय आहे? विश्वाचा व त्याचा संबंध काय? आपणांस त्या ‘यतो वाचो निवर्तन्तेऽप्राप्य मनसा सह’ अशा गूढ तत्त्वाचा अनुभव येतो कसा? इत्यादि तत्वज्ञान व अध्यात्मक्षेत्रांत पडणाऱ्या प्रश्नांपेक्षां तुलनेनें ‘ईश्वराची कल्पना मानवानें कां, केव्हां व कशी केली?’ हे प्रश्न सोपे आहेत. कारण हे प्रश्न मानसशास्त्र, समाजशास्त्र व मानवशास्त्र या विज्ञान-शास्त्राच्या जवळ येणाऱ्या शास्त्रांत पडतात. म्हणून ‘घरांत रिघावें दाराचिये सोयी’ या न्यायानें प्रथम ईश्वरविषयक सोप्या प्रश्नांची चर्चा करूं व मग तद्विषयक गूढ प्रश्नांकडे वळूं.

शिवाय, एका दृष्टीनें ईश्वरस्वरुपाची चर्चा करण्यापूर्वीं ईश्वराच्या

कल्पनेचीच चर्चा करणें अवश्य आहे. कारण, ज्याच्या अंतःकरणास ईश्वराची कल्पना शिवलीच नाहीं, त्याला त्याच्या स्वरुपाच्या चर्चेत काय महत्त्व वाटणार ? तेव्हां ईश्वरस्वरूपदर्शनास जाण्याच्या ज्या पायऱ्या आहेत, त्यांतील ईश्वराची कल्पना ही प्रथम पायरी आहे व म्हणून तिची चर्चा आरंभींच होणें वाजवी आहे.

आम्ही ईश्वरस्वरूपदर्शनास जाण्याच्या ज्या पायऱ्या आहेत, त्यांतील ईश्वराची कल्पना ही प्रथम पायरी आहे असें जें वर म्हटलें आहे तें आणखीहि एका अर्थानें खरें आहे. आपल्या मनांत सूर्य, चंद्र, झाडें वगैरे पदार्थांविषयीं विचार उत्पन्न होतात त्याला कारण ज्यांना आपण हीं नांवें देतों त्यांच्यापासून आपणांस इंद्रियद्वारां मिळणाऱ्या संवेदना होत. म्हणून हें खरें आहे कीं हे पदार्थ आपण प्रथम पाहतों व मग त्यांचा आपण विचार करतों. आपला व त्यांचा परिचय प्रथम बाह्येंद्रियद्वारां होतो—ते पदार्थ आपणाला प्रथम प्रत्यक्ष दिसतात व मग आपण त्यांचा विचार करतों. ईश्वराचें तसें नाहीं. ईश्वर हा 'दृश्यपणें-देखिजे' या सदरांत पडत नसल्यानें आपण प्रथम त्याची कल्पना करतों व मग कल्पनेपलीकडे खरें अस्तित्व त्यास आहे किंवा नाहीं याचा शोध करतों अथवा या स्थितीपर्यंत पोंचलों नसल्यास जो कोणी आपणांस ही कल्पना सुचवतों त्याच्या म्हणण्यावर विश्वास ठेवतों व आपलें कार्य सुरूं करतों. मनुष्य ईश्वराच्या अस्तित्वावर श्रद्धेनें विश्वास ठेवो अगर चिकित्सापूर्वक विचार करून विश्वास ठेवो येवढी गोष्ट खरी कीं, ईश्वराची व त्याची ओळख प्रथम कल्पनेच्याद्वारां होते.

यामुळेंच सूर्य, चंद्र, झाडें वगैरे पदार्थांची कल्पना मनुष्यास कशी झाली या प्रश्नाच्या चर्चेस तात्त्विक महत्त्वापलीकडे महत्त्व नाहीं. ईश्वराची ओळखच कल्पनेच्या द्वारां होणारी असल्यानें

कित्येक तत्त्वज्ञानी ईश्वराचें अस्तित्व ईश्वराच्या कल्पनेवरूनच सिद्ध करूं पाहातात, तर कित्येक कल्पनेपलीकडे त्याला अस्तित्वच नाहीं असें म्हणतात. या प्रश्नांचा विचार पुढें येणारा असल्यानें तूर्त येवढेंच सांगणें पुरें कीं, दृश्य पदार्थांची कल्पना कशी उत्पन्न झाली हा मानसशास्त्र अथवा दृग्दृश्यविवेक या शास्त्रांत जरी महत्त्वाचा प्रश्न असला, तरी त्या प्रश्नाला तात्त्विक चर्चेपलीकडे महत्त्व नाहीं. कारण, डोंगरादिकांचें अस्तित्व कोणी त्यांच्या आपल्या मनांतील कल्पनेवर अवलंबून ठेवीत नाहीं! उलट, या सर्वांच्या कल्पनेचा उगम इंद्रियद्वारां मिळणाऱ्या संवेदनांत आहे हें सर्वत्र मान्य केलें जातें. तसें ईश्वराचें नव्हे; यामुळें या प्रश्नास विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे.

ईश्वराच्या कल्पनेचा उगम कसा झाला याचा विचार करूं लागले असतां खालील वेगवेगळे प्रश्न मनश्चक्षूंसमोर येऊं लागतात.

(१) अगदीं मुळांत मनुष्यानें ईश्वराची कल्पना कां केली असावी? अशी कोणती नड पडली, कीं ज्यामुळें ईश्वराची कल्पना केल्याशिवाय त्याचें चालेना?

(२) ती मुळांत कोणत्या स्वरुपाची होती? ती तशीच अखंड आजवर चालत आली, कां तिच्यांत बदल होत आला? बदल झाला असल्यास कसकसा व कां झाला?

(३) घरायेवढें डोकें, खांबायेवढे दांत, हजार हात असणाऱ्या राक्षसाची अथवा बागुलबोवाची मन जशी कल्पना करते, त्याच जातीची ही कल्पना आहे कां? यापेक्षां वेगळ्या जातीची आहे?

(४) आणि ईश्वराच्या कल्पनेचें पृथक्करण केल्यास त्यांत कशा-कशाचे अंश दिसून येतात?

हे प्रश्न मानवशास्त्र व समाजशास्त्र यांच्या क्षेत्रांत पडणारे आहेत. प्रथम आपण तिसऱ्या व चौथ्या प्रश्नांचा विचार करूं.

फ्रान्स देशांत सतराव्या शतकांत होऊन गेलेला प्रसिद्ध गणिती व तत्त्वज्ञ देकार्त (Descartes) याच्या एतद्विषयक चर्चेनें पाश्चात्य देशांत या मानसशास्त्रविषयक प्रश्नांकडे लोकांचें लक्ष वेधलें. देकार्तच्या तत्त्वज्ञानाच्या चर्चेत या प्रश्नास फार महत्त्व आहे. कारण त्यानें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याकरितां जे पुरावे मांडले त्या सर्वांचा पाया अनंताची मानवी मनांत असणारी कल्पना हाच आहे. अर्थातच हा पाया घट्ट करणें हें त्याचें काम असल्यानें त्यानें या प्रश्नाच्या चर्चेकरितां बरीच जागा खर्ची घातली आहे.

मानवी मनांत आढळून येणाऱ्या कल्पनांचे देकार्तनें तीन प्रकार केले. एक प्रकार अशा कल्पनांचा कीं, ज्यांचें मूळ आपणांस बाह्य पदार्थांत सांपडतें. उदाहरणार्थ, विस्तव, नदी, झाडें इत्यादि इंद्रियांना गोचर होणाऱ्या पदार्थांच्या कल्पना. यांना तो 'बाह्यमूळ' (Adventitious) म्हणतो. दुसरा प्रकार केवळ मनः कल्पितांचा. उदाहरणार्थ,—'अरेबियन् नाइट्स्'सारख्या ग्रंथांतील राक्षस वगैरेंच्या कल्पना यांना तो मनःकल्पित ( Factitious ) म्हणतो. तिसरा प्रकार असा आहे कीं, ज्यांचें मूळ आपणांला बाह्य पदार्थांत दिसून येत नाहीं पण प्रत्यक्ष अनुभवांत तर आपण ज्यांचा उपयोग करतो. उदाहरणार्थ सौंदर्याची कल्पना, बऱ्यावाईटाची कल्पना, अनंताची कल्पना, अमृतत्वाची कल्पना इत्यादि. अशा कल्पनांना देकार्तनें 'अन्तःकरणसहज' अथवा 'उपजत' ( Innate ) असें नांव दिलें आहे. ईश्वराची कल्पना ही अशापैकींच एक होय. वास्तविक देकार्तनें हे जे विभाग केले यांत फार चूक आहे असें नाहीं. त्यानें उपजत असा जो शब्द वापरला तो अशा अर्थानें कीं, मन ज्या वेळेस निर्माण होतें, त्यावेळीं तें फक्त

संस्कारांनीं युक्त असें निर्माण होतें. पुढें प्रसंगोपात योग्य परिस्थिति निर्माण झाली म्हणजे त्या संस्कारांची वाढ होऊन मानवी मनांत वर सांगितल्याप्रमाणें अनंत, ईश्वर, इत्यादिकांच्या कल्पना उत्पन्न होतात. प्लेटोनें आपल्या 'ग्रंथांत' जवळ जवळ अशीच कल्पना मांडली आहे व खरें पाहिलें तर यांत वावगें असें कांहीं नाहीं.

परंतु, देकार्तनंतर झालेल्या त्याच्या परंपरेंतील कांहीं शिष्यांना त्याच्या लिहिण्याचा अर्थ न समजल्यानें तें असें म्हणूं लागले कीं, देकार्त जेव्हां एकादी कल्पना 'उपजत' आहे असें म्हणतो तेव्हां त्याचा अर्थ अंतःकरणाबरोबर तिचे नुसते संस्कारच उत्पन्न होतात असें नव्हे, तर ती कल्पना पूर्णत्वानें जशीच्या तशी मनांत आरंभापासूनच असते असा असतो. देकार्तला जर त्याच्या शिष्यांचा अर्थ कळता, तर "देवा, माझ्या शिष्यांपासून माझें रक्षण कर!" असेंच उद्गार त्यानें काढलें असते.

दुर्दैवानें प्रसिद्ध अनुभववादी आंग्ल तत्त्ववेत्ता लॉक् (Locke) यानें आपल्या 'Essay on the Human Understanding' या पुस्तकांत देकार्तच्या मताचें खंडन करतांना त्याच्या शिष्यांनीं 'उपजत' या शब्दाचा जो अर्थ केला, तोच अर्थ घेतला व ह्या कल्पनेवर टीकेची झोड उठविली. त्या टीकेस देकार्तच्या मत-खंडनाच्या दृष्टीनें जरी हल्लींच्या काळांत फारसें महत्त्व नाहीं, तरी ऐतिहासिक माहिती या दृष्टीनें व ईश्वराच्या कल्पनेचा उगम कशांत नाहीं ह्यावर त्या चर्चेनें प्रकाश पडणार असल्यानें त्याच्या टीकेंतील दोन महत्त्वाचे मुद्दे खालीं देत आहों.

पहिला मुद्दा असा कीं, देकार्त व त्याचे अनुयायी ह्यांचें म्हणणें कीं, "ईश्वराची कल्पना मानवी अंतःकरण जेथें आहे तेथें आढळून

येते हें खोटें आहे." कारण असें कीं, असे कितीतरी रानटी मानव-वंश आहेत, कीं त्यांना ईश्वराची कल्पनाच नाहीं. लॉक् म्हणतो कीं ईश्वराची कल्पना सर्व मानवी अन्तःकरणांत नाहीं हें सिद्ध करण्याकरितां दूर, रानटी, अडाणी माणसांकडे जाण्याचें कारण नाहीं, वेडी माणसें, लहान मुलें, यांच्यांत आपणांस ईश्वराची कल्पना कोठें आढळून येते? यांपैकीं लहान अर्भकांचें उदाहरण फारच महत्त्वाचें आहे. कारण ईश्वराची कल्पना जर अन्तःकरणसहज असेल, तर ती शुद्ध स्वरूपांत सांपडण्याचें एकमेव असें कोणतें ठिकाण असेल तर नूतन जन्मास आलेल्या अर्भकाचें मन. पण त्या बालकाच्या मनाचा ठाव पाहूं गेलें असतां तेथें ईश्वराची कल्पना नाहीं, एवढेंच नव्हे, तर कोणतीच कल्पना दिसून येत नाहीं. येवढ्याकरितां देकार्तनें हा उपजत कल्पनांचा जो विभाग कल्पिला आहे हा अगदीं बिनबुडाचा, निराधार आहे. मानवी मन हें अलिखित फलकासारखें कोरें, स्वच्छ असतें. त्याच्यावर इंद्रियद्वारा प्रवेश करणारे विषयसूर्याचे किरण प्रकाश पाडतात व कांहीं अक्षरें उमटवितात. एऱ्हवीं मन हें शुद्ध कोरें असेंच असतें!

दुसरा मुद्दाः—घटकाभर वादाकरितां वरचा सर्व पुरावा दूर लोटून जरी असें मानलें, कीं ईश्वराची कल्पना सार्वत्रिक आहे तरी त्यापासून ती अंतःकरणसहजच असली पाहिजे हें सिद्ध होत नाहीं. कारण, या कल्पनेची व्यापकता जर अन्य कारणांमुळें सांगतां आली, तर देकार्तनें दिलेलें कारणच मानलें पाहिजे हें उरत नाहीं! ईश्वराच्या कल्पनेच्या बाबतींत असें अन्य कारण सहज दाखवितां येण्यासारखें आहे. मनुष्याची दुर्बलता, प्रत्येक गोष्टीस कारण शोधून काढण्याची त्याची प्रवृत्ति, कल्पनेच्या पंखांवर उंच भराऱ्या मारण्याची त्याच्या मनाची शक्ति इत्यादि गोष्टींचा विचार केला म्हणजे सर्वांचें आदिकारण म्हणून ईश्वराची कल्पना मनुष्यानें कशी केली असेल हें

सहजच सांगतां येईल. त्याकरितां ईश्वराची कल्पना 'अन्तःकरण सहज' आहे असें मानण्याचें कारण नाहीं.

या बाबतींत खरा सिद्धान्त असा आहे कीं, मानवी बुद्धीची विचार-शक्ति जागृत झाली, कीं इतर वस्तूंची जशी ती कल्पना करते, तशीच ईश्वराची-अनंताची—ती कल्पना करते; परंतु अशी विचार करण्याची शक्ति मानवी बुद्धींत आहे ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे. कारण ज्या बाह्य वस्तूंच्या प्रभावामुळें मानवी बुद्धि जागृत होऊन ईश्वराची कल्पना करूं शकते, त्या बाह्य वस्तु मनुष्याच्या आकारासारखा ज्यांचा आकार आहे अशा प्राण्यांवर आपला प्रभाव पाडण्याचा प्रयत्न करीत असूनसुद्धां त्यांच्यांत "सत्यं, शिवं सुंदरं" अशाची कल्पना उत्पन्न झालली दिसत नाहीं! यामुळें लॉकचा सिद्धान्त हा चूक ठरतो. लॉकनंतर झालेले लायबिनिटझ, कांट वगैरे तत्त्ववेत्ते देकार्तच्या मताकडे पुनश्च झुकतात याचें कारण लॉकच्या सिद्धान्तापेक्षां देकार्तचा सिद्धान्त अधिक बरोबर आहे म्हणून.

या बाबतींत वेदांतशास्त्राचा सिद्धान्त असा आहे कीं बीजांत जसा वृक्ष तसें प्रत्येक प्राण्यांत अनंतत्त्व सांठवलेलें आहे. आपणांस मानवाची धांव अनंताकडे दिसते याचें खरें कारण हें आहे. यावर कोणी म्हणेल कीं अनंतत्व हें काय फक्त मनुष्यांतच सांठवलेलें आहे? तें तर सर्व प्राण्यांत आहेच; व मग सर्व प्राण्यांची धांव अनंताकडे कां दिसत नाहीं? यावर वेदांत्याचें उत्तर असें आहे कीं अनंतत्व सर्वांत आहे ही गोष्ट खरी. पण सर्वांचीं बुध्दिउपाधि सारखी नाहीं. मानवी बुध्दि ही शुध्द उपाधि असल्यानें चैतन्याचा प्रकाश तिच्यांत अधिक स्पष्ट परावर्तित होतो. यामुळें मानवी बुध्दीचीच धांव तेवढी आपणांस अनंताकडे दिसते.

या बाबतींत एका अर्वाचीन तत्त्ववेत्त्याच्या मताचा उल्लेख करणें

अवश्य वाटते. अर्वाचीन प्रसिद्ध पदार्थसत्तावादी (Realist) अमेरिकन् तत्त्ववेत्ते जॉर्ज संतयाना हे तर अगदीं आपल्यां वेदांताची भाषा बोलतांना दिसतात. त्यांचें म्हणणें असें कीं, "अनंताची कल्पना ही मानवी मनाच्या खेळांच्यामागें सारखी डोकावीत असते." ईश्वराकडे 'परत धांव' (Return to God) या कल्पनेवरील शंकांना उत्तर देतांना संतयाना म्हणतात:—*

"I confess that formerly I had some difficulty in sharing the supreme respect for infinite Being which animates so many saints,...But time has taught me not to despise any form of vital imagination, any discipline which may achieve perfection after any kind......

We need not look for the spiritual principle in the distance We have it at home from the beginning. Even the idea of infinite Being, though unnamed, is probably familiar. Perhaps in the biography of the human race, or of each budding mind, the infinite or indeterminate may have been the primary datum. On that homogeneous sensuous backgroud, blank at first but secretly plastic, a spot here and a movement there may gradually have become discernible, until the whole picture of nature and history had shaped itself as we see it. A certain sense of that primitive

* George Santayana : Some Turns of thought in Modern Philosophy, Pages 116 apd 117.

datum, the infinite or indeterminate, may always remain as it were the outstreched canvas on which every picture is painted. And when the pictures vanish, as in deep sleep, the ancient simplicity and quietness may be actually received, in a conscious union with Brahma. So sensuous, so intimate, so unsophisticated the 'Return to God' may be for spirit, without excluding the other avenues, intellectual and aesthetic, by which the return may be effected in waking life, though then not so much in act, as in intent only and allegiance"

वरील उतारा थोडा लांब असूनसुद्धां दिला आहे याचें कारण, ईश्वर-विषयक प्रश्नाशींच त्याचा संबंध आहे. शिवाय, वरील उताऱ्यांत मांडलेली कल्पना, अनंतज्ञानसुखस्वरूप वस्तूकडे जीवाची धांव आहे याचें कारण तो अनंतज्ञानस्वरूपांतूनच बाहेर आलेला आहे या वेदांताच्या कल्पनेशीं किती जुळती आहे हे वाचकांस कळावे म्हणून.

मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या कक्षेत पडणारा दुसरा प्रश्न म्हणजे मनुष्याच्या मनांत आढळून येणाऱ्या ईश्वराच्या कल्पनेचें पृथःकरण केलें असतां आपणांस त्यांत कशाकशाचे अंश आढळून येतात हा होय. ईश्वराची व्याख्या करणें कठीण आहे; पण मनुष्य ईश्वराची जी कल्पना करतो ती कशी बनली आहे, हें सामान्यतः सांगणें शक्य आहे.

आपण जर लोकांच्या मनांत आढळून येणाऱ्या ईश्वरविषयक कल्पनांची छाननी केली तर आपणाला खालील गोष्टी त्यांत आढळून येतील.

( १ ) मनुष्य ज्या कुटुंबांत अथवा ज्या समाजांत जन्माला येतो व वाढतो, त्या कुटुंबाची अथवा समाजाची जी ईश्वरविषयक कल्पना असते तिचा त्याच्या मनावर संस्कार होतो व तो जी आपली ईश्वराची कल्पना बनवतो, त्यांत या कल्पनेचा पुष्कळसा अंश असतो. मनुष्याला इतर ज्ञानाबरोबरच ईश्वराचें ज्ञान मिळत असल्यानें समाजांतील ईश्वराच्या कल्पनेचा परिणाम त्याच्या मनावर इतका झालेला असतो कीं, फारच थोड्या लोकांना ती कल्पना अजिबात सोडून देऊन स्वतंत्र अशी ईश्वराची कल्पना करण्याची शक्ति असते.

( २ ) जसा समाजांतील कल्पनेचा परिणाम होतो, तसाच त्याचें मन जर एखाद्या विशिष्ट प्रसंगामुळें ईश्वराकडे वळलें असलें, तर त्याचाहि होतो. मनुष्यावर आलेले बरे वाईट प्रसंग यांचाहि परिणाम त्याच्या ईश्वरविषयक कल्पनेंत झालेला आढळून येतो.

( ३ ) या बाह्य परिस्थिप्रमाणेंच स्वतःच्या भावना व कल्पना-शक्ति याहि ईश्वरविषयक कल्पना करण्याला हातभार लावतांना दिसतात.

( ४ ) भावना, कल्पनाशक्ति, यांच्याबरोबरच मनुष्य आपल्या बुद्धीचा उपयोग करतांना दिसतो. पण केवळ बुद्धि चालवूनच ज्यांनीं आपली ईश्वराची कल्पना बनवली व तिलाच चिकटून राहिले असे फारच थोडे लोक आढळून येतील. बहुधा या बाबतींत असें दिसतें कीं भावना–हृदयाची राणी–हीच बुद्धीवर विजय मिळविते.

( ५ ) आपल्या ईश्वरविषयक कल्पनेची बैठक स्वतःला प्राप्त झालेल्या ईश्वरविषयक अनुभवांवर बसवणारे असे फारच थोडे लोक दिसतात. परंतु यांतसुद्धां आरंभीं आरंभींच्या कल्पनांत मानवी मनाच्या संस्कारांचा परिणाम झालेला दिसतोच. म्हणून ईश्वराची खरी कल्पना तीच कीं, जेथें कल्पनाच त्याच्या अनुभवांत मावळून जाते.

आतां पहिल्या दोन प्रश्नांकडे वळूं. मनुष्यानें ईश्वराची कल्पना कोणत्या प्रसंगीं अथवा कां केली असावी याविषयीं वेगवेगळीं मतें मांडण्यांत येतात. मात्र बहुतेक लोक असें समजतात कीं, ज्या कारणाकरितां लहानपणांत देव मानण्याचा प्रसंग येतो, त्याच कारणाकरितां समाजाच्या प्रथम अवस्थेमध्यें मनुष्यानें देवाची कल्पना केली असली पाहिजे. 'जें पिंडीं तेंच ब्रह्मांडीं' अथवा 'जें व्यष्टींत तेंच समष्टींत'

फ्रेजर म्हणतो कीं आपणांस जर ईश्वराची कल्पना मूळांत कशी केली गेली असेल हें पहावयाचें असेल तर सुशिक्षित, पुढारलेल्या लोकांच्या कल्पनांचा विचार करून उपयोगी नाहीं. त्याकरतां अशिक्षित, रानटी अवस्थेंत असणारे जे समाज आहेत त्यांच्याकडेच आपली दृष्टि वळवली पाहिजे. परंतु येथें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं या कल्पनांचा विचार करूनहि सर्वसंमत असा सिद्धान्त अजून निश्चित कोणी काढला नाहीं.

कित्येकांच्या मतें, ईश्वराच्या कल्पनेचा उगम भीतींत आहे. ईश्वर हा मोठा बागुलबोवा आहे. लहान मूल रडतांना थांबत नसलें म्हणजे त्याला बागुलबोवाची भीति घालतात. वास्तविक बागुलबोवा म्हणून कांहीं वस्तु अस्तित्वांत नाहींच. तसेंच आकाशांत गडगडतांना ऐकूं आलें, वीज कडाडली, झंझावात सुटला म्हणजे त्यास कांहीं जबरदस्त कारण असलें पाहिजे अशी कल्पना मनुष्य करतो; त्यालाच तो 'देव' असें म्हणतो व मग तो गडगडणारी देवता, पावसाची देवता, वाफेची देवता अशा अनेक देवतांची कल्पना करतो.

कित्येकांच्या मतें ईश्वराची कल्पना ही स्वप्नानुभव व वाडवडिलांच्या भुतांची कल्पना यांतून उत्पन्न झाली असावी. आपले वडील वारले म्हणजे ते नाहींसे होतात, पण स्वप्नांत दिसतात. स्वप्नांत दिसत असल्यानें ते प्रसंगविशेषीं आपलें रक्षण करतात असें मानाव-

यास जागा रहाते. तसेंच शत्रु मेला तरी मरूनहि तो स्वप्नांत त्रास देऊं शकतो. अशा रीतीनें अनुकूल प्रतिकूल-देवतांची मनुष्य कल्पना करूं लागतो.

नुकतेंच वारलेले जगप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ डॉ. फ्रॉइड यांनीं ईश्वराच्या कल्पनेचा उगम कसा होतो याची एके ठिकाणीं खालील-प्रमाणें मीमांसा केली आहे.

'आपणांस मुलांच्या मनामध्यें वेगवेगळ्या भावना उत्पन्न झालेल्या दिसतात. त्यांना आपण कधीं बापासारखें व्हावें असें वाटतें तर कधीं आईसारखें व्हावें असें वाटतें. कालांतरानें आणखी एक तिसरीच भावना त्यांच्यामध्यें उत्पन्न होतांना दिसते. एखाद्याला चार-पांच मुलगे जर असले तर त्या मुलांना कधीं बापासारखें व्हावें व कधीं आईसारखें व्हावें असे तर वाटतेच. पण पुढें पुढें त्यांच्या अंतःकरणांत आईविषयीं लैंगिक आकर्षण उत्पन्न होऊन ते बापाचा द्वेष करूं लागतात. कारण बाप त्यांच्या कामवासनेच्या आड येणारा जबरदस्त आडथळा ठरणार. यामुळें त्यांना बापाला ठार मारून त्याचा कांटा काढावा असें सुद्धां वाटूं लागते; पण समाजाचीं बंधनें त्यांस तसें करूं देणार नाहींत. यामुळें ती वासना अंतःकरणांत तशीच दडपून राहते व त्यांतूनच Aeudipus गंड तयार होतो. अशीच अवस्था अगदीं पुरातन काळीं झाली असावी. फरक येवढाच कीं त्या काळीं सामाजिक बंधनें निर्माण झालेलीं नसल्यानें मुलांनीं बापाला ठार मारलें असलें पाहिजे. पण पुढें कामवासना पूर्ण करण्या-ऐवजीं त्यांना बापाला मारल्याबद्दल पश्चात्ताप झाला असावा. आणि त्या पापांतून मुक्त होण्याकरितां आपल्या कुटुंबाचें अथवा ज्ञातीचें

प्रतीक (totem)* समजलेल्या प्राण्याचें मांस खाणें ते निषिद्ध समजूं लागले असले पाहिजेत. तसेंच, सर्वांना दडपून आपली कामपूर्ति करणारा त्यांच्यात कोणीच नसल्यामुळें जे मुलगे मागें राहिले त्या सर्वांनीं मोठ्या जुलमानें परस्त्री-गमन पाप ठरविलें असलें पाहिजे. अशा रीतीनें खाद्याखाद्य व सेव्यासेव्य-विषयक नीतिनियमांचा उगम झाला असावा.

कुटुंबाच्या अथवा ज्ञातीच्या प्रतीकाचीं उपासना हें धर्माचें मूळ स्वरूप होय. ईश्वराची कल्पना उत्पन्न होण्याला आणखी एका गोष्टीची कल्पना करणें अवश्य आहे. वडील वारल्यानें मुलांच्या डोक्यावरील छत्र नाहींसें झालें व त्यांना रक्षणाची गरज भासूं लागली. त्या वेळीं त्यांनीं कुटुंबाचा एक पितृदेव निर्माण केला असावा व हाच ईश्वराच्या कल्पनेचा उगम असला पाहिजे. कारण या कल्पनेनें नैसर्गिक घटनांतून उत्पन्न होणारी भीति याचा उलगडा होऊं लागला. आणि पितृदेवाला संतुष्ट केलें असतां तो आपलें रक्षण करील अशी खात्री वाटूं लागली. मरणाची भीतीहि यामुळें आपोआपच कमी झाली.'

अशा रीतीनें धर्म हा Aeudipus गंडावर उभारला गेला आहे व तो एक प्रकारचा रोग ( Neurosis ) आहे. फ्राइड धर्माला दडपलेल्या भावनाजन्य, मानवी मनाला जडलेला रोग

---

* अमेरिकेंतील नेग्रोसारख्या अडाणी लोकांत अशी चाल असे कीं एकादें जनावर, एकादा पक्षी अगर एकादें झाड याला आपल्या कुटुंबाचें अथवा ज्ञातीचें प्रतीक समजत असत. ज्या प्राण्याचा व आपला रक्ताचा संबंध आहे असे ते समजत अशासच प्रतीक समजलें जाई व अर्थातच अशा जनावरासंबंधीं अथवा झाडासंबंधीं त्या त्या कुटुंबांकडून आदर दर्शविला जाई. असें कुटुंबाचें अथवा ज्ञातीचें मननीय प्रतीक याला ( totem ) असें म्हणतात.

( Universal Obsessional Neurosis of humanity ) असें म्हणतो. धर्म व ईश्वर यांच्या कल्पनांचा जो इतिहास डॉ. फ्राइडनें दिलेला आहे त्याचें अधिक मंडनखंडन करण्याचें कारणच नाहीं. थोडा विचार करून वाचीत असतां कोणासहि सहज कळून येईल कीं, डॉ. फ्राइडनें किती तरी गोष्टी यांत गृहीत धरल्या आहेत. इतर मानसशास्त्रवेत्ते, खुद्द त्याच्या पंथांतले लोकसुद्धां, हा इतिहास वस्तुस्थितिनिदर्शक आहे असें मानीत नाहींत.'

या बाबतींत योगाची कल्पना लक्षांत ठेवण्यासारखी आहे. योगसूत्रकारांचें म्हणणें असें आहे कीं ईश्वरानेंच आपलें यथार्थज्ञान माणसास दिलें असलें पाहिजे. ईश्वराचें प्रत्यक्ष ज्ञान होतें व त्याचा मार्ग गुरुच्या द्वारा कळतो असें ते मानतात. मनुष्यास प्रथम जें ज्ञान झालें तें कसें झालें ? या प्रश्नास त्यांचें उत्तर ईश्वरानेंच तें ज्ञान मनुष्यास दिलें असें आहे. व म्हणून योगसूत्रकार ईश्वरास ' स एष पूर्वेषामपि गुरुः ' असें म्हणतात. याचा विशेष विचार पुढें पांचव्या प्रकरणांत केला आहे.

आतां ईश्वराच्या कल्पनेची वाढ कशी होत गेली असावी हें पाहूं. या बाबतींत पुष्कळांचें म्हणणें असें आहे कीं मनुष्यानें प्रथम निसर्गाला भिऊन अथवा वेगवेगळ्या ज्ञातींचे संरक्षक म्हणून वेगवेगळ्या देवतांची कल्पना केली असली पाहिजे. तेव्हां प्रथम मनुष्य हा अनेक देवता मानणारा ( Polytheist ) असावा असें मानणें अयुक्तिक होणार नाहीं. त्याला जगाचा अनुभव जसजसा अधिक येऊं लागला, व त्याचा तो जसजसा अधिक विचार करूं लागला, तसतसें त्याला आढळून आलें असलें पाहिजे, कीं या जगांत सर्वांची सारखी सत्ता नाहीं. जबरदस्तांतहि एखादा असा असतो कीं त्याला इतर दांडगेश्वरहि वचकतात. हाच न्याय त्यानें देवांनाहि पुढें

लावला असावा. त्यानें अशी कल्पना केली असावी कीं, या देवांमध्यें सुद्धां कोणी इंद्रासारखा सर्वांत श्रेष्ठ असला पाहिजे व इतर त्याचे आज्ञाधारी असले पाहिजेत.

पुढें या जगांतील हालचाली, त्यांतील व्यवहार हे सर्व आपल्या सूक्ष्म बुद्धिद्वारा पाहतां पाहतां मनुष्यास असें आढळून आलें असलें पाहिजे कीं, जग म्हणजे वेगवेगळ्या भांडखोर देवतांना खेळण्याची भूमि नव्हे. येथें कांहीं नियम आहे; नव्हे, सर्व गोष्टी जणूं काय एखाद्या शास्त्याच्या इच्छेप्रमाणें चालत आहेत. यावरून त्याला सर्व सत्ताधारी, सर्वांचा नियामक अशा एका देवाची कल्पना सुचली असली पाहिजे. असा एकच सर्व सत्ताधारी, नियामक, ईश्वर आहे असें मानणाऱ्यास एकेश्वरवादी (Monotheist) म्हणतात.

अनेक देवतांच्या कल्पनेंतून एका देवाची कल्पना जशी निघाली, तशीच क्रूर, हिंस्र अशा देवतांमधून दयाळु, सर्वांना सारखा वागविणारा, सर्वज्ञ अशा देवाची कल्पना विचारानें निघाली असली पाहिजे. निसर्गाच्या क्रियांत अनुकूलप्रतिकूल, बऱ्या-वाईट सर्व प्रकारच्या कृति असतात. तसेंच, ज्ञातींचे संरक्षकहि आपापल्या संघांचे रक्षक पण दुसऱ्या संघांचे भक्षक, द्वेषी असतात. तेव्हां मनुष्यानें पहिली देवांची कल्पना जी केली, ती बळी घेणारा, मांसभक्षक, आपल्या भुकेकरितां दुसऱ्यांना पीडा करणारा अशाच देवांची केली असेल. असे देव कल्पून तो त्यांना भिऊ लागला असला पाहिजे व बळी देऊं लागला असला पाहिजे. पुढें पुढें त्याला निसर्ग हा रक्षणहि करतो असें दिसून आल्यापासून उग्र देवतांच्या बरोबर दयाळु, प्रेमी अशा देवांचीहि त्यानें कल्पना केली असावी. हीच कल्पना वाढतां वाढतां, व जगाचें यथार्थ ज्ञान होतां होतां जगाच्या बुडांशीं आपणांस दयाळु, सर्वज्ञ, सर्व शक्तिमान् अशी शक्ति दिसते, अशी

त्यानें कल्पना केली असावी. याचा परिणाम त्याच्या पूजेच्या प्रकारां-वर झालेला दिसून येईल. देवांना बळी देण्याच्या ऐवजीं तो आतां त्याची प्रार्थना करूं लागतो अथवा देवाच्या इच्छेनुसार जें जें घडेल तें तें आपल्या कल्याणाकरितांच आहे असें मानूं लागतो. त्याला आतां देवाची भीति वाटत नाहीं.

यावरून असें दिसतें, कीं बुद्धीचा जसजसा विकास होतो, तिला अंतर्बाह्य जगाचें स्वरूप जसजसें समजूं लागतें तसतसा ईश्वरविषयक ज्ञानांत फरक पडत जातो. वर जो इतिहास दिला आहे, तो सम-जण्यास खालील इसापनीतींतील एका गोष्टीचा उपयोग होईल असें जाणून ती गोष्ट देत आहोंत, ती अशीः—

'एकदां एका कोल्ह्यानें प्रथमच मृगराजास दुरून पाहिलें. त्याची आयाळ व उग्र चेहरा पाहून व त्याची गर्जना ऐकून प्रथम दर्शनीं त्या कोल्ह्यानें पलायनच केलें. पुढें कांहीं प्रसंगानें जरा जवळून अशी त्या दोघांची गांठ पडली. त्यावेळी त्या कोल्ह्याला थोडे धैर्य प्राप्त झालें व तो टक लावून त्या मृगराजाचें निरीक्षण करूं लागला. पुढें पुढें वारंवार गांठी पडून मृगराजाचा उदार स्वभाव त्यास कळून आल्यावर त्या कोल्ह्याच्या मनांतील भीति पार गेली व त्या दोघांत प्रेमभाव उत्पन्न होऊन दोघे मोठें खेळीमेळीनें वागूं लागले.'

असाच कांहींसा प्रकार वरील देवाच्या कल्पनेच्या वाढींत आहे हें वाचकांच्या सहज लक्षांत येईल.

हें प्रकरण संपविण्यापूर्वीं प्रस्तुत विषयाबावत खालील तीन गोष्टींच्याकडे वाचकांचें लक्ष वेधणें अवश्य आहे.

( १ ) वरतीं देवाच्या कल्पनेच्या विकासाच्या तीन पायऱ्या—

अनेक देवता, एक श्रेष्ठ देवता व एकच देव–दिल्या आहेत. त्या-संबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे व ती अशी कीं जगांत अत्यंत जुनाट ग्रंथ जे वेद त्या वेदांत अनेक देवतांच्या वर्णनाबरोबरच एकच देव आहे असें सांगणाऱ्याहि ऋचा आहेत.

एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ।—
एकं संतं बहुधा कल्पयन्ति ।

( २ ) मोठ्या सुधारलेल्या देशांतसुद्धां अजून अनेक देवता मान-णारे व त्यांना संतुष्ट करण्याकरितां बळी देणारे लोक आहेत. पण येवढी गोष्ट खरी कीं दिवसेंदिवस या लोकांची संख्या कमी होऊन 'देवोदेवी' एकच देव आहे असें मानणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

( ३ ) वर जो ईश्वराच्या कल्पनेच्या वाढीचा इतिहास दिला हा अपुरा आहे. कारण शंकराचार्यांनीं जो अद्वैत वेदांत प्रतिपादन केला, त्यांत नुसता एकेश्वरी वाद नव्हे; तर " जीवो ब्रह्मैव नापरः " असें सांगितलें आहे. एकेश्वरी वादापर्यंत द्वैती भक्तिमार्गी पोंचतात. पण शंकराचार्यांनीं जे मत मांडलें, तें या विकासाचें शिखरच होय. ' जीवाचें मूळ स्वरूप पाहूं गेलें तर तो ब्रह्मच आहे. जीव आपल्या यथार्थ रूपाला ओळखत नाहीं येवढेंच !' असें शंकराचार्यांचें म्हणणें आहे. ईश्वराच्या कल्पनेचा विकास सांगणें झाल्यास या मताचाहि उल्लेख करणें अवश्य आहे. वर एकेश्वरी वादापर्यंत विचार सांगितला, त्याचे कारण सामान्यतः या कल्पनेच्या वाढीचा इतिहास सांगतांना तो येथवरच दिला जातो म्हणून !

# आर्यदर्शनांतील ईश्वराची कल्पना : : : ४

ईश्वरसिध्दीच्या पुराव्यांची चर्चा पौर्वात्य व पाश्चात्य अशा दोन विभागांत करण्याचें आम्हीं ठरविलें आहे. यांत नुसती सोयच नाहीं, तर एकाच मनाचे भिन्न परिस्थितींत कसकसे आविष्कार होतात हेंहि या योगानें पाहण्यास सहजच सांपडेल. विचार करणारें मानवी मन जरी एकच असलें, तरी ज्या परिसरांत तें अभिव्यक्त होतें त्याचा त्याच्या आविष्काराच्या रूपावर परिणाम झाल्याशिवाय राहत नाहीं. पाणी एकच असलें तरी ज्या जमिनीवरून तें वाहील त्याचे गुणधर्म जसे पाण्याला लागतात, तसेंच विचारगंगेचेहि आहे.

पौर्वात्य देशांतील समाजरचना, त्या समाजाची वेळोवेळीं वेगवेगळ्या प्रकारानें झालेली वाढ ही पाश्चात्य देशांतील समाजरचना, तेथील समाजाची वाढ याहून भिन्न असणारच; आणि याचा परिणाम त्या त्या देशांतील तत्त्वज्ञानावर झाल्याशिवाय राहणारच नाहीं. म्हणून ईश्वरविषयक चर्चेस या दोन प्रदेशांत स्वाभाविकच वेगवेगळें रूप प्राप्त झालें आहे. येवढ्याकरितां या दोन प्रदेशांतील मतें वेगवेगळ्या विभागांत विचारासाठीं घेऊं.

या पुस्तकांत पौर्वात्य मतांपैकीं फक्त आर्यदर्शनांचाच विचार मांडला आहे. इतर देशांतील मतांचा विचार मांडणें जागेच्या अभावीं अशक्य आहे.

आपले आर्यावर्त अथवा हिंदुस्थान हें धार्मिक प्रवृत्तींचें, किंबहुना देवपिसें म्हणून जगतांत प्रसिद्ध आहे. इतर देशांतील लोक तर याला

देवाधर्माचा, ऋषिमुनींचा, साधुसंतांचा देश म्हणूनच ओळखतात. आणि हें जरी बहुतांशीं खरें असलें, तरी त्यांत ईश्वराचें अस्तित्व न मानणारे नास्तिक नव्हते अथवा नाहींत असें मुळींच नाहीं. उलटपक्षीं इतर देशांत देवधर्म मानणारे नाहींत हें ही खरें नाहीं. आर्यावर्त म्हणजे ऋषिमुनींचा देश, वगैरे जें विधान ऐकतों त्याचा अर्थ इतकाच कीं इतर देशांपेक्षां आमच्या लोकांचा स्वाभाविक कल देव मानण्याकडे व त्याचा विचार करण्याकडे विशेष आहे. एवढें खरें, कीं ज्या देशांत अगदीं खालच्या थरापर्यंत ईश्वरविषयक विचार पोंचला आहे व ज्या देशांतील लोकांचा जीवनाकडे पाहण्याचा कोन धार्मिक आहे असा देश पृथ्वीच्या पाठीवर दुसरा नसावा असें म्हटल्यास अतिशयोक्ति होईल असें लेखकास वाटत नाहीं. ‘मनुष्य जात सकळ। स्वभावता भजनशील’ ही ज्ञानेशोक्ति सामान्यपणें सर्व मनुष्यवर्गासंबंधीं जरी खरी असली, तरी आपलें रोजचें जीवन, नेहमींचा व्यवहारसुद्धां धर्माच्या चष्म्यांतून पाहणें हा आर्यावर्तातील लोकांचा विशेष आहे, यांत शंका नाहीं. ही जी आर्यावर्ताची धार्मिक मनोभूमिका तयार झाली याला कारण हजारों वर्षापूर्वी होऊन गेलेले याज्ञवल्क्यादि मंत्रद्रष्टे ऋषि, भगवान् रामकृष्ण, व्यासवाल्मीक्यादि संस्कृत कवि, भाषाग्रंथकर्ते तुलसीदास, ज्ञानदेव, तुकोबा, इत्यादि ज्या महान् शेंकडों विभूति होऊन गेल्या यांचेच प्रयत्न. यासंबंधींचें इतकें विवेचन, आपल्या देशांत या प्रश्नाचा विचार फार पुरातन कालापासून व फार खोल पर्यंत केला गेला आहे या विधानाची सत्यता पटण्यास पुरेसें आहे.

कालानुक्रमानें या देशांतील देवाच्या कल्पनेचा इतिहास देऊन तिचा विकास कसा कसा होत गेला हें सांगितल्यास तो एक स्वतंत्र ग्रंथच होईल. तेव्हां त्या मार्गाचें अवलंबन न करतां, या देशांत मूलतत्त्वाचा

विचार करणारीं जीं दर्शनें अथवा शास्त्रें होऊन गेलीं, त्यांच्याच मतांचा या प्रकरणांत थोडक्यांत विचार करण्याचें योजिलें आहे.

आर्यदर्शनांत आस्तिक व नास्तिक असा भेद केला जातो; पण या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, हा भेद ईश्वराचें अस्तित्व मानणें व न मानणें यावर अवलंबून नाहीं. ईश्वराचें अस्तित्व न मानूनसुद्धां या देशांत दर्शन आस्तिक होऊं शकतें. आस्तिक व नास्तिक या दोन शब्दांची शास्त्रीय व्याख्या अशी आहे कीं, जो वेदप्रामाण्य मानतो तो आस्तिक व तें मानत नाहीं तो नास्तिक. क्वचित् ठिकाणीं जो परलोक मानत नाहीं तो नास्तिक व परलोकाचें अस्तित्व मानणारा तो आस्तिक अशाहि नास्तिक–आस्तिक शब्दांच्या व्याख्या दिलेल्या आढळतात; पण दुसरी व्याख्या मान्य केल्यास एक चार्वाक् तेवढाच नास्तिक ठरेल. यांपैकीं कोणतीहि व्याख्या जरी घेतली तरी वर म्हटल्याप्रमाणें शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें तर आस्तिकपणा व नास्तिकपणा यांचा ईश्वराच्या अस्तित्वाशीं कांहीं संबंध येत नाहीं. अर्थात्च या प्रश्नाकडे पाहण्याची ही शास्त्रीय दृष्टि झाली. सामान्य मनुष्याची आस्तिक व नास्तिक या शब्दांची व्याख्या अशीच आहे कीं, जो ईश्वराचें अस्तित्व मानीत नाहीं तो नास्तिक व जो मानतो तो आस्तिक. आस्तिक–नास्तिक शब्दांबद्दल इतकें सांगितल्यानंतर आपण आस्तिक व नास्तिक दर्शनांकडे वळूं.

प्रथम नास्तिक–दर्शनें काय म्हणतात तें पाहूं. चार्वाक्‌दर्शन, माध्यमिक, योगाचार, सौत्रांतिक, वैभाषिक हीं चार बौद्ध व जैन अशीं एकंदर सहा नास्तिक दर्शनें म्हणून समजलीं जातात. यांपैकीं विरोचनादि **चार्वाक्** हे प्रत्यक्ष प्रमाणवादी असल्यानें त्यांचें म्हणणें असें आहे कीं, धर्माधर्माचीं फळें भोगवणारा नियामक ईश्वर आपल्या

इंद्रियांना दिसत नाहीं, अर्थात् तो नाहींच! परलोक व ईश्वर दोन्हीही नाहींत असें ते या एकाच कारणास्तव म्हणतात.*

**बौद्धदर्शनें**:—बौद्ध धर्म-संस्थापक बुद्ध अथवा सुगत यानें काय प्रतिपादिलें व त्याच्या शिष्यांनीं त्यांत कमीजास्त करून काय प्रतिपादिलें हें जरी निश्चित सांगतां येणें कठीण असलें, तरी कांहीं कल्पना खास मूळ बुद्धाच्याच असाव्यात असें निश्चित म्हणतां येतें. नैरात्म्यवाद व क्षणिकत्व या दोन कल्पना मूळ बुद्धाच्याच समजल्या जातात. पाश्चात्य देशांत हिरॅक्लिटस् हा जसा स्थिर पदार्थ मानायलाच तयार नाहीं, तसेंच बुद्धाचेंहि आहे. वाहतें पाणी किंवा आलातचक्र ( फिरतें कोलीत ) ह्याप्रमाणें हें दृश्य क्षणभरहि एकाच स्थितींत न राहतां सारखें बदलतें आहे ही बुद्धाची कल्पना चारी बौद्धदर्शनांना मान्यच आहे. हें चारीहि दर्शनकार बदलत्या उपाधींत स्थिर असणारा, आपल्या कर्माचीं फळें भोगणारा असा जीवात्माच मानीत नाहींत. अर्थातच ते सर्व नैरात्म्यवादी आहेत. तेव्हां धर्माधर्म भोगवणारा नियामक ईश्वर ते मानीत नाहींत हें अगदीं स्वाभाविक आहे.

**जैनदर्शन**:—कालगणनेच्या दृष्टीनें हें दर्शन बौद्धदर्शनांपेक्षां जुनें आहे असें समजलें जातें. महावीर याचा मुख्य उत्पादक समजला जातो. जैन हे आस्तिक आहेत अथवा नास्तिक आहेत हें या

---

* म्हणोनि देव गोसावी । तो धर्माधर्म भोगवी ।
आणि परत्राच्या गांवीं । करी तो भोगी ॥
परि परत्र ना देवो । न दिसे म्हणोनि तें वावो ।
आणि कर्ता निमे मा ठावो । भोग्यासि कवण ।

ज्ञा. अ. १६, २०६-२०७.

शब्दांच्या अर्थावर अवलंबून राहील. वेदप्रामाण्य न मानणें या अर्थानें ते नास्तिक आहेत. तसेंच, जगाचा नियामक एक ईश्वर आहे असें न मानणारा तो नास्तिक या अर्थानेंहि ते नास्तिकच आहेत. कारण, त्यांच्या मतें, ईश्वरास जगत् निर्माण करण्याची गरज वाटावी हें त्याच्या पूर्णतेशीं विसंगत आहे. तेव्हां ईश्वर नाहींच व जगत् कोणी केलें नाही असें त्यांचें मत आहे. पण मौज अशी आहे कीं, या अर्थानें खुद्द मीमांसक हेहि नास्तिक व निरीश्वरवादीच ठरतील. याबद्दल आपण मीमांसेचा विचार करण्याची पाळी येईल त्यावेळीं अधिक पाहूं. जगत्कर्ता व त्याचा नियामक एक ईश्वर जैन मानीत नसले तरी ते देवत्वच नाकबूल करतात असें मात्र नव्हे. त्यांच्या मतें *जीवांतील सुप्त शक्ति जागृत झाल्या म्हणजे तोच ईश्वर अथवा अर्हत् होतो. ईश्वर हा शब्द परमोच्च कोटीला पोंचलेल्या आत्म्याचा वाचक असा आहे. असा ‘ पुरुषोत्तम ’ होणें हेंच मानवी जीविताचें ध्येय होय.

**आस्तिक दर्शनें:**— आस्तिक दर्शनांचा विचार मांडण्यापूर्वी महत्त्वाची पण जी बहुधा डोळ्याआड केली जाते अशी एक गोष्ट या ठिकाणीं सांगणें प्रस्तुत लेखकास अवश्य वाटतें. आर्यतत्त्वज्ञानावर असा एक मोठा जबरदस्त महत्त्वाचा व मूलग्राही आक्षेप घेण्यांत येतो कीं, आर्यांच्या आस्तिक दर्शनांतील विचार हे तत्त्वज्ञान म्हणण्याच्या योग्यतेचे नाहींत. कारण ते वेदप्रामाण्य मानून त्या ग्रंथांवरील श्रद्धेवर उभारलेले आहेत. याला उत्तर म्हणून तूर्त इतकेंच सांगणें पुरें कीं,

---

* सर्वज्ञो जितरागादिदोषस्त्रैलोक्यपूजितः ।
यथास्थितार्थवादी च देवोऽर्हन् परमेश्वरः ॥
— हेमचंद्रसूरी.

आर्यावर्तांत वेदप्रामाण्य मानण्याचा जरी आस्तिक लोक आग्रह धरीत असले तरी त्या वेदाचा अर्थ करण्याची स्वतंत्रता तत्त्वचिकित्सकाला येवढी ठेवली आहे, कीं त्यानें त्यांतून ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होतें असें म्हणावें, अथवा होत नाहीं म्हणून म्हणावें. तो यापैकीं कांहीहि वेदाच्या आधारावर म्हणाला तरीसुद्धां तो आस्तिकच समजला जातो. 'आर्यतत्त्वज्ञानांतील षड्दर्शनें' या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत प्रो. मॅक्सम्युलरांनीं स्पष्ट म्हटलें आहे, कीं जिचें अस्तित्व नाकारण्याबद्दल एकोणिसाव्या शतकापर्यंत अगदीं पुढारलेल्या स्वातंत्र्याच्या भाक्त्या देशांतसुद्धां शिक्षा केली जात असे अशी ईश्वराची कल्पना मान्य केली नाहीं म्हणून हिंदुस्थानांत कोणास कधीं फांशीं दिलें नाहीं. येवढेंच नव्हे तर सांख्यसूत्रकार कपिल हे संपूर्ण सृष्टीची रचना ईश्वरावांचून सिद्ध करीत असतांना सुद्धां त्यांना कोणी नास्तिक म्हटलें नाहीं, इतकी स्वतंत्रता या देशांतील तत्त्वज्ञानाच्या कक्षेंत आहे.

या सर्व दर्शनासंबंधी आणखी एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. हीं सर्व आस्तिक दर्शनें प्रथम जीवात्म्याची सिद्धि करतात. कारण जर सुखदुःखादिकर्मफलें भोगणारा नित्य जीवात्मा मानला तरच ईश्वराची गरज भासेल व त्याची सिद्धि शक्य कोटींत येईल. नित्य जीवात्माच नाहीं तर ईश्वरहि नाहीं हें ओघानेंच येतें. म्हणून हे दर्शनकार देहादिस्थूल-सूक्ष्म-संघाताव्यतिरिक्त चेतन पुरुष अथवा आत्मा आहे असें प्रथम सिद्ध करतात व मग ईश्वराच्या प्रश्नाकडे वळतात. आतां आस्तिकदर्शनांच्या ईश्वरविषयक चर्चेकडे वळूं.

आस्तिक दर्शनें सहा आहेतः—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व वेदान्त. प्रथम सांख्ययोगाचें मत पाहूं.

**सांख्य व योगः**—सांख्यशास्त्राचे कर्ते कपिल व योगाचे पतंजली होत. पण पुष्कळ वेळेला सांख्य मताचेच निरीश्वर सांख्य

व सेश्वर सांख्य असे दोन विभाग केले जातात. व सेश्वर सांख्य म्हणजेच योग असें समजलें जातें. पण सूक्ष्मदृष्टीनें विचार केल्यास असें आढळून येईल कीं, हे जे सेश्वर व निरीश्वर म्हणून सांख्यांत दोन भाग केले जातात ते सांख्य व योग यांचीं स्वरूपें खरीं न समजल्यामुळें केले जातात. मूळांत ही गोष्ट प्रथम लक्षांत ठेवली पाहिजे, कीं योगशास्त्र जरी ईश्वर मानत असलें तरी 'जेणें हें विश्व निर्मियेलें' असा प्रभु ईश्वर तें शास्त्र मानीत नाहीं. त्या दर्शनानें ईश्वर हें नांव विशिष्ट गुण असलेल्या एका पुरुषास दिलें आहे.

योगसूत्रांत खालीलप्रमाणें ईश्वराची व्याख्या आढळते:—

क्लेशकर्मविपाकाशयैरपरामृष्टः पुरुषविशेष ईश्वरः ।

समाधिपादसूत्र २४

जर्मन तत्त्ववेत्ता लायबिनिट्झ याचेंहि जवळ जवळ असेंच मत आहे. तो ईश्वर म्हणजे Monad of Monads असेंच म्हणतो.

तात्पर्य, योगानें ईश्वर मानला. पण तो अनेक पुरुषांपैकीं एक उच्च गुणांनीं संपन्न असा पुरुष असा मानला व त्याची भक्ति केली असतां ज्ञान प्राप्त होऊन मनाला स्थिरता प्राप्त होते असें तें शास्त्र सांगतें. पण याचा अर्थ योगशास्त्र जगत्कर्ता ईश्वर मानतें असा होत नाहीं. योगशास्त्र जगत्निर्माता ईश्वर मानतें, हा एक योग अद्वैती आहे अथवा तो जीवेश्वरांचें ऐक्य प्रतिपादितो अशासारखाच अज्ञानजन्य भ्रम आहे.

योगासंबंधानें जें वर सांगितलें, त्याच्या उलट सांख्यदर्शनाचें आहे. सांख्यदर्शन जर ईश्वर मानीतच नसतें तर त्यानें ईश्वर आहे या मताचें खंडन केलें असतें. पण तत्त्वसमासांत अथवा सांख्यसूत्रांत् ईश्वराचें खंडन नाहीं. शिवाय 'ईश्वरासिद्धेः' या सूत्रावर विज्ञानभिक्षूंनीं जें भाष्य केलें,त्यांत ते स्पष्ट म्हणतात कीं, या सूत्राचा अर्थ

येवढाच कीं, ईश्वर दुर्विज्ञेय आहे. कारण जर तसें नसतें तर 'ईश्वराभावात्' असें स्पष्ट सूत्र असतें. शिवाय पुराणांत जेथें सांख्यांचा उल्लेख येतो तेथें सेश्वर सांख्यच सांगितले जातात. या सर्वांचें तात्पर्य येवढेंच दिसतें कीं, सांख्यदर्शनाच्या प्रथमअवस्थेंत, जगताची रचना सांगतांना, कपिलांना ईश्वराची गरज भासली नाहीं, व त्यांनीं त्या कल्पनेचा उल्लेख केला नाहीं. परंतु पुढें इतर टीका, प्रतिटीका झाल्यानंतर, ईश्वराची कल्पना प्रामुख्यानें पुढें येऊन बसल्यावर ती अजिबात नाकारणें कठीण होऊन बसलें व सांख्य टीकाकार कपिलाच्या मुग्धतेचा फायदा घेऊन 'उल्लेख नाहीं' याचा अर्थ 'गरज भासली नाहीं' येवढाच घ्यावा असें करूं लागले असावेत.

तात्पर्य; ही गोष्ट खरी आहे कीं, जो भेद आज निरीश्वर व सेश्वर म्हणून केला जातो तो दोन्ही शास्त्रें न समजूनच केला जातो. कारण योगशास्त्रानें मानलेला ईश्वरसुद्धां जगत्कारण म्हणून मानलाच नाहीं.

आतां जो ईश्वर योगशास्त्र मानतें त्याच्या सिद्धिकरितां योगशास्त्रानें जे दोन पुरावे आणले आहेत ते पाहूं. खालील दोन्ही सूत्रांत दोन अनुमानें सुचविलीं आहेत.

(१) तत्र निरतिशयं सर्वज्ञबीजम् ॥ (१–१९)

(२) स एष पूर्वेषामपि गुरुः कालेनानवच्छेदात् ॥

समाधिपाद २५-२६

(१) आपणांला व्यवहारामध्यें असें दिसतें कीं, एकापेक्षां दुसरा अधिक शहाणा अथवा ज्ञाता असतो. आपण हें मान्य करून जर ज्ञात्यांची ओळ तयार करूं लागलों तर एक ओळच्या ओळ तयार करतां येईल. पण त्याचाहि शेवट कल्पिलाच पाहिजे. कारण तरतम-

भावाच्या पदार्थांनासुद्धां सीमा आहेच. जो कोणी सर्वज्ञ–ज्ञात्यांतला श्रेष्ठतम–ठरला जाईल तोच ईश्वर होय.

(२) आपणांला जगांत एकानें दुसऱ्याला ज्ञान देण्याचा संप्रदाय दिसतो. या संप्रदायाचा आद्यप्रवर्तक कोणीतरी असलाच पाहिजे व तोच ईश्वर होय. कारण तो अनादि आहे.

यांतील पहिल्या प्रमाणाचें ॲनूसेमच्या प्रमाणाशीं पुष्कळ साम्य आहे. ह्याचा विचार पुढील प्रकरणांत आला आहे.

योगानें ईश्वरसिद्ध्यर्थ जीं दोन प्रमाणें दिलीं आहेत, तीं ज्ञानावर अधिष्ठित आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. योगशास्त्रांत जगताला कारण अव्यक्त प्रकृति आहे. जगदुत्पत्तीशीं ईश्वराचा संबंध येत नाहीं. पण ज्ञान, योगसुखाचा अनुभव यांची जी अव्याहत परंपरा आहे त्या करतां ईश्वर मानावाच लागतो, असें त्या शास्त्राचें म्हणणें आहे.

**न्याय व वैशेषिक** : जगाचें निमित्त कारण म्हणून अगदीं स्पष्टपणें स्वतंत्र तत्त्व म्हणून जर षड्दर्शनांपैकीं कोणतीं दर्शनें ईश्वर मानत असतील, तर तीं न्याय व वैशेषिक हीं होत. जगताचें उपादनकारण परमाणु होत. तेव्हां त्यांचा संयोग होऊन जगत् निर्माण होण्यास, ज्याची इच्छा कारणीभूत होते असा एक ईश्वर आहे असें, हीं दोन्हीं दर्शनें मानतात. यांच्यामतें जीव व ईश्वर यांत असा फरक आहे कीं जीवाचा ज्ञान हा गुण आगमापायी म्हणजे जाणारा येणारा आहे. त्याचें ज्ञान अल्प आहे. ईश्वराचा ज्ञानगुण नित्य आहे. यामुळें तो नित्य व अनंत ज्ञान संपन्न आहे असें ते म्हणतात.

वैशेषिकदर्शन हें अनुमानप्रमाणानें ईश्वराची सिद्धि करतें. आपण जे जे घटादि पदार्थ पाहतों, त्यांचा कर्ता कोणी एक असतोच. पृथ्व्यादि पदार्थांचाहि कर्ता हवाच; कारण ते कार्यच आहेत.

आतां पृथ्व्यादि सावयव पदार्थांचा कर्ता तर मानणें अवश्य आहे; पण अल्पज्ञ, अल्पशक्तिमान् असा जीव त्यांचा कर्ता होऊं शकत नाहीं. तेव्हां जीवाव्यतिरिक्त कोणीं तरी सर्व शक्तिमान् कर्ता मानणें अवश्य आहे व तोच ईश्वर होय, असें त्यांचें अनुमान आहे.

नैय्यायिकहि अनुमानानेंच ईश्वराची सिद्धि करतात; पण त्यांच्या अनुमानाचें स्वरूप वेगळें आहे. तें खालील सूत्रांत दिलें आहे:—

ईश्वरः कारणं पुरुषकर्माफल्यदर्शनात् ।

जीव प्रयत्न करतो; पण त्याच्या प्रयत्नास हवें तसें फळ येतेंच असा नियम नाहीं. तेव्हां यावरून ही गोष्ट उघड होते कीं, जीव कर्मफलाच्या बाबतींत पराधीन आहे. तेव्हां ज्याच्या स्वाधीन जीवकृतकर्मांचें फळ आहे तो ईश्वर होय. अचेतन सचेतनाच्या योगानें कार्य प्रवृत्त होतें. जीवकृत कर्म जड आहे. अचेतन कर्म ज्या सचेतनाच्या सत्तेनें अधिष्ठित झालें असतां व्यक्त होतें तो सचेतन सर्वज्ञ ईश्वर होय.

न्यायकुसुमांजलींत उदयनाचार्यांनीं ईश्वरसिद्धीकरितां वेगवेगळीं प्रमाणें दिलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं दिलीं आहेत:—

( १ ) सृष्टिगत सागर, पर्वत वगैरे सर्व पदार्थ कार्य आहेत, व व्यवहारांत कारणाशिवाय कार्य उत्पन्न झाल्याचें आपणांस दिसत नाहीं; तेव्हां सागरादिक पदार्थांचेंहि कांहीं कारण असलेंच पाहिजे व तें ईश्वर होय.

( २ ) विज्ञानवादी ही सृष्टि परमाणूंच्या मीलनाने उत्पन्न झाली असें म्हणतात. पण हें मीलन करणारा कोणी तरी असलाच पाहिजे, कारण परमाणू जड आहेत; आणि तोच ईश्वर होय.

( ३ ) सृष्टींत सर्व व्यवहार नियमानें चाललेले दिसतात. अर्थात्च सृष्टीचा नियामक कोणी तरी असला पाहिजे व तोच ईश्वर होय.

(४) प्राण्यांना बोलण्यास ज्यानें प्रथम शिकविलें तोच ईश्वर होय.

( ५ ) ध्वनिरूप वेदनिर्माता ईश्वरच होय.

( ६ ) वेदांत ज्ञान देण्याची शक्ति ज्यानें घातली तो ईश्वरच होय.

( ७ ) सृष्टीच्या आरंभीं कोणते काम कसें होणार हें ज्यानें दाखविलें तो ईश्वरच होय.

**पूर्वमीमांसा**:—हें आस्तिकांतलें आस्तिक दर्शन समजलें जातें. पण हें दर्शनसुद्धां जगतास उत्पन्न करणारा व त्याचा नियामक असा ईश्वर मानीत नाहीं. हें दर्शन अग्नि, वरुण, इंद्र इत्यादि देवता मानतें, परलोक मानतें व जीवात्मा हा कर्मांच्या योगानें देवत्वाप्रत प्राप्त होतो असेंहि मानतें व त्याकरितां वेगवेगळ्या कर्मांचीं विधानें करतें. परमाणूंचें बनलेलें हें जगत् प्रवाहरूपानें अनादि आहे असें या दर्शनाचें मत आहे. ईश्वरपर श्रुति सर्व अर्थवादरूप आहेत असें समजावें, असें याचें मत आहे.

**उत्तरमीमांसा अर्थात् वेदान्तः**—या दर्शनाचा विचार करावयाचा म्हणजे व्यासांचीं ब्रह्मसूत्रें व त्यांवरील शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व निंबार्काचार्य या पांच आचार्यांच्या मतांचा विचार करणें अवश्य आहे.

ब्रह्मसूत्रांत ब्रह्माची व्याख्या सांगण्याकरितां म्हणून अध्याय पहिला, सूत्र दुसरें यांत ब्रह्माची व्याख्या दिली आहे; ती अशीः—

जन्माद्यस्य यतः । ( १—१-२ )

यांतील 'यतः' या शब्दाचा 'यापासून' अथवा 'यानें' असा अर्थ संभवतो व वेगवेगळे दर्शनकार आपल्या मतास योग्य असा यांपैकीं पसंत करतात. श्रुतींत 'यतो वा इमानि भूतानि जायन्ते' असें म्हणून 'आत्मनः आकाशः संभूतः असा स्पष्ट उल्लेख केलेला

आहे. तेव्हां 'यापासून' हा तर अर्थ ग्रहण करावाच लागेल. सांख्यांना अभिप्रेत प्रधान अथवा न्याय-वैशेषिकांना मान्य असणारे परमाणू यांपासून जगत् निर्माण झालें, असें सूत्रकार मानीत नाहींत. ते जगताचें कारण चेतन पदार्थ मानतात व त्याच्या ईक्षणानें सृष्टि निर्माण झाली असें मानतात, येवढें निर्विवाद आहे. आतां हा चेतन पदार्थ 'ब्रह्म' आहे अथवा 'सगुण परमात्मा' आहे, याबद्दल वेगवेगळ्या आचार्यांचें मतभेद आहेत. ते काय आहेत, तें आतां पाहूं.

**शंकराचार्यः**—हे केवलाद्वैती होत व सूत्रावरील विद्यमान् भाष्यांत यांचेंच भाष्य सर्वांत जुनें आहे. यांच्या मतें ब्रह्म हें जगताचें अधिष्ठान आहे व ईश्वर म्हणजे मायाविशिष्ट चैतन्य हेंच जगाचें अभिन्ननिमित्तोपादान कारण आहे. हे केवलाद्वैती असल्यानें यांच्या मतें ब्रह्माशिवाय दुसऱ्या कोणाचीच सत्ता खरी नाहीं. ब्रह्म हेंच सत्—चित् अनंत व आनंद आहे.

ब्रह्म हें एकच सत्य व तदितर सर्व अवस्तु आहेत. 'नेह नानास्ति किंचन' हेंहि म्हणायची सोय नाहीं, अशी पारमार्थिक सत्तेची कथा सोडून दिली व व्यावहारिक भाषेंत जगाची व्यवस्था आपण लावूं लागलों, तर आपणांस अभिन्ननिमित्तोपादान असा ईश्वरच जगताचें कारण मानावें लागेल. कोळी हा आपल्या पोटांतूनच तंतू बाहेर काढून त्याचें जाळें तयार करतो. येथें तंतुद्वारा तो जाळ्याचें उपादानकारण आहे आणि जाळ्याची रचना करण्याच्या कौशल्यद्वारा निमित्तकारण आहे. तसेंच ईश्वर व जगत् यांच्या संबंधांतहि आहे. आपली उपाधि जी मायाशक्ति तिच्या द्वारा ईश्वर जगताचें उपादान कारण आहे व तिच्या नियंतृत्वद्वारा तो निमित्तकारण आहे. ईश्वर हा चेतन असल्यामुळें तो उपादान व निमित्त दोन्हीहि होऊं शकतो. ज्या

वेळेस उपादान कारण जड असते त्यावेळींच भिन्न निमित्तकारणाची गरज असते.

या सर्वांचें तात्पर्य आपण पाहूं गेलों तर आपणाला असें आढळून येईल कीं, शंकराचार्य ज्याला ईश्वर म्हणतात तो म्हणजे ' माया विशिष्टच.' अविद्योपाधिक जीव व मायोपाधिक ईश्वर यांत फरक येवढाच कीं, जीवाची उपाधि तमोगुणप्रधान अविद्या असल्यामुळें तो क्लेश भोगतो व बद्ध राहतो. ईश्वराची उपाधि शुद्ध सत्त्वात्मक असल्यामुळें त्याचें ज्ञान अप्रतिहित आहे व म्हणून तो उपाधीशीं तादात्म्य करीत नाहीं व म्हणून सदा मुक्त असतो; व म्हणूनच त्याची उपासना केल्यानें जीवात्मा शुद्ध होऊन मुक्त होतो. पण खरा सर्वांत श्रेष्ठ अनुभव व पारमार्थिक सत्य असलें तर ' न बद्धो न च साधकः ' ' न जीवो न च ईश्वरः ' असेंच आहे.

**रामानुजादि बाकीचे आचार्यः**—भक्तीनें अंतःकरण सद्गदित होऊन ईश्वरापुढें विनम्र होणाऱ्या भक्तास त्याचें उपास्य ईश्वर, हेंहि एक मायेच्या आवरणांतलाच पदार्थ ही कल्पना कशीशीच वाटते. ज्या ' सत् चित् आनंदादि ' सर्वोत्कृष्ट गुणांच्या चिंतनानें ईश्वराकडे त्याचें मन ओढ घेतें, ते सर्व उपाधीचे गुण आहेत व खरी वस्तु ' अनंग, पेंधा, निकवडा, ' किंबहुना ' कांहींच जेथ नाहीं ' अशी चिन्मात्र हें वाचून भक्ताच्या मृदु अंतःकरणाला धक्का बसतो. शून्यवत् ब्रह्म त्याच्या अंतःकरणांत प्रेमादर उत्पन्न करूं शकत नाहीं. यामुळें तो असलें ब्रह्म मानावयास राजी होत नाहीं. त्याच्या मतें सर्वोत्कृष्ट गुणसंपन्न ईश्वर म्हणजेच ब्रह्म. निर्गुण निराकार ब्रह्म न मानतां सगुण ' पुरुषोत्तम ' मानण्याकडे त्याचा ओढा असतो. थोड्या फार फरकानें रामानुजादि जे वैष्णवाचार्य आहेत, त्यांच्या विचाराची भूमिका अशी आहे.

**रामानुजाचार्यः**— हे विशिष्टाद्वैती होत. ते चित्, अचित् व ईश्वर अशीं तीन तत्त्वें मानतात. यांच्यामतें सृष्टि डाळिंबासारखी आहे. जीवात्मे नित्य व अनेक आहेत. जगत् हें सत्य आहे. ईश्वर हा अन्तर्यामी रूपानें सर्वांचें नियमन करीत असतो.

जीव व जगत् यांचा शरीर-शरीरीं भावसंबंध आहे. तसाच ईश्वर व जीवजगत् यांचा संबंध आहे. तात्पर्य, यांच्या मतें वेदांत ब्रह्माचें सत्यांतील सत्य असें जें वर्णन केलेलें आहे तें खरें आहे. जगत् सत्य आहे, जीव सत्य आहेत; पण ईश्वर हा त्यांहूनहि अधिक सत्य आहे. असा ईश्वर हा सेव्य व जीव हा सेवक आहे. तो शरणागताला शरण्य व बुडत्याला आधार आहे. तो निर्गुण आहे असा जो श्रुतींत उल्लेख येतो त्याचा अर्थ इतकाच, कीं त्याच्यांत वाईट गुण नाहींत. ते माया मानीत नाहींत. जीवात्मा ईश्वर कधींच होत नाहीं. आपण देवाचे सेवक आहोंत, असें ज्ञान व या ज्ञानानुसार ईश्वराची कर्मरूप उपासना या दोहोंच्या योगानें जीवात्मा मुक्त होतो म्हणजे वैकुंठांत जातो. यांच्यामतें विष्णु, लक्ष्मी, गरुड, वैकुंठ हे सर्व अनादि व नित्य आहेत.

**वल्लभाचार्यः**—वल्लभाचार्यांच्या सिद्धान्ताप्रमाणें ब्रह्म निर्भेळ सगुण नाहीं. त्याचप्रमाणें तें निर्भेळ निर्गुणहि नाहीं. तें सगुण-निर्गुण आहे. परमात्मा श्रीकृष्ण परब्रह्म आहे. तो सगुणहि आहे व निर्गुणहि आहे. जगत् श्रीकृष्ण परमात्म्याची 'लीला' आहे. तें सत्य आहे. भगवंताच्या अनंत शक्ती आहेत, त्यांपैकीं माया ही एक शक्ति होय. त्यांच्या मतें जगतामध्यें परमेश्वराचे चित् आणि आनंद गुण तिरोधान अवस्थेंत आहेत. परंतु जीवामध्यें आनंद गुण सुप्त स्थितींत आहे; व यामुळेंच जिवाला दुःख, ऐश्वर्यहीनता ही भोगावीं लागतात. जीव

परमेश्वराचा अंश होय. तो अणुहि आहे व विभुहि आहे, कर्ताहि आहे व भोक्ताहि आहे.

श्रीपुरुषोत्तमगृहवास अथवा परमेश्वराच्या नित्य लीलारसाचें सेवन हें मनुष्याचें अंतिम ध्येय होय. ती ध्येयपूर्ति भक्तिमार्गानेंच होऊं शकेल अशी वल्लभाचार्यांची ठाम समजूत आहे. त्यांचा भक्तिमार्ग 'पुष्टिमार्ग' या नांवानें ओळखला जातो. 'पुष्टि' शब्दाचा अर्थ 'अनुग्रह' किंवा 'कृपा' आहे. पुष्टिमार्ग म्हणजे अनुग्रहमार्ग. श्रीकृष्णाची कृपा मिळविण्यासाठीं त्याला शरणच गेलें पाहिजे; म्हणून या मार्गाला 'शरणमार्ग' असेंहि म्हणतां येईल. पुष्टिभक्तांनीं पुष्टि मिळविण्याकरितां तन्मयतेनें परमेश्वराची सेवा केली पाहिजे. त्यानें सतत जप केला पाहिजे कीं, " हे प्रभो ! तुझा वियोग मला हजारों वर्षांपासून झाला आहे. या कृष्णवियोगाच्या योगानें माझ्या आनंदाचा तिरोभाव झाला आहे. माझा देह, प्राण, इंद्रियें, अंतःकरण, धर्म, धन, दारा....हे सर्व मी तुला समर्पण करतों. मी तुझा दास आहे. मी तुझाच आहे." पुष्टि साध्य होण्याकरितां साधन म्हणून वल्लभाचार्यांनीं एक सेवामार्गच सांगितला आहे. वल्लभपंथीय मंदिरांत वल्लभाचार्यांनीं आदेशिलेला सेवामार्ग चालू असतो.

आर्यदर्शनामध्यें एकेश्वरवाद ( monotheism ) जर कोणी मान्य केला असेल, तर भक्तिमार्गी आचार्य व संतमंडळी यांनींच. त्यांत सुद्धां, द्वैत-अद्वैत-मताप्रमाणें ईश्वराचा व जगाचा संबंध मानण्यांत फरक आहेच. सगळे वैष्णव आचार्य हे सगुण परमात्मा मानतात व त्याहून भिन्न असें जगत् मानतात. पण भक्तिमार्गी संत मात्र ईश्वरानें हें जगत् निर्माण केलें, त्याच्या आधारानें हें चाललें आहे व त्याच्यांतच याचा लय होणार आहे असें मानतात. त्यापैकीं अद्वैती

तर *"ईश्वरच जगाच्या रूपानें आपणच आपल्याला प्रसवला" असें म्हणतात.

हे भक्तिमार्गी संत व शंकराचार्य यांच्यांत पुष्कळच साम्य आहे.

वर जीं आस्तिकदर्शनांचीं मतें दिलीं आहेत, त्यांपैकीं बहुतेक उपनिषदांतील वर्णनाप्रमाणें ईश्वर मानतात व त्यापासून हें झालें आणि पुढें त्याच्यांतच लयाला जाणार असें मानतात; आरंभीं आरंभीं न मानणारेसुद्धां पुढेंपुढें तसें मानूं लागतात. त्या सर्वांचें सामान्यतः मत खालीलप्रमाणें देतां येईल.

"आपणां सर्वांचा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास आहे; ईश्वर म्हणजे अन्य कांहीं नसून जगत् निर्माण करणारी व त्या जगताच्या स्थितीला कारण असणारी अशी एक शक्ति होय; अशा या ईश्वरामध्येंच सर्व जगत् कल्पान्तीं विलीन होऊन जातें आणि पुनश्च केव्हां तरी त्याची उत्पत्ति होते.

आतां हें खरें कीं आपल्या ईश्वरविषयक कल्पना निरनिराळ्या प्रकारच्या असूं शकतील. उदाहरणार्थ, ईश्वर पूर्णपणें साकार आहे असें कोणी मानील, तर आणखी एखादा तो साकार असूनहि मानवांच्या गुणधर्मांनीं युक्त नाहीं असें मानील; तो पूर्णपणें निराकार आहे असेंहि एखाद्याचें मत असूं शकेल; आणि या सर्व मतांना वेदांत आधार सापडेल. असें जरी असलें तरी आपण सर्व ईश्वराविषयीं श्रद्धा बाळगणारे आहोंत; याचा अर्थ असा कीं, ज्या अनाद्यनन्त तत्त्वांतून हें चराचर जगत् निर्माण झालें, ज्या तत्त्वांत सर्व जगत् सामावलेलें आहे आणि अन्तीं ज्यामध्यें वस्तुजात विलीन

---

* "नव्हे तें कैसें झालें रे खेळिया। आपआपणांसी व्यालें रे ॥"

नामदेव

झालेंच पाहिजे अशा परम तत्वाविषयीं श्रद्धा न बाळमणारा मनुष्य हिंदू असणें अशक्य आहे."*

—" फिलॉसॉफिक् हिन्दु इझम,' भाग २, पृ. २०९*

*"We all believe in God, a creating, a preserving power of the Universe, and unto whom the whole Universe periodically returns, to come out at some other periods and manifest the wonderful phenomenon called the Universe. We may differ as to the conception of God.

One may believe in a God who is entirely personal, another may believe in a God who is personal and yet not human and another may belive in a God who is entirely impersonal and all may get their support from the Vedas. Still we are all believers in God, i. e. to say, that man who does not believe in a most marvellous infinite power from which everything has come, in which everything lives, and to whom everything must in the end return, cannot be a Hindu."

Philosophic Hinduism
Book II; Page 209.

—

# पाश्चात्य देशांतील ईश्वरसिद्धीचे पुरावे : : ५

पाश्चात्य देशांत ज्या वेळेला ईश्वरविषयक प्रश्नाची चर्चा केली जाते, त्या वेळीं बहुधा त्या चर्चेचा आरंभ ईश्वराचें अस्तित्व कसें सिद्ध करावें या प्रश्नापासून होतो. व चर्चेस असा आरंभ होणें हें एका दृष्टीनें अगदीं स्वाभाविक आहे. कारण, सूर्य, तारे, झाडें, घर, इष्टमित्र हीं ज्याप्रमाणें आपणांस प्रत्यक्ष दिसतात, तशी ईश्वर ही वस्तु इंद्रियगोचर नाहीं. जे ईश्वराचें अस्तित्व मानतात, नव्हे, ईश्वर हा ज्यांच्या जीवनाचें जीवन आहे अशा श्रेष्ठींनासुद्धां 'नाहीं देखिला तो डोळां । देव दाखवूं सकळां ॥ ' कसें बोटानें दाखवूं तुला । सांग अनुभव गुरूच्या मुला ॥ ' असें म्हणण्याची पाळी येते. अर्थातच कोणत्याहि इंद्रियाला ईश्वर हा विषय होत नसल्यानें आरंभींच ईश्वर मानावाच कां? या प्रश्नाविषयीं चर्चा होणें हें अगदीं स्वाभाविक आहे.

आपल्याकडील पुरावे देतांना ऐतिहासिक पद्धतीचें अवलंबन न करतां दर्शनांचा विचार करून त्यांनीं मांडलेले पुरावे दिले आहेत. व पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या बाबतींत या पद्धतीचें अवलंबन करणें कठीण आहे, अशांतला भाग नाहीं; पण आपल्यासरखीं वेगवेगळीं दर्शनें पाश्चात्य देशांत अगदीं अलीकडील काळांतच होत आहेत. यामुळें येथें ऐतिहासिक पद्धतीच स्वीकारली आहे.

पाश्चात्य तत्त्वज्ञानाचे, एक पुरातन, दुसरा मध्ययुगीन व तिसरा अर्वाचीन असे तीन खंड पडतात. प्रत्येक भागांतील कांहीं प्रमुख तत्त्ववेत्त्यांनीं दिलेले पुरावे पुढें दिले आहेत:—

**पुरातन युगः**—पाश्चात्य देशांतील पुरातनयुगाच्या तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत सॉक्रेटिस्, प्लेटो व आरिस्टॉटल् ही त्रयी फारच महत्त्वाची आहे. यांपैकीं सॉक्रेटिस हा जरी होमर हिसिअड् इत्यादिकांनीं मानलेले देव मानीत नसला तरी त्याचा देवावर अत्यंत विश्वास होता, हें त्याच्या वागण्यावरून सहजच सिद्ध होणारें आहे. त्याला देवाचा आदेश निषेधार्थी ( "अमुक करूं नको" ) असा कां होईना, पण मिळे व तसें तो सांगत असे आणि त्याप्रमाणें वागे; पण त्यानें ईश्वरसिद्धयर्थ आपल्या वागण्यापलिकडे दुसरा पुरावा मांडला नाहीं.

सॉक्रेटिसापेक्षांसुद्धां त्याचा शिष्य प्लेटो व प्लेटोचा शिष्य आरिस्टॉटल् यांचीच तत्त्वज्ञनाच्या इतिहासांत भरीव व अमोल कामगिरी आहे; आणि म्हणूनच पुरातन युगांतील पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांत सर्वांत श्रेष्ठत्वाचा मान जर कुणाला दिला जात असेल, तर तो प्लेटो व आरिस्टॉटल् या गुरुशिष्यांच्या जोडीलाच होय. त्यांच्यानंतर झालेल्या प्रत्येक विचारी माणसानें या गुरुशिष्यांसमोर आपली मान तुकविली आहे. गुरु ( प्लेटो ) हा कल्पनेच्या पंखांनीं उंचउंच भराऱ्या मारणारा म्हणून प्रसिद्ध, तर शिष्य ( आरिस्टॉटल् ) बुद्धीच्या भूमिकेवर पाय ठेवून उभा राहणारा म्हणून प्रसिद्ध. गरुडासारखी उंच भरारी मारून एका दृष्टिक्षेपांत अधिकांतल्या अधिकाला कव घालण्याकडे प्लेटोचा कल, तर मुंगीसारखी सूक्ष्म नजर चालवून अणूंतील अणू शोधून काढण्याची शिष्याची तयारी. आपणांस आपल्या विषयापुरतें येवढेंच सांगावयाचें कीं, ग्रीस देशांत जे मोठ्यांतले मोठे, दोन भिन्न प्रवृत्तीचे गुरुशिष्य होऊन गेले, त्या दोघांनींहि ईश्वर मानला आहे. प्लेटोचा कल वरतीं दिल्याप्रमाणें समन्वयाकडे असल्यानें त्याच्या तत्त्वज्ञानाचा

कल ईश्वर व सत् चित् आनंद वस्तु यांचा मिलाफ करण्याकडे आहे आपणांस असें दिसून येईल.

आरिस्टॉटल् सूक्ष्म व विवेचक बुद्धीचा असल्यानें त्यानेंच प्रथम वेगवेगळ्या विषयांना शास्त्रीय स्वरूप देऊन त्यांच्या मर्यादा घालून दिल्या. प्रो. व्हाइटहेड आरिस्टॉटल्संबंधीं म्हणतात कीं, "जगांतील जर कोणाएका व्यक्तीला निरपेक्षरीत्या तत्त्वज्ञानादि शास्त्रांचा विचार करणारा म्हणून म्हणावयाचे असेल तर तें आरिस्टॉटल् याच व्यक्तीला म्हणतां येईल." अशा थोर पुरुषाचाहि ईश्वरावर विश्वास होता. येवढेंच नव्हे तर, त्यानें जगताची उपपत्ति लावतांना ईश्वरसिद्धी केली आहे.

आरिस्टॉटल्ची जगासंबंधींची कल्पना अशी आहे कीं, जगत् सत्य आहे व त्यांत सारखा बदल होत आहे. अर्थातच ॲरिस्टॉटल्च्या तत्त्वज्ञानांत गतीस फार महत्त्व आहे व त्यानें याच आधारावर ईश्वरसिद्धि करण्याचा प्रयत्न केला आहे.

जगतांत अखंड चलन होत आहे. पण कोठल्यातरी अचल अशा वस्तूंत या अखंड चलनाचा—गतीचा—उगम मानणें अवश्य आहे. कारण, गतीचें कारण गतिमान् पदार्थ मानला तर त्याच्या गतीला कारण कोण, असा प्रश्न उरतोच व येवढ्याचकरितां स्वतः न चळणारा पण सर्व गतींचें मूळ (an unmoved mover) असा शुद्ध, अढळ, अचल पदार्थ मानणें अवश्य आहे व तोच पदार्थ म्हणजे ईश्वर होय. आरिस्टॉल्चा हा ईश्वराच्या अस्तित्वाचा पुरावा आहे.

आरिस्टॉटल्च्या पुराव्यास किती महत्त्व द्यावयाचें हा प्रश्न स्वतंत्र आहे. परंतु आरिस्टॉटल्सारख्या असामान्य विज्ञानप्रमुख तत्त्वज्ञान्यांस सुद्धां जगताचें कोडें उलगडतांना ईश्वर मानणें अत्यावश्यक वाटलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

**मध्ययुगः**—पुरातन कालांतून मध्ययुगांत पाऊल टाकतांच पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या विचारांचें वारें कसें निराळ्या दिशेनें वाहूं लागलें हें पाहणें फार मनोरंजक आहे. येशूख्रिस्ताच्या जन्मानंतर पाश्चात्य देशांतील विचारांना नवीनच वळण प्राप्त झालें. येशू व त्याचे सेंट पॉलसारखे शिष्य, यांचा आध्यात्मिक अनुभव, लोकोद्धाराची तीव्र तळमळ व त्याकरितां येशूनें दाखविलेला सहज, सुलभ मार्ग यामुळें थोडक्याच काळांत येशूच्या मताचा प्रसार फार झपाट्यानें झाला. ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराकरितां ख्रिस्त मंदिरें बांधण्यांत आली, वेगवेगळ्या संस्था निर्माण झाल्या. पण याचा परिणाम कालान्तरानें असा झाला कीं, या प्रस्थापित व म्हणून सत्ताधारी संस्थांच्या विरुद्ध सत्य बोलणेंहि कठीण झालें. यामुळें येशूनंतर थोड्याच दिवसांत बुद्धीच्या स्वतंत्र व्यापारास बंदी झाली. विचाराचें वातावरण कोंदट होऊन गेले, व बुद्धि तत्कालीन संस्थांची गुलाम बनली. बुद्धिस्वातंत्र्यरूपसूर्याला अंधश्रद्धेचें खग्रास ग्रहण लागलें आणि मध्ययुग, तिन्ही युगांचा सुवर्णमध्य न ठरतां अंधारयुग ठरलें. या युगांत अर्थात्‌च धर्म व ईश्वर यांना इतकें महत्त्व आलें कीं, त्यांच्या प्रकाशांत इतर सर्व भौतिक शास्त्रें निस्तेज झालीं. यामुळें स्वाभाविकच या युगांत ईश्वर या विषयावर अनेक ग्रंथ निर्माण झाले. त्यांत ईश्वरसिद्धी करतां वेगवेगळे पुरावे मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यांतील नमुन्यादाखल प्रसिद्ध असा एक खालीं देत आहोंत.

अकराव्या शतकांत कॅन्टर्बरीचा ॲन्सेम् म्हणून एक प्रसिद्ध तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्यानें ईश्वरसिद्धीकरितां एक प्रमाण दिलें. त्यांत त्यानें ईश्वराच्या नुसत्या कल्पनेवरूनच ईश्वराची सिद्धि करण्याचा प्रयत्न केला असल्यानें तें नुसत्या ‘कल्पनेपासून अस्तित्व सिद्ध करणारें’ ( Ontological Argument ) म्हणून तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत

प्रसिद्ध आहे. ह्या सारखाच पुरावा देकार्त नांवाच्या फ्रेंच तत्त्ववेत्त्यानें पुढें सतराव्या शतकाच्या प्रारंभीं प्रामुख्यानें मांडला आहे. ॲन्सेमनें ईश्वरसिद्ध्यर्थ मांडले प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

'ईश्वराची कल्पना म्हणजे ज्याच्यापेक्षां अधिक श्रेष्ठ असा पुरुष कल्पितां येत नाहीं, अशा सर्वांत अत्यंत श्रेष्ठ अशा पुरुषाची. अर्थातच ती कल्पना पूर्ण पुरुषाचीच होय व असा पुरुष आहे असेंच मानावें लागेल. कारण जर तसें मानलें नाहीं तर आपण जी पूर्ण पुरुषाची कल्पना केली ती सर्वांत श्रेष्ठ पुरुषाची कल्पना म्हणून राहणार नाहीं. कारण, असणाऱ्या वस्तूची कल्पना ही ज्याला अस्तित्व नाहीं अशा वस्तूच्या कल्पनेक्षां केव्हांहि मोठीच असणार. तेव्हां ज्या अर्थी सर्वांत श्रेष्ठ, पूर्ण अशा ईश्वराची कल्पना आपण करूं शकतों त्याअर्थीं तदनुरूप ईश्वर असलाच पाहिजे हें सहजच सिद्ध झालें.' वास्तविक या प्रमाणानें येवढेंच सिद्ध होतें कीं, ईश्वराच्या—पूर्ण पुरुषाच्या—कल्पनेंत अस्तित्वाची कल्पना करणें अवश्य. म्हणून त्यावरून ईश्वर हा आपल्या इंद्रियांना गोचर होणाऱ्या सत्यसृष्टींत असलाच पाहिजे असें सिद्ध होत नाहीं. ईश्वराचा विचार, ईश्वराच्या अस्तित्वाचा विचार व त्याचें अस्तित्व व त्यावर विश्वास या गोष्टी अगदीं भिन्न आहेत; पण ॲन्सेमच्या विचारांत यांची गल्लत झालेली आहे.

**अर्वाचीन युगः**—ह्या युगास प्रारंभ पंधराव्या शतकाचा शेवट व सोळाव्याचा आरंभ यांपासून समजला जातो. या काळांत म्हणजे पंधराव्या शतकाच्या वेळीं ज्या गोष्टी घडून आल्या त्यामुळें लोकांचा जगताकडे व बायबलकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावला, बायबलचें भाषांतर झालें, छापण्याची कल्पना निघाली, ग्यालिलिओनें दुर्बीण शोधून तारे ग्रह यांचे वेध घेण्याचें साधन शोधून काढलें; इत्यादि गोष्टींमुळें बायबल

व त्याचा अर्थ सांगणारे पाद्री यांजवरील विश्वासास जबरदस्त धक्का बसला. आणि नवीन विचार व नवीन शास्त्रें अहमहमिकेनें पुढें येऊं लागलीं. यांत प्रथम वाढ ज्योतिषशास्त्र व पदार्थविज्ञान यांची झाली. मागील युगाशीं या युगाची तुलना करतांना बेकननें म्हटलें आहे कीं, 'मध्ययुगांत युरोपांत बुद्धि ही धर्माची गुलाम बनली होती. आतां ती स्वतंत्र झाली. अंधाराचें युग संपलें. नवीन युगास आरंभ झाला.' तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत असा नवीन विचाराचा, पुढील पिढीला नवीन वळण लावणारा व म्हणून अर्वाचीन युगाचा जनक म्हणून ज्याला म्हणतात तो देकार्त होय. आपण आतां त्याच्या ईश्वरविषयक मताकडे वळूं.

**देकार्त**:—गणिती, ज्योतिषी व तत्त्वज्ञानी म्हणून प्रसिद्ध अशा देकार्तनें आपल्या तत्त्वज्ञानांत ईश्वरसिद्धीकरितां तीन-चार वेगवेगळे पुरावे दिले आहेत. जगताचे कोडें उलगडण्याच्या त्याच्या प्रयत्नांत त्याच्या विचारांचें घोडें जें अडलें, तें ईश्वरसिद्धीशिवाय पाऊलच पुढें टाकीना. ईश्वरसिद्धि नाहीं तर जगतच नाहीं अशी पाळी आली. त्याची विचाराची पद्धत मात्र मोठी सुंदर होती. शत्रूचें शस्त्र घेऊनच त्याच्यावर जसें तें चालवावें व आपण जय मिळवावा असाच कांहींसा प्रकार त्यानें केला. नास्तिकांची खोड त्यानें त्यांच्याच शस्त्रानें म्हणजे संशय घेऊनच मोडली. संशयाच्या शस्त्रानेंच त्यानें असें दाखवून दिलें कीं, आत्मा मानणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, जगांतील प्रत्येक वस्तु मिथ्या आहे, असें म्हणतां येईल. सारें विश्व हें एक दीर्घ स्वप्नच आहे असेंहि मानतां येईल. पण ज्या विचाराच्याद्वारां असा संशय घेतला जातो ती वृत्ति तरी मानावीच लागते ना, मग झालेंच कीं ! मेघांनीं आकाशाचा आश्रय करणें जितकें आवश्यक, तितकेंच अशा वृत्तीला आश्रय अपरिहार्यच आहे. म्हणून तो म्हणतो, 'ज्या अर्थीं मी विचार करतों

त्याअर्थी मी आहें '( Cogito ergo Sum ). या पद्धतीनें त्यानें संशयातीत असें आत्म्याचें अस्तित्व सिद्ध केलें. पण देकार्तनें त्या-बरोबरच असें मानलें कीं, माझें अस्तित्व जरी संशयातीत आहे, तरी मद्व्यतिरिक्त बाकीच्या सर्वांचें अस्तित्व स्वप्नांतील सत्याइतकेंच सत्य आहे. माझ्या अस्तित्वाबद्दल जशी निःसंशय खात्री मला देतां येते तशी मद्व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याहि वस्तूची देतां येत नाहीं.

माणसाचें मन ही एक अजब चीज आहे. देकार्तचें मन अशा संशयग्रस्त स्थितींत त्याला स्वस्थ बसूं देईना. देकार्तसारख्या गणिती तत्त्ववेत्त्याला स्वप्नांतील साम्राज्याचें स्वामित्व संपादून लाभणारें सुख नको होतें. त्याला आपल्यासारख्या चालत्या बोलत्या, आपल्या-इतकेंच सदत्व असणाऱ्या जगाची तीव्र तळमळ लागली होती. स्वत्वाच्या जाणीवेचा आनंद परत्वाचें सदत्व सिद्ध केल्याशिवाय मनाला मिळतच नाहीं व म्हणूनच त्यानें आपलें सदत्व व इतर जग यांना जोडणारा एक पूल निर्माण केला व तोच ईश्वर होय. देकार्तच्या तत्त्वज्ञानांत ईश्वरसिद्धीला किती महत्त्वाचें स्थान आहे हें यावरून स्पष्ट दिसेल. देकार्तच्या तत्त्वज्ञानांतील जग म्हणजे सूर्यविकासिनी कमलच. ईश्वररूपी सूर्याचें अस्तित्व नाहीं,तर जगताची सिद्धि होणेंच शक्य नाहीं.

आपण सामान्यतः ईश्वरसिद्धिकरितां विश्वाच्या अस्तित्वापासून आरंभ करून 'तस्य योनिः' त्यालाच ईश्वर म्हणतों. पण सामान्य माणसांप्रमाणें देकार्तची विचारसरणी नाहीं. त्यानें जग-ताचें अस्तित्व संशयगर्तेत लोटून दिल्यानें त्याला जगताचें कारण म्हणून ईश्वर मानणें अशक्यच झालें. उलट ईश्वराचें अस्तित्व प्रथम सिद्ध करून मग त्यानें ईश्वर आहे, व तो सत्यस्वरूप आहे, अर्थात् तो

मला फसविणार नाहीं; म्हणून माझ्या प्रतीतीला येणारे जगत् सत्य आहे अशी जगताच्या सत्यत्वाची त्यानें सिद्धी केली. ईश्वरसिद्धि-करतां देकार्तनें खालील पुरावे दिले आहेतः—

( १ ) देकार्तच्या दृष्टीनें-ईश्वर सिद्धीचा महत्त्वाचा पुरावा म्हणजे आपल्या मनांत असणारी ईश्वराची कल्पना होय. ईश्वरसिद्धीकरितां ईश्वराच्या कल्पनेपलीकडे जाण्याचें कारण नाहीं. ईश्वराच्या कल्प-नेचें पृथक्करण केल्याबरोबर ईश्वरसिद्धि होईलच. देकार्त म्हणतो, " ईश्वर म्हणजे इतर वस्तूंप्रमाणें अपूर्ण नसून पूर्ण आहे. मग पूर्णाची कल्पना केली तर त्याचें अस्तित्व सूर्याबरोबरच किरणांच्या अस्तित्वांइतकेंच स्पष्ट आहे. कारण पूर्ण आणि त्याचा अभाव मानणेंच अशक्य; कारण पूर्ण व तें नाहीं मग तें पूर्ण कसलें ? " देकार्तचा दृष्टान्त द्यावयाचा, तर ज्याप्रमाणें त्रिकोण कां म्हटला, कीं त्याच्या तीन कोनांची बेरीज दोन काटकोनांइतकी होते हें आलेंच. तद्वतच पूर्ण वस्तू म्हटली कीं, तिच्यांत अस्तित्व या गुणाचा अंतर्भाव झालाच पाहिजे. आणि माझ्या मनांत स्वभावतःच ईश्वराची म्हणजे पूर्ण पुरुषाची कल्पना आहे आणि त्याचें अस्तित्व तर तदंगभूतच आहे. म्हणून तो निःसंशय आहेच असें मानण्यास कांहींच प्रत्यवाय नाहीं. याला Ontological Argument म्हणतात.

( २ ) त्यांनीं आणलेले आणखी दोन पुरावे हेहि ईश्वराची पूर्ण वस्तु म्हणून त्याच्या मनांत असलेली जी कल्पना तिच्यावरच उभा-रलेले आहेत; त्यांपैकीं एक असा कीं, पूर्णाची कल्पना माझ्या मनांत आहे; पण मी पडलों अपूर्ण ! कारण मी जर पूर्ण असतों तर मला जसें व्हावें असें वाटतें तसा मी झालों असतों. पण मी तसा होऊं शकत नाहीं. अर्थात् मी अपूर्ण आहें. अपूर्ण असलेला मीं पूर्णत्वाच्या कल्पनेचा जनक कसा असेन ? कारण कार्याइतकें तरीं कारणांत

दा. क्र. ६१५०

बल असावें लागतें. अर्थातच माझ्यांत असलेली पूर्णाची कल्पना माझ्यांत पूर्णाकडूनच घातली गेली असली पाहिजे व म्हणून असा पूर्ण पुरुष असलाच पाहिजे असें मानण्याशिवाय गत्यंतर नाहीं.

( ३ ) तिसरा पुरावा:—माझें कारण मी असणें शक्य नाहीं, कारण मला पूर्णाची कल्पना आहे. जर माझा मी कर्ता असतों तर मला मी पूर्ण बनविलें असतें; आणि शिवाय माझें संरक्षण करण्यास मी समर्थ झालों असतों. पण वास्तविक प्रकार असा आहे कीं, मी अपूर्ण आहें व माझें रक्षण करण्यास मी समर्थ नाहीं. माझ्या वडि-लांनींच मला निर्माण केलें म्हणावें तर ते माझें रक्षण करण्यास समर्थ असावयास पाहिजेत. पण तशीहि स्थिती नाहीं. त्यांनाहि माझें रक्षण करणें अशक्य आहे. तेव्हां माझें कारण ईश्वरच असला पाहिजे हें निर्विवाद आहे.

या तीन प्रमाणांपैकीं त्याच्या मतें सगळ्यांत महत्त्वाचें प्रमाण पहिलें आहे. दुसऱ्या व तिसऱ्या प्रमाणांच्या बुडाशीं तेंच आहे हें थोडें खोल गेलें कीं दिसून येईल.

पाश्चात्य तत्त्वज्ञानांत देकार्तनें दिलेलें हें ईश्वराच्या-पूर्ण पुरुषाच्या-निव्वळ कल्पनेवर उभारलेलें प्रमाण जितकें प्रसिद्ध आहे, त्याहून जास्त जरी नाहीं, तरी निदान तितकेंच प्रसिद्ध असें जर्मन तत्त्व-वेत्ता कांट यानें केलेलें या प्रमाणाचें खंडन होय. कांटच्यापूर्वीं ह्युम् वगैरेंनींहि त्याचें खंडन केलें आहे. पण त्या सर्व खंडनांत कांटचाच प्रयत्न महत्त्वाचा व सर्वप्रसिद्ध असल्यानें त्याचेंच सार खालीं देत आहों.

कांटचें म्हणणें असें कीं, ‘ ईश्वर आहे अथवा पूर्ण पुरुष आहे ’ या वाक्यांतून ईश्वरसिद्धि काढण्यापूर्वीं या वाक्याचा अर्थ काय होतो तें प्रथम पाहिलें पाहिजे.

‘ ईश्वर आहे ’ हें वाक्य परिच्छेदात्मक ( Analytic ) आहे का संयोगात्मक ( Synthetic ) आहे ? ज्या वाक्यांत विधेय हें उद्देश्याहून भिन्न कांहीं सांगत नाहीं त्या वाक्यास परिच्छेदात्मक वाक्य म्हणतात. यांत विधेय हें उद्देश्याचें स्पष्टीकरण करतें, नवीन कांहीं सांगत नाहीं. उदाहरण—कुत्रा हा चार पायांचा प्राणी आहे. यांत ‘ चार पायांचा प्राणी ’ यांत नवीन माहिती कांहीं नाहीं. उलट, उद्देश्याच्या कल्पनेंत अन्तर्भूत नसलेली गोष्ट विधेय ज्यावेळीं सांगतें, त्यावेळीं त्या वाक्यास संयोगात्मक वाक्य म्हणतात. उदाहरणार्थ, ‘ हा कुत्रा काळा आहे. ’ काळेपणा हा कांहीं कुत्र्याच्या स्वरूपांत अंतर्भूत नाहीं. कधीं कुत्रें पांढरेंहि असेल. आतां प्रश्न असा आहे कीं, ‘ ईश्वर आहे ’ या वाक्यांत ‘ आहे ’ या पदानें दाखविलेलें अस्तित्व ‘ ईश्वर ’ या शब्दाच्या अर्थांत अंतर्भूत होतें किंवा नाहीं ? होत असल्यास तें वाक्य परिच्छेदात्मक होतें व विधेयांत नवीन कांहींच माहिती दिली जात नाहीं म्हणून तो पुरावा होऊं शकत नाहीं. उलटपक्षीं या वाक्यांत नवीन माहिती असल्यास, कोणत्या आधारावर ईश्वराच्या कल्पनेशीं अस्तित्व जोडत आहोंत हें सांगणें अवश्य आहे. असें अस्तित्व फक्त अनुभवानें सांगतां येईल व त्याचा तर येथें अभाव आहे. ईश्वर कोणींच पाहिला नाहीं. तात्पर्य, ‘ पूर्ण ( ईश्वर ) आहे ’ याचा अर्थ पूर्णांत अस्तित्वाचा अन्तर्भाव होतो असें म्हणून जर करावयाचा असला, तर पूर्ण आहे म्हणजे ‘ असणारी वस्तु आहे ’ असा होईल. पण यांत ईश्वरसिद्धि झाली नाहीं. याचा अर्थ येवढाच कीं, जें तुम्हांला सिद्ध करावयाचें आहे तें तुम्ही गृहीतच धरून चाललांत व त्याचा परिणाम निष्फळ असा एक वाक्यप्रयोग निर्माण केलात. ईश्वराचें अस्तित्वच धरून चाललांत तर तें पुनः सिद्ध करण्याची यातायात करणें म्हणजे स्वतःच्याचजवळ कस्तुरी

असून जीव जाईल इतक्या जोरानें मृगजळाच्या मागें धांवणाऱ्या हरणाइतकेंच शहाणपणाचें आहे.

बरें! ‘ पूर्ण पुरुष आहे ’ याचा अर्थ ‘ निष्फळ ’ करायचा नसेल, तर अस्तित्वाचा अंतर्भाव पूर्णत्वाच्या कल्पनेंत करतां कामा नये; पण तो तसा केला नाहीं तर अस्तित्व सिद्ध करण्याची जबाबदारी येते. कारण अस्तित्व हा कांहीं कल्पनेनें वस्तूंत घालण्याजोगा गुण नाहीं. आतां अस्तित्व हा कल्पनेनें घालतां काढतां येण्याजोगा गुण नाहीं हें समजण्याकरितां आपण ‘ आहे ’ असा ज्या वेगवेगळ्या अस्तित्वांत असणाऱ्या वस्तूंविषयीं शब्दप्रयोग करतों त्यावेळीं त्याचा काय अर्थ होतो, तें पाहूं. माझ्या खिशांत शंभर नाणीं खुळखुळत आहेत. आतां हीं प्रत्यक्ष खिशांत खुळखुळणारीं नाणीं व काल्पनिक नाणीं यांत काय फरक आहे? हें पाहूं. काल्पनिक शंभर नाणीं हीं सत्य म्हणून मी ज्यांना म्हणतों, त्यांच्याप्रमाणेंच वाटोळीं, चकचकीत, राजचिन्हांकित मानणें शक्य आहे. मग काल्पनिक नाणीं व खरीं नाणीं यांत फरक तो कुठें राहिला? तो फरक असा आहे कीं, काल्पनिक नाणीं हीं खऱ्या नाण्यांप्रमाणें माझ्या ऐन्द्रियिक अनुभवाला विषय होऊं शकत नाहींत. खरीं नाणीं खरीं; कारण मी त्यांना डोळ्यांनीं पाहतों, हाताळतों. काल्पनिक नाणीं मी डोळ्यांनीं पाहूं शकत नाहीं अथवा त्याच्या योगानें व्यवहार होऊंच शकत नाहीं. तात्पर्य, कोणतीहि गोष्ट आहे याचा अर्थ ती इंद्रियांना विषय आहे. अर्थात् ‘ईश्वर आहे’ असें सिद्ध करायचें असेल, तर ईश्वर इन्द्रियांना विषय होऊं शकतो असें सिद्ध झालें पाहिजे. जोंपर्यंत असें सिद्ध होत नाहीं तोंपर्यंत नुसत्या पूर्णत्वाच्या कल्पनेच्या पृथक्करणानें पूर्ण पुरुष म्हणजे ईश्वर याचें अस्तित्व सिद्ध होणार नाहीं.

पहिलें प्रमाण अशा रीतीनें खोडून काढल्यावर झाडाच्या बुंध्या-

बरोबरच जशा त्याच्या खांद्या खालीं,पडतात त्याचप्रमाणें इतर प्रमाणेंहि आपोआप खंडिलीं जात आहेत; कारण तीं दोन्हींहि पहिल्यावरच उभारलेलीं होत.

या कांटच्या टीकेसंबंधानें दोन गोष्टी लक्षांत ठेवण्यासारख्या आहेत. एक म्हणजे देकार्तचीं ईश्वरसिद्धीचीं प्रमाणें खोडण्यानें तो नास्तिक होता असें ठरविणें बरोबर नाहीं. त्याला ईश्वराचें अस्तित्व मान्य होतें. फक्त तें देकार्तच्या पद्धतीनें सिद्ध करतां येत नाहीं, एवढेंच त्याला म्हणावयाचें होतें. ईश्वरसिद्धिकरितां नैतिक पुरावा मांडून त्यानें स्वतः ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा विचार पुढें येईलच. दुसरी लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे कांटनें केलेलें हें खंडन अलीकडील आत्मसत्तावाद्यांना ( Idealists ) सर्वांशानें पसंत नाहीं. उदाहरणार्थ, प्रो० ए. ई. टेलर यांचें म्हणणें असें कीं, " पूर्णत्वाच्या कल्पनेंतून देकार्तला हवा तसा म्हणजे खरेपणानें वागणारा, जगत् निर्माण करणारा सर्वज्ञ असा ईश्वर सिद्ध करतां येत नाहीं, हें खरें. पण याचा अर्थ हा पुरावा अगदींच कुचकामाचा आहे असें मात्र नव्हे. या योगानें नैतिक गुणसंपन्न ईश्वर जरी सिद्ध करतां आला नाहीं तरी सत् ,चित् अनंत ब्रह्माचें अस्तित्व खास सिद्ध करतां येईल. कारण आपण कोणतीहि कल्पना जरी घेतली, तरी तिला थोडेंबहुत तरी सत्याचें अधिष्ठान लागतेंच. हें अधिष्ठान किती महत्त्वाचें आहे, ही गोष्ट ती कल्पना कितपत सुसंगत आहे यावर अवलंबून आहे. गतकालीन गोष्टी, मग आपल्या डोळ्यांपुढें कुठें येणार त्या ? पण तरीसुद्धां त्यांतील कांहीं खऱ्या, कांहीं संशयित, कांहीं खोट्या असें आपण ठरवतोंच कीं नाहीं ? पण हें आपलें ठरविणें त्या गोष्टींविषयक कल्पना जितपत सुसंगत अगर विसंगत असेल त्याच्यावरच नाहीं का अव

लंबून ? सुसंगत कल्पना आपल्याबरोबरच आपलें अधिष्ठान सत्य आहे अशी खात्री करून देते. अर्थात् वरील न्यायानें जरी आपणांस पूर्ण अशी वस्तु दिसली नाहीं तरी पूर्ण व सुसंगत अशी वस्तु अत्यंत सत् अशी मानावी लागेल. तात्पर्य, देकार्तनें जसा उपयोग केला तसा न करतां अनंत व सुसंगत अशी वस्तु आहे असें सिद्ध करण्याकरितां या कल्पनेचा उपयोग केल्यास तो उत्तम रीतीनें करतां येईल व अशी सद् वस्तु असलीच पाहिजे असें सिद्ध करतां येईल."

आपल्याकडील परिभाषा उपयोगांत आणून सांगावयाचें तर ब्रह्म ( बृहत्वात् ब्रह्म ) या शब्दावरूनच ब्रह्माची—व्यापक, अनंत अशा वस्तूची—सिद्धि होईल; परंतु सगुण, सर्वज्ञ, जगन्नियंता असा परमेश्वर आहे हें नुसत्या शब्दावरून सिद्ध होण्यासारखें नाहीं.

देकार्तनंतर झालेले सुप्रसिद्ध असे स्पिनोझा, लॉक्, लायब्निटझ्, बर्क्ले या सर्वांनीं ईश्वर आहे असेंच मानलें. तत्त्वज्ञानाच्या भिन्न भिन्न शाखांतील पुढारी, पण या सर्वांचें ईश्वर आहे या बाबतींत ऐकमत्य आहे, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. व प्रत्येकानें आपआपल्या परीनें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. या मालिकेंतील मोठा तत्त्ववेत्ता ह्यूम हाच फक्त ईश्वर मानीत नाहीं. तो नास्तिक म्हणून प्रसिद्ध आहे. पण तो गणितशास्त्राखेरीज कोणतेंच शास्त्र मानायला तयार नाहीं. त्याचें म्हणणें कीं, कार्यकारणव्याप्तीवर जेवढे म्हणून ज्ञान उभारलें आहे तें सर्व संशयित ज्ञान आहे. म्हणून धर्म, विज्ञान वगैरे सर्व संशयित ज्ञानाच्या वर्गांतच पडतात. याच्या मताचा विचार पुढील प्रकरणांत येणार असल्यानें ह्यूमनंतर ज्यानें युरोपीय विचारांना नवीन वळण लावलें त्या शार्मण्यदेशीय कान्टच्या पुराव्याकडे वळूं.

**कान्टः**—याचें नांव सर्वत्र महशूरच आहे. हा एक मोठा युग-

प्रवर्तक होऊन गेला. या प्रसिद्ध जर्मन तत्त्ववेत्त्यानें, देकार्तनें ईश्वर-सिद्धीकरितां जीं प्रमाणें आणलीं होतीं त्यांवर केलेली टीका वर दिलीच आहे. त्या टीकेवरून कान्ट हा स्वतः नास्तिक होता असें अनुमान निघण्याचा संभव आहे. पण ईश्वरसिद्धीच्या प्रमाणांचे अर्वाचीन टीकाकार व कान्टसारखे प्राचीन टीकाकार यांत अन्तर आहे. पूर्वींचे टीकाकार एखाद्या प्रमाणावर टीका करीत तर दुसऱ्या प्रमाणानें ईश्वर-सिद्धि करीत. आपल्याकडील प्राचीन व अर्वाचीन सुधारकांतहि भेद आढळतोच कीं नाहीं ? पूर्वींचा सुधारक हा पूर्वापार चालत आलेल्या संस्कृतींत परिस्थित्यनुरूप थोडीफार सुधारणा करावी अशा मताचा, तर अलीकडील पुष्कळसे सुधारक आपल्या संस्कृतीच्या सर्वथैव त्यागावरच सुधारणेचें मंदिर उभारूं इच्छिणारे ! हा जसा फरक आपल्याकडील सुधारकांत आहे तसाच कांहींसा प्राचीन व अर्वाचीन टीकाकारांतील फरक आहे. कान्ट हा त्याच्या पूर्वींच्या लोकांनीं दिलेलीं प्रमाणें जरी मानीत नव्हता तरी तो स्वतः नास्तिक नव्हता. कांटचें म्हणणें एवढेंच होतें कीं, भौतिकशास्त्रें ज्या दृश्य पदार्थांचा विचार करतात त्या बाह्येंद्रिय-गोचर पदार्थांचा विचार करणारी जी बुद्धि तिला ईश्वराचें अस्तित्व निर्विवाद केव्हांच सिद्ध करतां येणार नाहीं. कारण ज्यावेळीं इच्छा-जागृतींमुळें इन्द्रियरूपी वारू बाहेर धांव घेतात व बाहेरून लूट आणतात त्या वेळीं त्या लुटीचा योग्य निर्णय करण्यास ही बुद्धि समर्थ आहे व त्याचें कारणहि अगदीं उघड आहे. या बाबतींत सत्यासत्यतेचा निकाल चटकन् लागणारा आहे. इंद्रियगम्य पदार्थांच्या बाबतींत या बुद्धीनें केलेली कल्पना इन्द्रियगम्य पदार्थांशीं सुसंगत असल्यास ती कल्पना खरी व विसंगत असल्यास अर्थातच खोटी. पण ईश्वर हा इन्द्रियगोचर नसल्यानें या इन्द्रियगम्य पदार्थसंबंधाच्या कसोट्या उपयोगांत आणणारी बुद्धि ईश्वराचें अस्तित्व निर्विवादपणें

सिद्धच करूं शकत नाहीं. कान्टनें Ontological प्रमाणाचें ज्याप्रमाणें खंडन केलें त्याप्रमाणें नेहमीं देण्यांत येणाऱ्या आणखी दोन पुराव्यांचें खंडन केलें. त्यांपैकीं पहिला विश्वमूलक (Cosmological) व दुसरा विश्वरचनाहेतुमूलक (Teleological). पहिल्या प्रमाणापेक्षां हेच नेहमीं उपयोगांत आणिले जातात म्हणून यांची थोडक्यांत स्वरूपें सांगून यांचें कान्टनें कसें खंडन केलें तें पाहूं.

या दोन्ही प्रमाणांत कार्य कारणाशिवाय नसतें या व्याप्तीचा उपयोग केला आहे हें प्रथमच सांगून ठेवणें अवश्य आहे. पहिला पुरावा हा आपल्यासमोर पसरलेलें जें हें जगत् त्याच्या दिक्कालावच्छिन्न स्वरूपावर उभारलेला आहे. मनुष्याच्या मनाची ठेवण अशी आहे कीं त्याला जें सारखें बदलत आहे, जें परिच्छिन्न आहे, तें आपल्या पायांवर उभें राहण्यास समर्थ आहे असें वाटत नाहीं. अस्थिर, परिच्छिन्न, चंचल यांचें अधिष्ठान कांहीं तरी अनंत, स्थिर, शाश्वत असावें असें वाटतें. म्हणून या पुराव्यास विश्वाच्या दिक्कालावच्छिन्न, अस्थिर स्वरूपावर उभारलेला पुरावा (Cosmological) असें म्हणतात.

या प्रमाणाचें सामान्य स्वरूप खालीलप्रमाणें आहे. जगत् हें कार्य आहे व तें आपलें स्वतःचें कारण होऊं शकत नाहीं. तें स्वतःसिद्ध नाहीं. अर्थात्च त्याचें कारण कांहीं तरी असणें अवश्य आहे. तात्पर्य, ज्यापासून हें सर्व निर्माण झालें असें जें विश्वाचें आदिबीज तोच ईश्वर होय. अथवा परिच्छिन्न व सापेक्षस्वरूपी जगतावरून देशकालवस्तु परिच्छेदशून्य व निरपेक्षित अस्तित्व जिला आहे अशी वस्तु मानणें अवश्य आहे व तीच अधिष्ठान-वस्तु ईश्वर होय. हा जो पुरावा आहे, त्यांतील तत्त्व अगदीं साधें व सहज समजण्यासारखें आहे. या प्रमाणांतील तत्त्व अगदीं रोजच्या व्यवहारांत उपयोगिल्या जाणाऱ्या तत्त्वांपैकींच एक

तत्त्व आहे. व तें मनावर बिंबविण्याकरितां सांगितली जाणारी खालील गोष्ट प्रसिद्ध आहे.

एकदा एका शिक्षकाचा मुलगा त्यांना 'ईश्वर कशावरून आहे?' असें विचारूं लागला. वडील हे शिक्षणाच्या धंद्यांत प्रवीण असल्यानें त्यांनीं त्याला त्याचवेळीं उत्तर देण्याची घाई केली नाहीं. "सवडी-नुसार मी तुला उत्तर देईन" असें ते म्हणाले. पुढें दोन–तीन दिवसांनीं मुलांना भूगोल शिकविण्याकरितां त्यांनीं आपल्या घरींच लाकडाची केलेली भू–गोलाकृति आणली. वर्ग संपल्यावर वडील व चिरंजीव बसले असतां भूगोलावरील बारीक काम पाहून चिरंजीवानें वडिलांना प्रश्न केला, "हा गोल कोणी तयार केला?" त्यावर वडील म्हणाले, "कोणी नाहीं; हा आपोआपच तयार झाला!' मुलाचें या उत्तरानें समाधान झालें नाहीं. तो म्हणाला, "बाबा! हा लाकडाचा गोल आपोआप कसा तयार होईल? हा कोणी तरी कुशल सुतारानें केला असला पाहिजे." त्यावर वडील म्हणाले, "तुला खरेंच असें वाटतें ना!" मुलगा म्हणाला, "होय." त्यावर वडील म्हणाले, "अरे! जर हा गोल कारागिराशिवाय होत नाहीं, तर पृथ्वीयेवढा मोठा हा जो गोल आहे त्याचा कर्ता कुणी तरी नको का? आणि याचा जो कर्ता तोच ईश्वर होय." या गोष्टींतील पितापुत्रांच्या संवादांतील तत्त्वच वरील पुराव्यांत आपणांस आढळून येतें.

पुरावा नंबर दोन म्हणजे विश्वरचनाहेतुमूलक; थोडा विचार केला असतां हा प्रथम पुराव्यावरच उभारलेला आहे असें दिसून येईल. या पुराव्याचें स्वरूप खालीलप्रमाणें आहे:—

आपण रान व बाग यांत फरक काय म्हणून करतों? रानांतील झाडें माणसानें प्रयत्न न करतां, न लावतां आपोआप कशीं तरी

निर्माण झालेलीं असतात. बागेचें तसें नाहीं. त्यांतील झाडें एका रांगेनें व्यवस्थित लावण्याकारतां कोणी तरी परिश्रम केले असले पाहिजेत, असें आपण ठरवितों. या उदाहरणाप्रमाणेंच जगतांत आपणांस जें रचनाचातुर्य दिसून येतें त्यावरून हें जगत् निर्माण करणारा व तें व्यवस्थित चालविणारा कोणी ईश्वर असावा अशी कल्पना केली जाते. सूर्याचे उदयास्त, ऋतु व हंगाम हे इतके नियमशीर होत आहेत कीं, यांचा नियामक कोणी तरी असावा असें स्वाभाविकच वाटतें.

कान्टनें हे दोन्ही पुरावे सदोष आहेत असें दाखविलें आहे. हे दोन्ही पुरावे परंपरेनें ईश्वराच्या कल्पनेवर उभारलेल्या पुराव्यावरच अधिष्ठित झाले आहेत. पण तोच जर दुर्बल आहे तर त्यावर उभारलेले हे पुरावे सबळ कोठून असणार ? शिवाय या प्रत्येकांतहि दोष आहेतच. उदाहरणार्थ, जर जगाचें कारण म्हणून ईश्वर मानावयाचा मग त्या कारणाचें कारण कां मानूं नये ? कार्यास कारण हवें ही व्याप्ति जगास जशी लागू आहे तशी ईश्वरासहि लावणें अवश्य आहे.

विश्वरचना-हेतुमूलक प्रमाणास कान्ट स्वतः पुष्कळ महत्त्व देतो. पण त्याच्या मतें हें प्रमाणसुद्धां मोठें सबळ आहे असें नाहीं. कारण याविरुद्ध प्रथम असें म्हणतां येईल कीं मूळांत जगतांत हेतु-पूर्वक केलेली अशी मोठी रचना दिसत नाहीं. जी थोडी दिसते तीवरून जगत्कर्ता कोणी असावा असें सिद्ध होत नाहीं; फक्त कोणी मोठा एक कारागीर असावा एवढेंच सिद्ध होतें. कारण जर सर्वशक्तिमान् असा कोणी कर्ता असता तर त्यानें हें जगत् असें अपुरें ठेवलें नसतें. पण जसा कारागीर आपल्या समोरच्या पदार्थाला हवें तें रूप देण्याचा प्रयत्न करतो पण त्यांत त्याला यश येतेंच असें नाहीं; तसेंच ईश्वररूपी कारागीर त्याच्याजवळ असलेल्या मालमसाल्याला ह्या विश्वाचें रूप देऊन राहिला आहे, पण त्यांत त्याला पुरें यश आल्याचें दिसत

नाहीं. तात्पर्य, या प्रमाणानें 'जगत्कर्ता' ईश्वर सिद्ध होत नाहीं, फार तर जग तयार करण्यांत गुंतलेला कोणी कारागीर आहे येवढेंच सिद्ध होईल.

अशा रीतीनें कान्टनें या पुराव्यांतील दोष दाखवून ते टाकाऊ आहेत असें सिद्ध केलें, तरी त्याला ईश्वर आहे असेंच वाटत होतें. त्याची तक्रार फक्त या पद्धतीशीं होती. म्हणून त्यानें ईश्वरसिद्धी-करतां एक स्वतंत्र, ज्याला नैतिक पुरावा ( Moral Argument ) म्हणतात, तो मांडून ईश्वरसिद्धी करण्याचा प्रयत्न केला.

कान्टनें हा पुरावा त्याचें प्रसिद्ध पुस्तक Critique of Practical Reason यांत दिला आहे. हें पुस्तक लिहून कान्टनें पाश्चात्य देशांतील विचारांना नवीन वळण लावण्याचा प्रयत्न केला यांत शंका नाहीं. या पुस्तकांत त्यानें असें प्रतिपादिलें कीं, आपण तत्त्वविचारांत आपल्या बुद्धीला जशी मान्यता देतों तशी आपल्या भावना, इच्छा यांनासुद्धां देणें अवश्य आहे. एकाद्या गोष्टीबाबत बुद्धिची साक्ष अपुरी असली तर त्याबाबत आपल्या भाव-नांना—आपल्या हृदयाला—प्रश्न विचारण्यास हरकत नाहीं, नव्हे, विचारणें अवश्य आहे; व हृदयांचा कौल जर अनुकूल आला तर त्या गोष्टीस मान्यता देण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण सद्-भावनांना बुद्धिइतकेंच मानवी जीवनांत स्थान आहे. तात्पर्य ईश्वर, अमरत्व इत्यादि जे प्रश्न आहेत त्यांची उत्तरें विज्ञानशास्त्रांत वावरणाऱ्या बुद्धिला मिळालीं नाहींत म्हणून निराश होण्याचें कारण नाहीं. तत्त्वज्ञान नीतिच्या पायावर उभारणें शक्य आहे, म्हणजे नीतिविषयक भावनांचा विचार करून, अमरत्व, ईश्वर इत्यादि पदार्थांचें अस्तित्व सिद्ध करणें शक्य आहे. कान्टच्या या पुराव्यास नैतिक

पुरावा ( Moral Argument ) म्हणतात. कान्टनें तो खालीलप्रमाणें मांडला आहेः—

माझ्या नीतिविषयक भावनांचा जेव्हां मी विचार करतों तेव्हां मला ईश्वराचें अस्तित्व मानणें भाग पडतें. कारण माझी नैतिकबुद्धि ( नीतिविषयक भावना ) असें सांगते कीं सद्गुण व सुख हीं एकास्पद असावीत. सद्गुणी सुखी असावा हें खरें. पण व्यवहारांत तर याच्या उलटच प्रकार दृष्टीस पडतो. ' अहिंसा सत्यमक्रोधः ' इत्यादि तत्त्वांचा अर्थहि माहीत नसणारे पण ' काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ' असे लोक कृष्णकृत्यें करूनहि मोठ्या दिमाखानें, तोऱ्यानें, उजळ माथ्यानें फिरतांना दिसतात; नव्हे, समाजांत उच्च स्थान मिळवितात; आणि दैवी संपत्तींत जन्मलेल्या लोकांना जगांत पाऊल ठेवल्यापासून बाहेर पडेपर्यंत या जगांतील दुःखदारिद्र्यरूपी नरकांत पडून राहावें लागतें. कान्ट म्हणतो, हें दृश्य पाहून माझ्या मनाचें समाधान होत नाहीं. तेव्हां प्रश्न पडतो तो असा कीं, सद्गुणांपेक्षां, नीतिपेक्षां, अनीति, दुर्गुण यांचा पंथ चांगला काय? अर्थात् माझी नैतिक भावना दुर्गुण, दुराचार बरा असें केव्हांच सांगत नाहीं. तेव्हां सद्गुणाची श्रेष्ठता जर मान्य करायची असेल तर ज्या स्थितींत सद्गुणांची भरभराट आहे, सद्गुणी सुखी आहेत, दुर्गुणी दुःख भोगीत आहेत, त्यांना शिक्षा होत आहे अशी स्थिति मानणें अवश्य आहे. व ही स्थिति ज्या अर्थी या लोकांत दिसत नाहीं, त्या अर्थी असा दुसरा लोक मानणें जरूर आहे कीं, ज्यांत सद्गुण आणि आणि सुख, दुर्गुण आणि दुःख याच जोड्या हातांत हात घालून फिरत आहेत व हेंच कान्टचें परलोक मानण्याचें कारण आहे.

पण येवढें मानून तरी कुठें काम भागत आहे? कारण परलोक जरी मानला, तरी तेथें येथील सदाचाराचा मोबदला सुख व दुरा-

चाराचा मोबदला दुःख हें नियमेंकरून मनुष्याच्या कृतीप्रमाणें त्याला मिळावयास कोणी तरी जबाबदार पुरुष मानणें अवश्य आहे व असा पुरुष म्हणजेच ईश्वर होय. तात्पर्य, आपल्याकडे ज्याप्रमाणें कर्म हें स्वभावतःच जड असल्यानें कर्मफलदाता म्हणून कर्माध्यक्ष ईश्वर मानावा असें म्हणतात, त्याच जातीचें हें कान्टचें प्रमाण आहे.

कान्टचा हा पुरावा अगदीं दोषरहित आहे असें नाहीं. यावरहि त्यानंतर झालेल्या तत्त्वजिज्ञासूंनीं आक्षेप घेतलेलेच आहेत. उदाहरणार्थ सद्गुणी, सदाचारी हा सुखी असावाच असें मानाच कां? येथूनच या प्रश्नांना आरंभ करतां येण्यासारखा आहे.

कान्टनंतर अगदीं अर्वाचीन काळापर्यंतसुद्धां ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याकरतां वेगवेगळे पुरावे आणले जात आहेत. परंतु हें प्रकरण येथेंच थांबवीत आहोंत. याचें कारण एक तर आतांपर्यंत ज्या प्रमाणांचा विचार मांडला त्यांत बहुतेक महत्त्वाचे प्रकार आले आहेत व अगदीं अर्वाचीन पुराव्यांकरतां एक स्वतंत्र प्रकरणच ठेवलें आहे. असो. तूर्त वाचकांच्या नजरेसमोर येवढेंच आणूं इच्छितों कीं, सॉक्रेटिसाच्या काळापासून तों कांटच्या काळापर्यंत जे मोठमोठे तत्त्ववेत्ते होऊन गेले, त्यांपैकीं कांहीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतके थोडे सोडून दिले तर बहुतेक सर्वांनीं या ना त्या कारणाकरितां, पण ईश्वर मानलेला आहे. यांपैकीं प्रमुख प्रमुख अशांचीं मतें वर दिलीं आहेत.

येथें लक्षांत ठेवण्यासारखी आणखी एक गोष्ट अशी आहे कीं, या तत्त्ववेत्त्यांचे येन्हवीं इतर बाबतींत कितीहि मतभेद असले, तरी पण ईश्वराचें अस्तित्व मानण्याच्या बाबतींत त्यांचें ऐकमत्य आहे. उदाहरणार्थ फ्रेंच तत्त्ववेत्ता देकार्त व आंग्ल तत्त्ववेत्ता लॉक, आयरिश तत्त्ववेत्ता बर्क्ले व डच तत्त्ववेत्ता स्पिनोझा हे अगदीं परस्परविरोधी मताचे म्हणून तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. पण

ईश्वराचें अस्तित्व मानण्याच्या बाबतींत यांचें एकमत आहे. देकार्त व बर्क्ले हे जसे ईश्वर मानतात त्याचप्रमाणें लॉक् व स्पिनोझा हेहि ईश्वराचें अस्तित्व मानतात. तात्पर्य हे तत्त्ववेत्ते वेगवेगळ्या देशांत व वेगवेगळ्यांत काळांत होऊन गेलेले, यांची तत्त्वज्ञानविषयक मतें भिन्न भिन्न, यांच्या ईश्वरविषयक कल्पनाहि भिन्न भिन्न, पण येवढी गोष्ट मात्र खरी कीं प्रत्येकास कोणत्या ना कोणत्या कारणांकरतां ईश्वर मानणें अवश्य वाटलें; व ईश्वरसिद्धीच्या दृष्टीनें ही कांहीं लहान गोष्ट नव्हे.

---

# आस्तिक वादांतील कांहीं मतें : : : ६

येथपर्यंत ईश्वराच्या कल्पनेचा उगम व पौर्वात्य व पाश्चात्य देशांतील पुरावे यांचा विचार झाला.

आतां जे इतर महत्त्वाचे प्रश्न आहेत त्यांकडे वळूं. त्यांपैकीं अर्थातच अग्रस्थान ईश्वराचें अस्तित्व, त्याचें स्वरूप व त्याचा जगताशीं संबंध याच प्रश्नांना असणार. एतद्विषयक जीं मतें आहेत, त्यांचें खालीलप्रमाणें वर्गीकरण करतां येईल.

- ईश्वरविषयक विचार
  - नास्तिकवाद
    - ऐंद्रियिक ज्ञानाच्या सत्यतेवर अधिष्ठित
    - भौतिक विज्ञानांवर अधिष्ठित
  - आस्तिकवाद
    - ज्ञानाच्या तात्त्विक चर्चेवर अधिष्ठित
      - Deism (निर्माता स्वतंत्रता–वाद)
      - Pantheism (जगदीशैक्यवाद)
      - Theism 'दशांगुळें उरला'–वाद
    - अनेक देवता-वाद Polytheism
    - एकश्रेष्ठ देवता-वाद Henotheism
    - एकेश्वरी वाद Theism

यांपैकीं नास्तिकवाद व एकेश्वरी वाद यांचा दोन स्वतंत्र प्रकरणांत विचार केला आहे. अनेकदेवतावाद व एकश्रेष्ठदेवतावाद यांचा उल्लेख मागील प्रकरणांत येऊन गेलाच आहे. या प्रकरणांत एक देव मानून त्याचा जगताशीं वेगवेगळ्या प्रकारानें संबंध मानल्यानें जीं मतें उत्पन्न होतात, त्यांचा थोडक्यांत उल्लेख करण्याचें योजिलें आहे.

# शुद्धिपत्र

पान ( ६४ )– या पानावर ईश्वरविषयक विचारांचे वर्गीकरण दिले आहे त्यांत

( १ ) ' ज्ञानाच्या चर्चेवर अधिष्ठित ' हा आस्तिकवादांतील भेद म्हणून दिला गेला आहे. तो ' नास्तिकवादांतील भेद ' आहे असे समजावे.

( २ ) ' निर्मातास्वतंत्रतावाद ' वगैरे एकेश्वरीवादाचे ' प्रकार आहेत असें समजावे.

चालले आहे. जगतांत चमत्कार म्हणून कांहीं नाहीं. सर्व अगदी नियमबद्ध आहे.

हें मत हल्लीं प्रचारांत नाहीं. यावर एक दोन आक्षेप येण्यासारखे आहेत ते देऊन दुसऱ्या मताकडे वळूं.

( १ ) ईश्वरानें ज्या क्षणाला सृष्टि निर्माण केली त्याच क्षणाला कां केली ? पूर्वी कां केली नाहीं व लांबणीवर कां टाकली नाहीं ?

( २ ) जगताहून अगदीं वेगळा ईश्वर मानण्यांत त्याचें अनंतत्व राहत नाहीं.

यांपैकीं कांहीं दोष जगदीशैक्यवाद (Pantheism) या मतांत दूर झाले आहेत.

या मताचे अनुयायी होते व आहेत. आपल्याकडील उपनिषदें हीं या मताचीं आहेत असें तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणारे पाश्चात्य लेखक लिहितात. पाश्चात्य देशांतील या मताचे अनुयायी खालील-प्रमाणें आहेत. ग्रीक तत्त्वज्ञानाचें सबंध वळणच या जातीचें आहे. इटालिअन् भौतिक शास्त्रज्ञ जिओर्ड्यानो ब्रूनो, डच देशांतील स्पिनोझा, शामर्ण्यदेशीय फिक्टे, शेलिंग, हेगल, फ्रेंच कूझे, आंग्ल लेखक कार्लाइल, मॅथ्यू ऑर्नोल्ड वगैरे सर्व याच मताचे लोक आहेत.

या मतांत ईश्वर हा जगताबाहेर नव्हे तर जगतास व्यापून जगतांत भरला आहे असें मानलें आहे. याचा परिणाम दोन प्रकारचा आढळून येतो; एक जगन्मिथ्यत्व आणि ईश्वराची परिच्छिन्नता. कारण जगायेवढाच जर ईश्वर असला तर जग कितीहि मोठें असलें तरी तें परिछिन्न असल्यानें ईश्वरहि परिछिन्नच होणार.

यांपैकीं तिसरें मत 'दशांगुलें-उरला' वाद (Monotheism) असें आहे. या मताप्रमाणें ईश्वर हा जगतांत व्यापून शिवाय उरला आहे. तो जगतांत असला तरी जगायेवढा नव्हे; तो दशांगुलें उरलाच आहे. 'दशांगुलें उरला' या मताचे अनुयायी पुष्कळच आहेत. व्यापक अर्थानें उपनिषदें याच मताचीं आहेत. आपल्याकडील रामानुजादि आचार्य व पाश्चात्य देशांतील प्लेटो, आरिस्टॉटल्, देकार्त, लाइबिनिट्झ्, कान्ट, लोट्झ्, वार्ड इत्यादि लोक याच मताचे आहेत. या मताचा विचार पुढील प्रकरणांत केला आहे.

# एकेश्वरी वाद : : : ७

सर्वसत्ताधीश, पवित्रांतला पवित्र, सर्वज्ञ, उत्कृष्ट गुणांनीं युक्त असा ईश्वर जगाचें कारण आहे असें एकेश्वरवादी मानतात. असें मानतां येत नाहीं असें अनीश्वरवादी नास्तिकांचें म्हणणें आहे. ईश्वरानें हें निर्माण केलें व त्या प्रभूच्याच सत्तेनें चाललें आहे, असें मानणारा वर्ग ज्याप्रमाणें पुरातन कालापासून आहे तसाच विरोचनादिकांचा पंथहि सनातन आहे. ‘ द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन् दैव आसुर एव च ’ ही भगवदुक्ति आस्तिक व नास्तिक दोन्ही सनातनच आहेत हेंच दाखवीत आहे.

आपल्याकडील अनीश्वरवादाचा इतिहास आपण पाहूं लागलों असतां आपणांस विरोचन-चार्वाक यांच्यापर्यंत जसें पोंचतां येतें, तसें पाश्चात्य देशांत एकेश्वरीवादाविरुद्ध जीं प्रमाणें आणलीं जातात त्यांचा इतिहास पाहूं गेलें असतां तीं बहुतेक आपल्याला बीजरूपानें ल्यूक्रिशस् या रोमन कवीच्या ग्रंथांतून सांपडतात. त्यानंतर त्यांची उत्तम चर्चा प्रसिद्ध स्कॉटिश तत्त्ववेत्ता ह्यूम् याच्या ग्रंथांत सांपडते. त्यानंतरचे बेनथॅम्, मिल् व तदनंतरचे अर्वाचीन नास्तिक या सर्वांचें मूळ आपणांस ह्यूमच्या मतांत आढळून येईल. म्हणून ल्यूक्रिशस व ह्यूम यांच्या मतांचा सारांश खालीं दिला आहे.

नास्तिक म्हणतो कीं, “सकल उत्तम गुणांनीं संपन्न, सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् असा ईश्वर जगताचें कारण मानणें अयुक्तिक आहे. कारण ईश्वरानें निर्माण केलेलें म्हणून तुम्ही म्हणतां तें हें जगत् दुःखानें भरलेलें, अतएव सर्वस्वीं अपूर्ण असें आहे. आपल्यासमोर पसरलेल्या

जगाकडे जर आपण पाहिलें, तर तें इतकें वाईट आहे कीं, त्याचा कर्ता आणि शास्ता वर वर्णन केलेला सर्वज्ञ ईश्वर असेल हें संभवनीय असें वाटत नाहीं. हें जग खरोखरच का सुंदर व सुखरूप असें आहे ? जगांत केवढें दुःख भरलें आहे ? रोग, सांथी, भांडण-तंटे, जरा, मृत्यु, युद्धें, जीवनाकरितां चढाओढ, लांडी लबाडी इत्यादि आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक, अशा प्रकारच्या दुःखांनीं जग होरपळून निघत आहे. जगास दुःखाचा इतका अनुभव आहे कीं, 'सुख नाहीं कोठें आलिया संसारीं' अथवा 'जगीं सर्व सुखी असा कोण आहे ?' असल्या तऱ्हेचीं वचनें फारसें व्याख्यान न करतां लोकांना पटत असतात. यावरून जर अनुमानच काढावयाचें असेल, तर तें असें काढावें लागेल कीं, जगाचें कारण जर कोणी सर्वज्ञ ईश्वर असलाच तर तो दुष्ट असला पाहिजे व सुष्ट ईश्वर जगाचें कारण असेल तर तो दुर्बल असला पाहिजे. त्याला आपला हेतु या जगाच्या रचनेंत सिद्धीस नेतां आला नाहीं असें स्पष्ट दिसतें.

( २ ) ईश्वर जर खरा दयाळु व सर्वशक्तिमान् आहे, तर मग त्यानें मनुष्याला प्रथमपासूनच सर्वगुणसंपन्न, सकलकलापूर्ण असें कां निर्माण केलें नाहीं ? निदानपक्षीं आहे त्यापेक्षां त्याला सभोंवतालची परिस्थिति वेगळी तरी खास करतां आली असती."

( ३ ) ईश्वर हा जगताचें कारण म्हणून मानला पाहिजे असें म्हणण्याचें कारण पुष्कळ वेळेला असें सांगण्यांत येतें कीं, या जगतांत जें रचनाचातुर्य आपणांस दिसून येतें त्याचा उलगडा ईश्वराचें अस्तित्व मानल्याविना होणार नाहीं. या जगांत एकमेकास उपयोगी पडणाऱ्या, नव्हे, एकमेकांकरितांच जणूं निर्माण झालेल्या वस्तु दिसून येतात. उदाहरणार्थ, उन्हाळा, पावसाळा व हिंवाळा हे ऋतू; विशेषतः या ऋतूंत उत्पन्न होणारे खाण्याजोगे पदार्थ; कांहीं फळें

हिंवाळ्यांतच होतात तर कांहीं उन्हाळ्यांतच होतात; या ऋतूंत उत्पन्न होणाऱ्या उपद्रवांना तोंड देण्याच्या मनुष्याजवळच्या युक्त्या; वेगवेगळ्या चतुष्पाद, द्विपाद, भूचर, खेचर वगैरे प्राण्यांना योग्य असे आहार. हें सर्व पाहून यांचा विचार करूं लागलें असतां असें वाटतें कीं, ही एकमेकांस योग्य, एकमेकांस पोषक, अशी जी सृष्टि निर्माण झाली ही आकस्मिक निर्माण झाली नाहीं; तर विशिष्ट हेतूनें कर्त्यानें निर्माण केली असली पाहिजे. रान आणि बाग यांत आपण फरक करतों कीं नाहीं? रान आपोआप उगवतें. बाग तयार करावी लागते. बागेंत आपणांला झाडांची मांडणी, गवताची कापणी व्यवस्थित केलेली दिसते व यामुळें आपण बाग पाहिली कीं कोणा तरी माळ्यानें ही तयार केली असली पाहिजे असें अनुमान बांधतों. विश्व ही एक प्रकारची मोठी बाग आहे; व ईश्वररूपी माळी हा कांहीं झाडें नवीन लावतो, कांहींचे शेंडे कात्रीनें कातरतो, तर कांहीं अजीबात उपटून टाकतांना दिसतो. तात्पर्य, या जगाच्या रचनाचातुर्यावरून जगत्-निर्माता असा ईश्वर मानल्यावांचून गत्यंतर नाहीं असें म्हणणें प्राप्त आहे.

यावर अनीश्वर-वाद्यांचें म्हणणें असें आहे कीं, हें जें एकेश्वरी-वाद्यांचें म्हणणें आहे तें बरोबर नाहीं. कारण एक तर जगतांत परिपूर्ण असें रचना-कौशल्य दिसून येत नाहीं. मनुष्यशरीर जर रचनापूर्ण कौशल्याचें एक उदाहरण म्हणून घ्यावयाचें तर त्यांत किती तरी असे दोष दाखवितां येतील कीं, ज्यांवरून हें शरीर बुद्धि-पुरःसर मोठ्या कुशल कारागिरानें निर्माण केलें आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. जर मानवी शरीरांतच शरीराबाहेरून येणाऱ्या वेगवेगळ्या रोगांच्या जंतूंचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य ठेवलें असतें तर माणसें प्लेग, इन्फ्लुएन्झा वगैरे विकारांना बळी पडतीं ना. खरें सांगायचें तर मोठमोठ्या शोधकांनींच ही ईश्वराची उणीव भरून काढली आहे.

आणि शरीराला प्रतिकार करण्याचें सामर्थ्य वाढवितां यावें म्हणून वेगवेगळ्या लसींचा शोध लावून त्या मानवी शरीरांत टोंचण्याची क्रिया सुरू केली आहे. गाईचें अथवा म्हशीचें वांसरूं ज्याप्रमाणें दोन दिवसांत आपल्या पायावर उभें राहतें असें मनुष्याचें मूल कां उभें राहूं नये ? जी अर्धीमुर्धी रचना दिसते त्यावरून येवढेंच फार झालें तर सिद्ध होईल कीं, ईश्वर म्हणून कोणी तरी एक माळ्यासारखा कारागीर आहे; म्हणजे त्यानें सृष्टि निर्माण केली नव्हे, तर आगाऊ अस्तित्वांत असलेल्या मालमसाल्यास एका विवक्षित तऱ्हेचें रूप देण्याचा तो प्रयत्न करीत आहे. तात्पर्य, जी रचना दिसून येते तीवरून जगत्‌निर्मात्या सर्वज्ञ ईश्वराचें अस्तित्व सिद्ध होत नाहीं, तर शाडूचा गणपती तयार करणारा अथवा खांडून लावणी करून पाणी घालून बागा तयार करणारा जसा एकादा कारागीर असावा असा कोणी एक मोठा कारागीर असावा एवढेंच सिद्ध होतें.

पण खरी मौज जर असेल तर ती याच्यांत आहे कीं, अर्धीमुर्धी रचना जी आपणांस दिसते तीसुद्धां ईशानिर्मित मानण्याचें कारण नाहीं असें विकासवादी म्हणतात. देवींची सांथ कभी होऊन माणसें मरूं नयेत याला कारण जेनरनें केलेला शोध. वेळ वांचूं लागला याला कारण स्टीव्हन्‌सन्, मार्कोनी यांचे शोध. तात्पर्य, मनुष्य हा जर निसर्गाचा अधिक सुखानें उपभोग घेत असेल, तर त्याला निसर्ग-निर्मात्याचें चातुर्य कारण नाहीं तर मानवी बुद्धीचा व शक्तीचा उपयोग हेंच कारणभूत आहेत.

पहिल्या आक्षेपाशीं जुळणारा, पण थोड्या वेगळ्या प्रकारचा आक्षेप आपल्याकडेसुद्धां नेहमीं घेतला जातो.आपल्याकडे ‘ वैषम्य-नैर्घृण्य ’ दोष या नांवानें तो प्रसिद्ध आहे. तो श्रीमत् शंकराचार्यांनीं सूत्रभाष्यांत ( २-१-३ ) उत्तम मांडला आहे. तो असाः—निःपक्ष-

पाती सद्गुणी ईश्वर जगाचें कारण आहे असें मानतां येत नाहीं. कारण, कित्येक देवादिकांसारख्यांना त्यानें फारच सुखी असे निर्माण केलें; पश्वादिकांच्या दुःखयोनी निर्माण केल्या व सुखदुःखाची खिचडी खाणारा मनष्यप्राणी निर्माण केला. अशी ही विषम सृष्टि निर्माण करणाऱ्या ईश्वराच्या अंतःकरणांत सामान्य माणसाप्रमाणेंच रागद्वेष असावेत असें वाटतें. येऱ्हीं कांहींच्या वांट्याला भरपूर सुख, कांहींना भरपर दुःख व कांहींना सरमिसळ असे वेगवेगळे भाग तो कां करता? त्याच्यांत जर खरी समता असती, तर त्यानें सर्वांना सारखेंच सुखी ठेवलें असतें. तात्पर्य, हा सृष्टि निर्माण करणारा ईश्वर रागद्वेषानें युक्त असा असावा हें स्पष्ट आहे.

आपणांस ईश्वराच्या ठिकाणीं जशी विषमता दिसून येते, तशीच मोठी निर्दयताहि दिसून येते. ईश्वर हा पाषाणहृदयी असावा असेंहि सिद्ध करणें फारसें कठीण नाहीं. किती तरी वृद्ध मातापित्यांपासून त्यांचीं एकुलतीं एक मुलें यानें ओढून नेलीं आहेत! कित्येक नूतन वधूंपासून त्यांचे प्रियकर याच्या निर्घृण हातांनीं दूर केलेले आहेत! भूकंपांत निरपराधी माणसांचे कितीतरी बळी यानें घेतले आहेत! आगगाड्यांच्या टक्करी, बोटींच्या जलसमाधि अशा एक ना अनेक गोष्टी दाखवितां येतील कीं, ज्यांवरून प्रजेचा संहार करणारा ईश्वर खास निर्दय असला पाहिजे हें उघड सिद्ध होईल.

आणखी एक आक्षेप घेण्यांत येतो तो असा कीं, ईश्वरानें हें जग निर्माण कसें केलें? लहानसहान गोष्टी कशा निर्माण केल्या जातात हें समजतें. पण हें अफाट विश्व ईश्वरानें कोणत्या पद्धतीनें निर्माण केलें हें सांगतां येत नाहीं व जगाचें कोडें उलगडत नाहीं. मग ईश्वर मानाच कां?

वर जे नास्तिकांनीं आक्षेप घेतले आहेत, त्यांना खालीलप्रमाणें उत्तरें देतां येण्यासारखीं आहेत.

( १ ) प्रथम ईश्वरानें हें जग निर्माण कसें केलें हा शेवटचा आक्षेप घेऊं. यावर लॉक् या आंग्ल तत्त्ववेत्त्यानें दिलेलें उत्तर सांगण्यासारखें आहे. तो म्हणतो कीं, हा प्रश्न विचारणाऱ्याचा झोंक असा दिसतो कीं, जणूं काय येवढाच एक निर्मितीचा प्रकार असा आहे कीं, तो आपणांस ठाऊक नाहीं; बाकी सर्व गोष्टी सहज सोप्या समजण्यासारख्या आहेत. असा प्रश्न विचारणाऱ्यांस विचारावें कीं, " विचारानें गति कशी निर्माण होते हें सांगतां येतें कां ? " पण आपण तें मानतोंच कीं नाहीं ! तसेंच ईश्वरानें हें जग कसें निर्माण केलें हें सांगतां येत नाहीं, येवढ्यावरूनच तें ईश्वरानें निर्माण केलें नाहीं, हें म्हणणें चुकीचें होईल.

( २ ) आतां पहिल्या आक्षेपाचा विचार करूं. तो आक्षेप असा कीं, जर जगाचा कर्ता सर्वज्ञ व सर्वशक्तिमान् ईश्वर आहे तर जगतांत दुःख कां असावें ?

याचें पहिलें उत्तर असें आहे कीं, जगतांत नास्तिक म्हणतो इतकें दुःख नाहीं. जर जग दुःखानें भरलेलें असतें, तर लोकांनीं भराभर आत्महत्त्या केल्या असत्या. जगांत आत्महत्येचें प्रमाण पाहूं गेलों, तर आपणांस असें आढळून येईल कीं, तें फारच कमी आहे. अर्थातच नास्तिक म्हणतो, इतकें जग दुःखानें भरलेलें नाहीं.

‘ सुख नाहीं कोठें आलिया संसारीं । ’ असलीं जीं साधूंचीं वचनें आहेत, तीं संख्यावाचक नाहींत; तर गुणवाचक आहेत. ‘ जगांत सुख नाहीं ’ या साधुसंतांच्या म्हणण्याचा अर्थ लोकांना मुळींच सुखाचा लेशसुद्धां भोगावयास मिळत नाहीं, असा नाहीं. तर ज्या जातीचें सुख मनुष्यास मिळणें शक्य आहे व ज्याकरितां मनुष्य जन्म

आहे असें ते समजतात, त्या जातीचें सुख देण्याचें सामर्थ्य विषयांत नाहीं येवढाच अर्थ आहे.

नास्तिकाच्या आक्षेपास खरें उत्तर असें आहे कीं, एक काळ दुःखास वाईट म्हणण्याचा होता. तो काळ नीट्झ्शेच्या नंतर पालटला आहे. विचारी लोक आतां दुःख व दुःखकारण यांकडे अगदीं वेगळ्या नजरेनें पाहूं लागले आहेत. रोग, लढाई, मृत्यु हीं हवींतच असें कांहीं तत्त्ववेत्ते म्हणूं लागले आहेत. हिरॅक्लिट्स् या ग्रीक तत्त्ववेत्त्यानें म्हटलें आहे कीं लढाई ही सर्वांचा ( सर्व मूल्यांचा ) उगम आहे. ( Strife is the father of all things. ) नीट्झ्शे म्हणतो कीं, लढाईमुळेंच किती तरी चांगल्या गोष्टी निर्माण होतात; व एका दृष्टीनें तें खरें आहे. पारतंत्र्यांत खिचपत पडणाऱ्या राष्ट्रांना स्वतंत्र होण्याची संधि येत असेल तरी लढाईनेंच.

शिलर या आंग्ल उपयुक्ततावादी तत्त्ववेत्त्यानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, प्रत्येक मनुष्यास मरण येतें म्हणून बरें. नाहीं तर जगांत ज्ञानाची, कलेची वगैरे वाढच होणार नाहीं ! कारण मनुष्य जसजसा वृद्ध होतो तसतशी नवी गोष्ट करण्याची त्याची तयारी नसते व जुन्यासच तो चिकटून बसतो. वृद्ध माणसें मरतात म्हणून मुलांना मालमत्तेचे मालक म्हणून मोकळेपणानें उपभोग करायला तरी मिळतें. तात्पर्य, मरण हें कांहीं सर्वस्वीं वाईटच आहे असें नाहीं.

जी गोष्ट लढाई, मरण यांची तीच रोगांची. रोग आहेत म्हणून डॉक्टर, वैद्य, हकीम जगत आहेत. रोगांच्या सांथी येतात म्हणून हे श्रीमंत होतात. तात्पर्य, बरें-वाईट हें सापेक्ष आहे, पाहण्याच्या संकोचित अथवा व्यापक दृष्टीचा परिणाम आहे. याबाबत एक विचार जागृत करणारी गोष्ट देऊन पुढें जाऊं. पुण्यासारख्या शहरीं स्मशानाजवळ लांकडें, गोऱ्या वगैरे प्रेतें जाळण्यास लागणारें सामान विक-

ण्याचें एका गृहस्थाचें दुकान होतें. पण तें दुकान त्यानें रक्कम कर्जाऊ काढून घातलें होतें. पहिल्या वर्षीं त्यानें व्याज व कांहीं मुद्दल परत दिलें. पण पुढें दोन तीन वर्षें त्याला कांहीं एक देतां आलें नाहीं. तेव्हां धनको हा ऋणकोच्याकडे गेला व आपले पैसे मागूं लागला. यावर तो दुकानदार म्हणाला, " बाबा, मला देणें कबूल आहे. पण काय करूं ? गेले दोन साल एकहि सांथ या गांवांत आली नाहीं. मी दुकान घालण्यापूर्वीं ती दरसाल येत असे. व मी ज्याच्याजवळ नोकर होतों त्याचा धंदा चांगला चाले म्हणून मी हें दुकान घातलें. एक वर्ष दम धरा. पुढल्या सालीं कॉलरा, नाहीं तर प्लेगची सांथ आली, कीं तुमचे पैसे सव्याज फेडीन ! " आतां रोग, सांथ हीं बरीं का वाईट ?

तात्पर्य, जगत्-निर्माता देव हां दुर्बल नव्हे, तर सर्वशक्तिमान् आहे व म्हणूनच त्यानें असें वैचित्र्यपूर्ण जगत् निर्माण केलें आहे.

(३) मनुष्यास त्यानें पूर्ण व सुखी कां केलें नाहीं?मनुष्याला भोगायोग्य अशी सृष्टि कां केली नाहीं ? असा दुसरा आक्षेप आहे. याचें उत्तर असें कीं, सर्व सृष्टि देवानें आपणांकरितांच केली ही घमेंड मनुष्यानें बाळगावीच कां ? जगांत सुखच हवें असें गृहीत धरून कां चालतां ? त्याविना का पुरुषार्थच नाहीं ? कित्येकांचें तर म्हणणें असें आहे कीं, मनुष्यास असें अपूर्णच ठेवलें म्हणून पूर्ण होण्याचा आनंद तो भोगूं शकतो. चढाओढ, प्रयत्न, अपयश यानें तर यशास रंग चढतो. मनुष्य हा सृष्टींतील सर्वांत ज्ञानी प्राणी म्हणून कांहीं तो देवाच्या गळ्यांतला ताईत आहे असें नाहीं. मनुष्यावर जगणारे असे ढेंकूण, पिसा, इत्यादि प्राणी आहेतच. एका तत्त्ववेत्त्यानें तर यांचाहि उपयोग दाखविला आहे !

(४) तिसरा आक्षेप रचनाचातुर्याबाबत आहे. या बाबतींत खरा आक्षेप विकासवादी व विज्ञानवादी यांचा आहे. त्याला उत्तर असें आहे कीं, एक

काळ असा होता, कीं विकासाच्या कल्पनेनें सर्व कोडीं उलगडतात अशी शास्त्रज्ञांची भावना होती. पण आतां कालगतीनेंच त्यांना कळलें आहे कीं, विकासाची कल्पना जरी खरी असली तरी त्याचें अमुकच स्वरूप असलें पाहिजे, विकास अमक्याच नियमानें होत असला पाहिजे हें सांगणें कठीण आहे. त्यांत नवीन नवीन शोध उत्पन्न होत आहेत. डार्विनची जीविताकरितां चढाओढ ही कल्पना जाऊन त्या-ऐवजीं पॅटन् यांनी मांडलेलीं शिस्त व सहकार्याची कल्पना पुढें येऊं पाहत आहे. विकासांतसुद्धां हेतु आहे व तद्नुसार ही रचना होत आहे असें कित्येक शास्त्रज्ञ* मानूं लागले आहेत. वुइल्यम् पॅटननें तर 'The Grand strategy of Evolution' असें पुस्तक लिहिलें आहे.

(५) मनुष्यानें शोध लावून रोगादि दुःखाचा प्रतिकार केला " त्यांत ईश्वराचा कांहीं संबंध नाहीं, " असें ज्या वेळीं म्हटलें जातें त्यावेळीं नास्तिक विसरतो कीं, आस्तिक असें म्हणत नाहीं कीं वैद्याचें औषध घेऊन गुण आला तरी तो ईश्वरानेंच आणला; तेव्हां औषध घेण्याची जरूरी नाहीं. पण हेंही लक्ष्यांत ठेवलें पाहिजे कीं औषधानेंच गुण येता, तर रोगी अथवा औषध देणारा वैद्य हे मरतेच ना ! तात्पर्य, मनुष्यानें नवीन नवीन शोध लावून माणसांना

---

* विकासवाद व रचनावाद याविषयीं फिक्टे या तत्त्ववेत्त्याचे खालील उद्गार लक्ष्यांत ठेवण्यासारखे आहेत. तो म्हणतो:—

" The process of Evolution is itself the working out of a mighty teleology of which our finite understandings can fathom but the scantiest rudiments......It has been truly said that Evolution spells purpose. "

अधिक सुखी बनवेल हें न नाकारतांसुद्धां असें म्हणतां येईल कीं, असें होणें हें या रचनेचेंच एक अंग आहे.

( ६ ) वैषम्यनैर्घृण्याचा जो आक्षेप आहे, त्यालाहि खालीलप्रमाणें उत्तर देतां येईल. देव हा कर्माध्यक्ष आहे, कर्माच्या कायद्याचें अधिष्ठान आहे. तो प्रत्येक मनुष्यास अथवा त्याच्या सुखदुःखांस निर्माण करीत नाहीं. तें सर्व ज्याच्या त्याच्या कर्मावर अवलंबून आहे. पण हें न कळल्यामुळें त्या देवाच्या डोक्यावर किती तरी कर्मे लादलीं जातात. कल्पना करा कीं, एखाद्या वृद्धाचा एकुलता एक मुलगा मेला तर अडाणी लोक म्हणतात, "देवाला पाहवलें नाहीं!" पाऊस न पडून पिकें जळूं लागलीं, कीं लोक म्हणतात, "देवाला डोळे नाहींत का?" वास्तविक देव कोणाला कोणतीच गोष्ट एकदम उचलून देत नाहीं. आपणांस सुखी, दुःखी वगैरे जे प्रकार माणसांत दिसतात त्यांना कारण त्या त्या प्राण्यांचें कर्म व तदनुसार त्यांना मिळालेली उपाधि हें होय. यांत ईश्वराचा कर्माध्यक्षत्वापलिकडे कांहींहि संबंध नाहीं.

वरील सर्व आक्षेप ईश्वर हा प्रत्येक कामांत ढवळाढवळ करणारा आहे अशी कल्पना धरून केलेले आहेत. पण ही कल्पनाच मुळांत चुकीची आहे.

---

# ईश्वरसिद्धीचे अर्वाचीन पुरावे : : : ८

* Though master keep aloof,
Signs of His presence multiply from roof
To basement of the building !

Browning

मनुष्य लहानाचा मोठा झाला म्हणजे त्याचे लहानपणींचे कपडे त्याला अपुरे होतात. वेगवेगळ्या शास्त्रीय कल्पनांचीहि अशीच स्थिती आहे. ज्या कल्पनांनीं पूर्वीच्या काळच्या लोकांचें समाधान होत असे त्या कल्पना या युगांत मनुष्यांचें समाधान करण्यास समर्थ होत नाहींत. ईश्वरकल्पनेस कारण, माझें कारण अथवा जगाचें कारण, अथवा जगताच्या रचनेचें कारण म्हणून ईश्वर मानला पाहिजे हीं प्रमाणें वेगवेगळ्या शास्त्रांची वाढ जोंपर्यंत झाली नव्हती तोंपर्यंत बरीं वाटत होतीं. आतां कार्य--कारण भाव, जगताचें स्वरूप यांची सूक्ष्म छाननी झाल्यानें हीं कारणें लंगडीं वाटूं लागतात.

मनुष्याच्या विचारांत पूर्वीं जगताला जें स्थान होतें तें आतां नाहीं. विचारांचें केंद्र हें स्थूळ जगतापासून मनुष्याच्या अनुभवावर येऊन बसलें आहे. कारण, जर अनुभव असेल, तर जगत्. तेव्हां आपल्या अनुभवांशीं संबंध आणून पोंचविला तर आधुनिक मनास ती गोष्ट चटकन् पटते. या दृष्टीनें ईश्वर आहे असें सिद्ध करणें

* प्रभु जरी अलिप्त राहिले, तरी त्यांच्या अस्तित्वाच्या खुणा या (विश्व) मंदिराच्या छपरापासून तों पायापर्यंत असंख्य पसरलेल्या दिसत आहेत.

असल्यास आपल्या अनुभवाशीं त्याचा संबंध सांगणें अवश्य झालें आहे. यामुळें या नवीन पद्धतींत मूल्याला फार किंमत आहे व ह्यावरच आधुनिक तत्त्ववेत्ते भर देऊं लागले आहेत.

आधुनिक काळांतील पद्धतींचें निदर्शक म्हणून खालील पुरावे देतां येतील.

( १ ) बाल्फर यांनीं आपल्या 'Theism and Humanism' या पुस्तकांत ईश्वरसिद्धीकरितां जे पुरावे आणले आहेत ते जुन्या-पुराण्या पद्धतींचे नाहींत. त्यापैकीं एक खालीं देत आहोंत.

बाल्फरसाहेबांचें म्हणणें असें कीं, " कांहीं गोष्टी अशा आहेत कीं, ज्यांवर आपण विश्वास ठेवतोंच ठेवतों. उदाहरण--आपल्या डोळ्यांसमोर पसरलेलें जग, ह्यावर आपण विश्वास कां ठेवतो ? तर आपल्या ऐन्द्रियिक संवेदनांचें कारण, आपल्या कल्पनेहून वेगळें ज्याला स्वतंत्र अस्तित्व आहे, असें मानणें अवश्य आहे म्हणून. तशीच आपल्या ठिकाणीं अप्रतिम सौंदर्य पाहून उत्पन्न होणाऱ्या भावना, नैतिक गुणांच्या उच्चांकाविषयीं आपणांस असणारें प्रेम यांची जर छाननी केली तर आपणांस यांचें अधिष्ठान ईश्वर हाच मानावा लागतो.

( २ ) आधुनिक पद्धतीनें ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न वुइल्यम् जेम्सनें आपल्या 'The Varieties of Religious Experience' या पुस्तकांत केला आहे.

'आपण ईश्वर मानला अथवा नाहीं, तर अनुभवांत नक्की कोठें फरक पडतो ?' असा प्रश्न उत्पन्न करून हा माननीय मानसशास्त्रवेत्ता म्हणतो:—

" ईश्वराचें अस्तित्व मानणें अथवा न मानणें यामुळें जर कोठें फरक दृष्टोत्पत्तीस येत असेल तर तो सद्गदित अंतःकरणानें केलेल्या प्रार्थनेच्या प्रसंगीं. विशेषतः ज्या वेळीं अंतरात्म्यांतून विलक्षण प्रकारच्या

उसळीनें आपलें मन आश्चर्ययुक्त अशा अनुभवानें भरून जातें, त्या वेळीं असें दिसून येतें कीं, पाहिली तर आपल्यांतीलच, पण सूक्ष्म पाहूं गेलें असतां, आपली जी नेहमींची वृत्ति त्याहून अगदीं वेगळ्या जातीची, म्हणून; आपणांहून भिन्न म्हणण्यास हरकत नाहीं अशा तऱ्हेची उच्च वस्तु आपल्यावर आपला प्रभाव गाजवीत असते. आणि त्याचा परिणाम असा होतो कीं, येऱ्हवीं आपणांस ज्या गोष्टी अनुभवास आल्या नसत्या, किंवा ज्या गोष्टी करणें आपणांस शक्य नसतें तसल्या गोष्टी आपणांकडून घडूं लागतात. तात्पर्य, आपल्या नेहमींच्या वृत्तीपलीकडे सूक्ष्म जग जर असेल व त्यांतील शक्तींचा आपल्या मनावर राहून राहून परिणाम होत असेल व त्या शक्तींचा अनुभव येण्यास अंतर्मनाचा दरवाजा उघडणें हें कारण असेल तर हें सर्व शक्य आहे व याविषयीं आध्यात्मिक अनुभवांत भरपूर पुरावा आहे. या बाबतींत तर माझें असें स्पष्ट मत आहे कीं, येथें आपल्या दृश्य स्थूल जगताबाहेरची शक्ति-आपण तिला पाहिजे तर ईश्वर म्हणूं—काम करीत आहे असें मानणें ही सहज व स्वाभाविक सुचणारी अशी कल्पना आहे."

आणखी एके ठिकाणीं त्यानें याहीपेक्षां स्पष्ट शब्दांत ईश्वर मानणें कसें अवश्य आहे हें दाखविलें आहे.

" मनुष्याकडून एखादे वेळीं पापकर्माचें आचरण होतें; पण पुढें त्याचा त्याला पश्चात्ताप होतो. अशा खऱ्या पश्चात्तापप्रसंगीं तो आपल्यांतील उच्च अशा जीवात्म्याशीं तादात्म्य करीत असतो. आणि कित्येक प्रसंगीं त्याला असा अनुभव येतो कीं, आपल्यांतील हा उच्च जीवात्मा आपल्यासमोर पसरलेल्या बाह्य जगताच्या बुडाशीं राहून वावरणारें जें दैविक शेष चैतन्य आहे त्याच्याशीं समानधर्म असून त्याच्याशीं अखंड संलग्न असणारा असा आहे. व सर्वांत मौज अशी आहे कीं, या दैवी चित्‌शेषाशीं आपणांस प्रेमाचा संबंध ठेवतां येतो आणि

ज्या वेळीं आपला कनिष्ठ आत्मा खडकावर आपटून त्याचे तुकडे तुकडे होण्याचा प्रसंग येतो, त्यावेळीं त्याची कास धरून आपल्याला तरून जातां येतें. हा जो Divine More चा अनुभव, हा इतका स्पष्ट आहे कीं, यावरून जगताच्या बुडाशीं प्रार्थनेला उत्तर देणारें चिद् असें तत्त्व मानणें अवश्य आहे."

तात्पर्य, ज्याअर्थी ईश्वराच्या योगें या जगतांत अनुभवांस येणारे असे परिणाम घडलेले दिसून येतात, त्या अर्थी ईश्वर असला पाहिजे असें उपयुक्ततावादी जेम्सचें म्हणणें आहे.*

( ३ ) सर्वांत मोठा पुरावा म्हणजे ज्यांना ज्यांना ईश्वराचा साक्षात्कार झाला, त्यांच्या अनुभवाचें त्यांनीं जें वर्णन केलें त्यांतील आश्चर्यकारक साम्य. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, भिन्न भाषा बोलणारे, भिन्न देशांत व भिन्न काळांत होऊन गेलेले हे आत्मसाक्षात्कारी महात्मे एकच भाषा बोलतात.

प्रथम आपल्याकडील दोन उतारे देऊन मग पाश्चात्य साधूंचे उतारे देऊं.

( १ ) भगवान् श्रीकृष्णानें अर्जुनाला दिव्य दृष्टि दिल्यावर त्याची काय अवस्था झाली याचें वर्णन ज्ञानेश्वर महाराज काव्यमय भाषेत खालीलप्रमाणें करतातः—

ऐसीं श्रीमुखौनि अक्षरें । निघती ना जंव एकसरें ॥
तंव अविद्येचे आंधारें । जावोंचि लागे ॥........
मग दिव्यचक्षुप्रकाशु प्रगटला । तयां ज्ञानदृष्टि पाटा फुटला ॥
ययापरीं दाविता जाहला । ऐश्वर्य आपुलें ॥........
एकसरें ऐश्वर्य तेजें पाहलें । तया चमत्काराचें एकार्णव जाहलें ॥
चित्त समाजीं बुडोनि ठेलें । विस्मयाचिया ॥........

* God is real since He produces real effects.

म्हणे केवढें गगन येथ होतें । तें कवणें नेलें पा केउतें ॥
तीं चराचरें महाभूतें । काय जाहलीं ॥
दिशांचे ठावही हारपले । अधोर्ध्व काय नेणों जाहले ॥
चेइलिया स्वप्न तैसें गेले । लोकाकार ॥
नाना सूर्यतेजप्रतापें । सचंद्र तारागण जैसें लोपें ॥
तैसीं गिळिलीं विश्वरूपें । प्रपंचरचना ॥
तेव्हां मनासीं मनपण न स्फुरे । बुद्धि आपणपें न सांवरे ॥
इंद्रियांचे रश्मी मावारे । हृदयवरीं भरले ॥
तेथ ताटस्था ताटस्थ पडिलें । टकासी टक लागलें ॥
जैसें मोहनास्त्र घातलें । विचार जातां ॥........
तैसें आपणेनवीण कवणीकडे । नेदीचि उरों ॥
[ ज्ञानेश्वरी अध्याय ११; ओंव्या १७७–१९४

( २ ) या वर्णनाशीं स्वामी विवेकानंदानीं, रामकृष्ण परमहंसांनीं त्यांच्यावर कृपा केली असतां आपली काय स्थिति झाली याचें जें वर्णन केलें आहे, त्याची तुलना करण्याजोगी आहे. स्वामी म्हणतात, " But in the twinkling of an eye he placed his right foot on my body. The touch at once gave rise to a novel experience within me. With my eyes open, I saw that the walls, and everything in the room, whirled rapidly and vanished into nought, and the whole Universe together with my individuality was about to merge in an all encompassing mysterious void! I was terribly frightened and thought that I was facing Death, for the loss of individuality meant nothing short of that. Unable to control

myself, I cried out, "What is this that you are doing to me ? I have my parents at home ! " He laughed aloud at this and stroking my chest said, "All right, let it rest now. Everything will come in time ! " The wonder of it was that no sooner had he said this than that strange experience of mine vanished. I was myself again and found everything within and without the room as it had been before. "*

अशाच तऱ्हेचे अनुभव इतर देशांतील लोकांना आले आहेत. व त्यांनीं ते लिहून ठेवलेले आहेत. प्रो. वुइल्यम जेम्स यांनीं अध्यात्मिक अनुभव या विषयावरील पुस्तकांत या बाबतींत पुष्कळ विवेचन केलें आहे. या विषयाची आवड असणाऱ्या प्रत्येक गृहस्थानें वाचावें असें तें पुस्तक आहे. त्यांतील नमुन्याकरतां दोन तीन उतारे देत आहोंत.

(1) A Clergyman:—

'I remember the night, and almost the very spot on the hill-top, where my soul opened out, as it were, into the Infinite, and there was a rushing together of the two worlds, the inner and the outer......I did not seek Him, but felt the perfect unison of my spirit with His. The ordinary sense of things around me faded. For the moment nothing but an ineffable joy and exaltation remained. It is impossible fully to describe the experience. It was like the effect of some great orchestra when all

* Life of Ramkrishna Page 376-377

the separate notes have melted into one swelling harmony that leaves the listener conscious of nothing save that his soul is being wafted upwards, and almost bursting with its own emotion. The perfect stillness of the night was thrilled by a more solemn silence. The darkness held a presence that was all the more felt because it was not seen. I could not any more have doubted that He was there than that I was. Indeed, I felt myself to be, if possible, the less real of the two. "

( 2 ) A Swiss:—

" Since then I have had direct answers to prayer —so significant as to be almost like talking with God and hearing his answer. The Idea of God's reality has never left me for one moment. "

( 3 ) A Lady, the daughter of a man, well-known in his time as a writer against Christianity:—" what I felt on these occasions was a temporary loss of my own identity, accompanied by an illumination which revealed to me a deeper significance than I had been wont to attach to life. " ×

ज्या वेळीं हे अनुभव येतात त्या वेळीं ते इतके जोरदार असतात कीं ते खोटे आहेत असें ज्यांना ते येतात ते तर म्हणत नाहींच, पण त्यांच्याजवळ असणाऱ्यांनाहि ते खोटे आहेत असें म्हणणें शक्य नाहीं. अगदीं अलीकडल्या काळांत रामकृष्णपरमहंसांची भावसमाधि

× The Varieties of Religious Experience, by Prof. William James—Pages 66-69

पाहिलेले लोक आहेत. त्यांत आस्तिक, नास्तिक सर्व प्रकारचे लोक होते. स्वामी विवेकानन्द हे प्रथम कांहींसे अज्ञेयवादी होते. तेव्हां त्यांना आलेल्या अनुभवाला फार महत्त्व आहे. कारण तो वशीकरणद्वारा आणलेल्या मूर्च्छेचा एक प्रकार होता असें म्हणणें त्यांच्या बाबतींत तरी कठीण जाईल. म्हणून हे अनुभव म्हणजे मनुष्याच्या कल्पनेचा खेळ अथवा एक प्रकारचें वेड आहे असें म्हणण्याची सोय नाहीं.

तात्पर्य---ज्या अर्थी सर्व एकच अनुभव सांगतात त्याअर्थी सर्वांनीं एकच वस्तु अनुभवली असली पाहिजे व म्हणूनच ती कोणा एका व्यक्तीच्या डोक्यांतील कल्पना नसली पाहिजे हें उघड आहे.

( ४ ) प्राणिशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ वगैरे आधुनिक विज्ञानवादी यांचा ईश्वर मानण्याकडे कल झुकूं लागला आहे हेंहि वाचकांनीं लक्षांत ठेवावें. आधुनिक भौतिकशास्त्रवेत्ते हे विज्ञानानें जगाचें कोडें उलगडत नाहीं, त्याकरतां चिद्शक्ति मानणें अवश्य आहे असें म्हणूं लागले आहेत हें निर्विवाद आहे. त्यांचा कल ज्याला इंग्रजीत Reverent Agnosticism म्हणतात त्या सिद्धांताकडे झुकत आहे.§

( ५ ) आपल्यांत जीं उच्च ध्येयें आहेत त्यांचा उगम ईश्वरीय तत्त्वांत मानल्यावांचून त्यांची उपपत्ति लागत नाहीं असा आधुनिक विद्वानांचा समज आहे.

( ६ ) भगवंताची प्रार्थना, त्याचें ध्यान व पूजन केलें असतां शेकडों लोकांच्या अंतःकरणाला समाधान मिळतें यापेक्षां त्यांच्या उपयुक्ततेचा आणखी वेगळा पुरावा कोठला हवा? मानवी अंतःकरणास प्रार्थनेची किती गरज आहे याची कल्पना मोठमोठे अज्ञेयवादी

---

§ " Intuitive probability is wholly on the side of the existence of a supreme Deity "—F. W. Westaway, Science and Theology.

सुद्धां प्रार्थनेचें महत्त्व मान्य करतात यावरून स्पष्ट होणारी आहे. एक मोठा अज्ञेयवादी खालीलप्रमाणें देवाची प्रार्थना करतो.

" हे अज्ञेय अनंता, आमच्यावर प्रेम कर, आम्हाला मदत कर, आम्हांला आपणांशीं समरस कर. "*

अशी अज्ञाताची प्रार्थना करण्यापेक्षां जो आपल्या प्रार्थनेस पावतो असलेल्या परमेश्वराची प्रार्थना करणें हा सरळ मार्ग नव्हे काय ? ही प्रार्थनेची गरज मनुष्यास ईश्वर हवा हें दाखवीत नाहीं काय ?

( ७ ) ईश्वराचा साक्षात्कार ज्यांना झाला आहे अशा थोर महात्म्यांचा अनुभव हें एक या बाबतींत मोठें प्रमाण आहे. मध्यंतरीं अशा थोर पुरुषांच्या अनुभवास कांहीहि किंमत दिली जात नसे. पण पुनः काळ बदलला आहे. या महात्म्यांना खोटें सांगण्यास कांहींच कारण नाहीं. येवढेंच नव्हे तर येन्हवींचें त्यांचें वर्तन आदर्शभूत व बहुतेक ठिकाणीं सत्यास परमदैवत मानून चालणारेंच आढळून येतें. बरें, या लोकांना वेडे म्हणावयाचीही सोय नाहीं. अशा वेगवेगळ्या देशांत वेगवेगळ्या काळीं होऊन गेलेल्या शेकडों महात्म्यांचा अनुभव हें कांहीं लहान प्रमाण नाहीं. उपनिषद्-द्रष्टे वामदेव याज्ञवल्क्यादि ऋषि, जगांतील मोठमोठे येशु, महंमद, बुद्ध यांच्यासारखे धर्मसंस्थापक हे सोडून दिले, पाश्चात्य देशांत झालेले अनुभवी यांची † यादी दिली नाहीं व केवळ आपल्याच देशांतील ठळक महात्म्यांची यादी दिली तरीही ती यादी फार मोठी होईल. म्हणून कांहींचीच नांवें खालीं देत आहोंत.

---

* " O, X, love us, help us, make us one with thee "

† ही यादी Miss Underhill यांच्या Mysticism या ग्रंथांत सांपडेल.

ज्ञानेश्वर, नामदेव, रामदास, तुकाराम, निळोबा, मुक्ताबाई, जनाबाई, गोस्वामी तुळशीदास, सूरदास, कबीर, मीराबाई, दादू दयाळ, सुन्दरदास, नरसी मेहता, दयाबाई, अल्वार, पुरंदरदास, गौरांग प्रभु, रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद, रामतीर्थ, अरविंद घोष वगैरे.

साधु म्हणून नव्हे पण जगतांत विद्वान म्हणून जे समजले जातात त्यापैकीं पुष्कळसे ईश्वर आहे असेंच मानतात. शेक्स्पीअर, वर्डस्वर्थ, इमर्सन्, अथवा आपल्याकडील, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, रवीन्द्रनाथ टागोर वगैरे थोर पुरुष ईश्वर आहे असेंच मानतात. हाही एक महत्त्वाचा पुरावा आहे.

( ८ ) या सारखाच पण मनाच्या इच्छा व बुद्धि या वृत्तींच्या छाननीवर उभारलेला एक पुरावा आपल्या Desire and Reason या पुस्तकांत प्रो. स्पारिंडग यांनीं दिला आहे. तो असाः—आपणांस जगत् दिसतें याला कारण आपली अंतःकरणवृत्ति जग पहाण्याच्या उद्देशानें बाहेर पडते म्हणून. मनाच्या अशा अवस्था आहेत कीं जगतांत त्या पुरुषाचें शरीर वावरून सुद्धां त्याला जगाचा अनुभव येत नाहीं. तेव्हां बाह्य वस्तु आपल्यास जगत्रूपानें दिसते याचें पुष्कळसें कारण आपल्या इच्छावृत्तींत आहे. हें जर खरें तर ईश्वर पहाण्याच्या इच्छेनें जे लोक ईश्वर पहातात त्यांना ईश्वर दिसतो हें खोटें कां माना ? जे लोक ईश्वर दिसावा या दिशेनें प्रयत्नच करीत नाहींत त्यांना तो दिसत नाहीं हें अगदीं स्वाभाविक आहे. ज्यांना दिसतो, अनुभवाला येतो त्यांचा अनुभव खोटा मानण्याचें कांहींच कारण नाहीं. उलट त्यांचा अनुभव हें ईश्वराच्या अस्तित्वाचें मोठे प्रमाण आहे.

असे पुरावे अनेक गोळा करतां येतील. पण त्याचा सारांश खालील दोन प्रश्न व त्यांची उत्तरें यांत देतां येईल.

( १ ) ईश्वराचें अस्तित्व जगाची जी शास्त्रीय कल्पना आहे तिच्याशीं विरुद्ध आहे कां ?

( २ ) ईश्वराचा अनुभव येतो कां ?

या दोन्हीं प्रश्नांचीं उत्तरें खालीलप्रमाणें द्यावीं लागतील: —

( १ ) अगदीं अर्वाचीन भौतिक शास्त्रांचे जे सिद्धान्त आहेत त्यांच्याशीं ईश्वराचें अस्तित्व विरुद्ध नाहीं. उलट, शास्त्रच, धर्मिष्ठ ज्याला 'ईश्वर' अथवा 'ब्रह्म' म्हणतात अशी चिद्शक्ति जगाच्या बुडाशीं आहे असें मानूं लागलें आहे.

( २ ) ईश्वराचा अनुभव कित्येक भाग्यवानांना आलेला आहे.

तात्पर्य अनुमान प्रमाण हें ईश्वर आहे असें जवळ जवळ सिद्ध करतें. याच्या जोडीला महात्म्यांचा प्रत्यक्ष अनुभव. अशी दोन्ही प्रमाणें एकमेकांस उपकारक होत असतां मला ईश्वर दिसला नाहीं येवढ्याच कारणाकरतां मी तो मानीत नाहीं असें म्हणण्यांत स्वारस्य नाहीं. ज्यांना ईश्वराचा अनुभव आला ते आपणांस त्याकरतां मनांत मोठी तळमळ बाळगून आपण ध्यानादि प्रयत्न केले म्हणून तो झाला असें सांगतात. तेव्हां ईश्वर नाहीं असें म्हणण्याचा अधिकार त्यांनाच आहे कीं ज्यांनीं असे प्रयत्न केले पण ज्यांना त्यांत यश आलें नाहीं. इतरांना ईश्वर नाहीं म्हणण्याचा अधिकारच पोचत नाहीं.

# नास्तिकवाद व ईश्वर : : : ९

## ' जगदाहुरनीश्वरम् ! '—गीता–१६–८

मागील एका प्रकरणाच्या आरंभीं सांगितल्याप्रमाणें आस्तिक व नास्तिक या दोन कोटींचे लोक फार पुरातन कालापासून सांपडतात. श्रीकृष्ण हयात असतांनाच तो देवदेवोत्तम म्हणून त्याची पूजा करणारे लोक जसे होते, तसे त्याची भरसभेंत दुर्वाक्य उच्चारून निंदा करणारे शिशुपाल वक्रदन्तासारखेहि होते. मूळ ईश्वरासंबंधींहि असेंच आहे. मानवी प्रकृतीची घडणच अशी आहे, कीं तींत श्रद्धेचा व संशयखोर वृत्तीचा दोहींचाहि अंश आहेच. ' श्रद्धामयोऽयं पुरुषः ' हें जितकें खरें आहे, तितकेंच अश्रद्धेचा अंशहि मनुष्यांत आहेच; परंतु स्वभावतःच श्रद्धा ही जितक्या प्रमाणांत मानवी प्राण्याच्या मसाल्यांत मिसळलेली आढळते इतकी अश्रद्धा आढळून येत नाहीं. श्रद्धेचा विषय वेगवेगळा होऊं शकतो; पण श्रद्धाच नाहीं असा प्राणी निर्माण होणें अशक्य आहे, कारण, मानवी व्यवहार हा श्रद्धेशिवाय चालणेंच कठीण आहे.

तात्पर्य, स्वभावःत श्रद्धा मनुष्यांत जास्त असल्यानें ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांची संख्या अधिकच असणार. ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे इतके लोक आहेत कीं, त्या मानानें नास्तिक हे हाताच्या बोटांवर मोजण्याइतके थोडे आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. पुष्कळ वेळां माणसें नास्तिकासारखें बोलतांना दिसतात याचें कारण त्यांना सत्य कळून घेण्याची अत्यंत तळमळ असते. एच्. जी. वेल्स् एके ठिकाणीं म्हणतोः—

"It is when men most urgently want God that they become least patient with foolish presentations and dogmas."

एखाद्या वेळेला कोणा एखाद्या स्त्रीला आंधळें मूल होईल, म्हणून तो कांहीं नियम म्हणून धरतां येणार नाहीं. कांहीं आईबाप आपल्या पोटच्या गोळ्यांना विकतात; म्हणून तो कांहीं नियम धरून चालतां येत नाहीं! उलट, हे अपवाद असे आहेत कीं, ते नियमांची सिद्धि करतात. ईश्वरावरील विश्वासाचेंहि तसेंच आहे. ईश्वरावर विश्वास नसणारा एखादाच! बाकी बहुतेकांच्या ठिकाणीं ईश्वराविषयीं आस्तिक्यभाव असतोच असतो. पण कदाचित् असें म्हटलें जाण्याचा संभव आहे कीं, नुसत्या संख्याबलापेक्षां युक्तीच्या, विचाराच्या बलाला अधिक किंमत आहे. हें नास्तिक लोकांचें मंडळ दिसायला जरी लहान आहे, तरी एक तर त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आणि शिवाय त्यांचें ज्ञान स्वतंत्र बुद्धीच्या पायावर उभारलेलें असल्यानें तें अधिक मूल्यवान् आहे.

शस्त्रविरहित असा केवढाहि मोठा जमाव असला तरी त्याचा टिकाव, सशस्त्र व लष्करी शिस्तीनें तयार असलेल्या लहानशा चमूपुढें लागत नाहीं. तद्वतच या श्रद्धाळू लोकांचें आहे. स्वतंत्र विचाराची थोडीशी कां होईना, पण झळ लागली कीं, त्यांची श्रद्धा विरघळूं लागण्यास वेळ लागत नाहीं. तेव्हां नास्तिक हे मूठभर आहेत, येवढ्याकरितां ते उपेक्षणीय आहेत असें कोणींच समजूं नये.

तात्पर्य, ईश्वरविषयक प्रश्न विचारांत घेतांना आस्तिकाचें मत जसें विचारार्ह आहे, तसेंच नास्तिकाचेंहि आहे.

वरील विचारसरणींत कांहीं खोटा व कांहीं खरा असा भाग आहे. ईश्वर मानणारे हे नुसत्या बेशिस्त लोकांप्रमाणें आहेत असें जें

त्यांत ध्वनित केलें जातें, हें खरें नव्हे. या बहुसंख्य लोकांतहि लोकाग्रणी, राज्यकर्ते, तत्त्वज्ञ, भौतिकशास्त्रनिपुण असे पुष्कळ आहेत. नास्तिक जसे आपणांस 'स्वतंत्र विचार करणारे' म्हणून म्हणवितात तसे स्वतंत्रप्रज्ञ या मंडळींतहि आहेत असें नास्तिकहि कबूल करील.

पण प्रस्तुत लेखकास 'हलवूनिया खुंट। आधीं करावा बळकट' ही तुकारामबोवांची उक्ति श्रद्धेच्या विषयांतसुद्धां महत्त्वाची वाटत असल्यानें त्यास अंधश्रद्धा केव्हांच पसंत पडत नाहीं. श्रद्धा डोळस असावी असेंच त्यास वाटत असल्यानें श्रद्धावान् मनुष्यानेंसुद्धां आपली श्रद्धा कायम करण्यापूर्वी श्रद्धेय विषयाची तपासणी करावी व मगच ती कायम करावी असेंच तो प्रतिपादन करीत आलेला आहे.

या पुस्तकाचा तर हेतूच ईश्वरविषयक प्रश्नांची चर्चा समजण्यास वाचकाची तयारी करणें येवढाच असल्यानें आस्तिकवादाबरोबर नास्तिक वादाचाहि विचार करणें अवश्यच आहे. आणि म्हणूनच यांपुढील प्रकरणांतून नास्तिकवादाच्या वेगवेगळ्या कक्षांचा विचार केलेला आहे.

नास्तिकपणांतहि वेगवेगळे भेद आहेत. उच्चतम नास्तिक तो, कीं, जो 'देव वगैरे सर्व झूट आहे', 'देव नाहींच' असा सिद्धान्त ठोकतो. दुसरा वर्ग अशा लोकांचा कीं, जे 'जगद् अनीश्वर आहे' असें एकदम म्हणावयास तयार नाहींत; पण त्यांचें म्हणणें असें कीं, "देव असेल कीं नाहीं या चर्चेंत रिकामा वेळ कां घालवितां? आपली जी ज्ञानशक्ति आहे ती इतकी कोती आहे कीं, तिला ईश्वराच्या अस्तित्वाचें ज्ञान कधींच होणार नाहीं. तेव्हां ही चर्चा म्हणजे भाकड गाईस चारा घालण्यासारखी आहे."

तिसऱ्या वर्गाचे लोक ईश्वर आहे अथवा नाहीं, तें आपणांस कळणें शक्य का अशक्य याबाबत कांहीं निश्चित सिद्धान्त करीतच

नाहींत. त्यांचे म्हणणें येवढेंच कीं, " आपणांजवळ ईश्वराच्या अस्तित्वाविषयीं सबळ, भरपूर, मनाची खात्री देणारा असा पुरावा नाहीं." चवथा वर्ग अशा लोकांचा आहे, कीं, जे म्हणतात ' ईश्वर आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा आपल्या रोजच्या व्यवहाराशीं कांहींहि संबंध नाहीं ! जेवणें–खाणें, धंदा–उद्योग, लग्नकार्यें यांबाबत ईश्वर नाहीं मानला म्हणून अडचण कोठें आली आहे ? तेव्हां ईश्वरावर विश्वास नसणाऱ्यांचेंसुद्धां आयुष्य उत्तम रीतीनें चाललेलें आपणांस दिसतें. मग रिकामी ही आहे किंवा नाहीं अशी निष्फळ चर्चा करतां कां ? व्यवहारतः ईश्वराचा प्रश्न अप्रयोजक अतएव निरुपयोगी आहे. '

नास्तिक मताचा विचार करतांना यांपैकीं अर्धवट मतें आहेत तीं सोडून देऊन मुख्य ' देव नाहींच ' ह्या मताचा विचार करूं.

**नास्तिकवादाचे वेगवेगळे प्रकार**—ईश्वर नाहीं असें म्हणणरा तो नास्तिक, व त्याचें जें मत तें नास्तिक मत. पाइन्हो, ह्यूम, मिल्, कॉंट्, लाप्लेस्, लँग, हक्स्ले, कार्ल् मार्क्स्, चार्वाक्, वगैरेंचीं नांवें नास्तिकांची म्हणून देतां येतील. ' ईश्वर नाहीं ' हा सिद्धान्त जरी एकच असला, तरी तो मांडण्याचे प्रकार वेगवेगळे असल्यानें नास्तिकवादाचे वेगवेगळे प्रकार होऊं शकतात.

**नास्तिकवाद**

| अ | आ | इ |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| ऐंद्रियिक ज्ञानाच्या सत्यतेवर अधिष्ठित. | भौतिकशास्त्रांच्या विज्ञानावर अधिष्ठित. | ज्ञानाच्या तात्त्विक चर्चेवर अधिष्ठित. |

या सर्वांचें ' ईश्वर नाहीं ' इतक्यापुरतें एकमत आहे. पण ईश्वर कां मानूं नये, व मानल्यास तो ज्या कारणांकरितां मानणारे मानतात, त्यांची उपपत्ती कशी लावावयाची या बाबतींत यांचें जमत नाहीं. बोलून चालून स्वतंत्रप्रज्ञच ते ! तेव्हां प्रत्येकाचें मत भिन्न असावें हें अगदीं स्वाभाविक आहे. आपणांस या सर्वांच्या मतांचा थोडक्यांत विचार करणें आहे.

या प्रकरणांत या तिहींपैकीं पहिला व तिसरा या दोहोंचा विचार करणार आहोंत. दुसऱ्यांकरितां पुढील प्रकरण स्वतंत्र राखून ठेवणें अवश्य आहे इतकें तें महत्वाचे आहे.

(अ) **ऐंद्रियिक ज्ञानाच्या सत्यतेवर अधिष्ठित असणारा नास्तिकवाद**—हा वाद मांडणाऱ्या लोकांचे मत समजण्यास अगदींच सोपें असें आहे. हे प्रत्यक्ष प्रमाणवादी आहेत. यांचें म्हणणें " ईश्वर नाहीं " याचें कारण तो आम्हांस दिसत नाहीं, भासत नाहीं. ज्याला आम्ही खरें म्हणतों, तें आम्हांला दिसतें, भासतें. तसा ' ईश्वर नाहीं ', म्हणून ईश्वरास सत्यत्व असणें शक्यच नाहीं. ज्ञानेश्वरांनीं यांचें मत एके ठिकाणीं फारच सुंदर मांडलें आहे. नास्तिक म्हणतो:—

म्हणोंनि देवो गोसावी । तो धर्माधर्मु भोगवी ॥
आणि परत्राच्या गांवीं । करी तो भोगी ॥
परि परत्र ना देवो । न दिसे म्हणोनि तें वावो ॥

ज्ञाने०—अ. १६—३०६—७

मुद्दल कर्ता जीवात्माच मानायला ही मंडळी कबूल नसल्यानें ते ईश्वर मानीत नाहींत यांत गैर कांहींच नाहीं.

हें मत पुरातन आहे व पाश्चात्य आणि पौर्वात्य या दोन्ही भागांत तें मानणारे लोक होते व आहेत. आपल्याकडे हें मत

चार्वाक् मानतात. त्यांच्या मताचा निदर्शक म्हणून खालील श्लोक नेहमीं दिला जातो.

यावत् जीवं सुखं जीवेत् । ऋणं कृत्वा घृतं पिबेत् ॥
भस्मीभूतस्य देहस्य । पुनरागमनं कुतः ॥

पाश्चात्य देशांमध्यें सायरेनिक्स् पंथाचे लोक ह्या मताचे अनुयायी म्हणतां येतील.

या मताच्या बाबतींत येवढेंच सांगणें शक्य आहे कीं, यांचें मत ज्या व्याप्तीच्या सत्यतेवर आधारलेलें आहे, ती व्याप्तीच मुळांत मिथ्या आहे. ज्या व्याप्तीवर या मताची उभारणी आहे ती व्याप्ती अशी आहे कीं, जें नेत्रादि इंद्रियांना भासतें तेंच खरें; व जें इंद्रियांना विषय होत नाहीं तें खोटें. पण ही व्याप्ती मिथ्या आहे. कारण शब्द हा कानांनीं ऐकूं येतो तसा अर्थ हा कां ऐकूं येतो ? नाहीं; तो कानांना ऐकूं येत नाहीं. तसा जर ऐकूं येता, तर ऐकण्याचे भिन्न अर्थ समजल्यानें अनेक घोंटाळे झालेले जे आपण जगतांत पाहतों ते झालेच नसते. तात्पर्य, बाह्य ज्ञानेंद्रियांना विषय होतें तेवढेंच खरें मानलें तर शब्दाच्या अर्थाला सत्यता येणारच नाहीं. तेव्हां प्रत्यक्ष प्रमाणवाद्यांचें हें मत चुकीचें आहे. इंग्रज आपणांस दिसतो; पण त्याची हिंदुस्थानावर असणारी सत्ता कोणास दिसली आहे ? पण ती जरी अमूर्त असली तरी नाहीं म्हणण्याची सोय नाहीं ! गुरुत्वाकर्षण, गति इत्यादिकांचे नियम ज्यांना निसर्गाचे नियम म्हणूं ते कधीं डोळ्यांना दिसले आहेत ?

सत्ता, नियम, हीं दिसत नाहींत म्हणून नाहीं म्हणतां येत नाहींत. उलट, एका अर्थीं दृश्य पदार्थापेक्षांसुद्धां यांचें अस्तित्व अधिक प्रभावी व व्यापक आहे. जर बाह्येंद्रियांना दिसतें एवढेंच मानायचें ठरलें, तर ईश्वर मानतां येणार नाहीं हें खरें; पण त्याचबरोबर या

प्रत्यक्ष प्रमाणवाद्यांना प्रिय वाटणारें शास्त्रीय जगतहि मानतां येणार नाहीं. माझ्या समोर दिसणारी भिंत अथवा मेज यांचें शास्त्रीय दृष्ट्या स्वरूप माझ्या डोळ्यांना दिसत आहे तें नव्हे. शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे भिंत ही एका प्रकारानें चाललेल्या परमाणुसंघाचा नाच! खुर्ची ही असाच एका दुसऱ्या प्रकारचा परमाणूंचा नाच! शास्त्रें मानायचीं, तर प्रत्यक्ष प्रमाणास चिकटून राहतां येणार नाहीं.

तसेंच प्रत्यक्ष ज्ञान म्हणजे बाह्येंद्रियें दाखवितात तेंच; व तेंच खरें मानावयाचें जर ठरलें, तर सुखदु:खांचें अस्तित्व तरी कसें मानतां येईल? कारण तीं इंद्रियांना गोचर नाहींत. तीं मानसप्रत्यक्ष आहेत. आतां मानसप्रत्यक्ष मानावयाचें, तर ईश्वरहि मानावा लागेल; कारण, ईश्वर हा साधुसंतांना मानसप्रत्यक्ष आहे.

बाह्येंद्रियांना जर प्रमाण मानायचें, मग दुधांत दही आहे अथवा लांकडांत अग्नि आहे हें मानण्याचें कारणच नाहीं. बाह्येंद्रियांना दिसत नाहीं तरीसुद्धां अग्नि लांकडांत आपण मानतोंच. ईश्वराचेंहि तसेंच आहे. त्याचें वर्णन ज्ञानेश्वरांच्या भाषेंत करणें झाल्यास 'सत्ता प्रकाश यया जगा। आपणचि जो ॥' असें करतां येईल.

शिवाय इंद्रियाचें ज्ञान करून देण्याचें सामर्थ्य किती मर्यादित आहे हेंहि विचारांत घेणें अवश्य आहे. इंद्रियें आम्हांला पदोपदीं फसवितांना अनुभवाला येतात. दृग्भ्रम झाला नाहीं, कानानें भलतेंच ऐकलें नाहीं असा कोण आहे? तात्पर्य, इंद्रियांच्या या सामर्थ्यावर अवलंबून बसणें आत्मघातकीपणाचें होणार आहे. ज्ञानाचा आरंभ ऐन्द्रियिक संवेदनांत होतो म्हणून सांगणाऱ्या लॉकनें सुद्धां अत्यंत कमी दर्जाचें ज्ञान म्हणून जर कोणचें ठरविलें असेल, तर ऐन्द्रियिक संवेदनानें होणारें ज्ञान हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शिवाय ज्या गोष्टी शास्त्रानें आहेत म्हणून निर्विवाद सिद्ध केल्या आहेत त्या तरी उघड्या डोळ्यांनीं आपणांस कोठें दिसत आहेत? सूर्यावरील डाग, शनीचें कडें, वगैरे दूरचें म्हणून सोडून दिल्यास अगदीं जवळ प्रतीत होणारा असा एक प्रकारचा प्रकाश आहे कीं, त्याचें साह्य जर डोळ्यांना मिळालें तर आपल्या अनुभवांत अननुभूत अशी क्रान्ति होईल. पण तो साध्या डोळ्यांना दिसतो आहे कोठें? कै. सर जगदीशचंद्र बोस यांनीं पुण्यांत सन १९१७–१८ च्या सुमारास फर्ग्युसन कॉलेजांत एक मोठा क्रांतिकारक प्रयोग करून दाखविला. प्रस्तुत लेखक त्या वेळीं विद्यार्थी म्हणून तो प्रयोग पाहण्यास हजर होता. आणि स्वतःच्या डोळ्यांनीं पाहिलेलीच गोष्ट तो सांगत असल्यानें इंद्रियप्रमाणवादी तरी ती खोटी म्हणणार नाहींत.

सर साहेबांनीं आपल्या जवळच्या यंत्रांतून कांहीं प्रकाशकिरणें निर्माण केलीं व तीं जवळील फलकावर पाडलीं. नंतर त्यांनीं तीं किरणें व फलक या दोहोंमध्यें मुंबई-विश्वविद्यालयाची माहिती देणारें सुमारें पांचशें पानांचें पुस्तक धरलें व आश्चर्याची गोष्ट अशी कीं, हें जाड पुस्तक, फलक व तीं किरणें यांच्यामध्यें धरलें असतांनासुद्धां तीं किरणें फलकावर पडलेलीं दिसतच होतीं. या किरणांच्या दृष्टीनें तें पुस्तक म्हणजे सामान्य किरणांना जशी कांच पारदर्शक तसेंच ठरलें. इतकें सांगण्याचा हेतु एवढाच, कीं, जसे हे किरण आहेत कीं, ते विशिष्ट तऱ्हेच्या यंत्राचें साहाय्य घेतल्यास दृग्गोचर होतात, तसाच ईश्वर जर इंद्रियगोचर होत असला, तर "तो आहे" असें म्हणावयास काय हरकत आहे? नवे व जुने साक्षात्कारी महात्मे आपणांस ईश्वर अनुभवास मिळाला असें सांगतात व ते खोटें बोलत असतील असें त्यांच्या इतर व्यवहारांवरून मानण्यास जागासुद्धां राहत नाहीं. तेव्हां नुसत्या साध्या डोळ्यांना ईश्वर दिसला नाहीं, हांक मारल्याबरोबर

गडी जसा उभा राहतो तसा उभा राहिला नाहीं, म्हणूनच "ईश्वर नाहीं" असें म्हणण्याची घाई करूं नये. प्रस्तुतच्या कामगारी नवयुगांत तर कामगारहि नोकरीवर नसेल त्यावेळीं हजर राहणार नाहीं. मग ईश्वराचा काय प्रश्न ?

'ईश्वर माझ्या डोळ्यांना दिसत नाहीं म्हणून ईश्वर नाहीं' असें म्हणणारा मनुष्य केवढा अहंमन्य असला पाहिजे हें पाहा. तो असें समजतो, कीं, आपलें प्रत्यक्ष हें सदसत् ठरविण्याची कसोटी आहे. त्याच्या लक्षांत येत नाहीं, कीं आपलें मन, आपलीं इंद्रियें हीं मर्यादित शक्तिवान् आहेत व त्यामुळें चुकींस पात्र आहेत. त्यानें आपल्या डोळ्यांना दिसत नाहीं म्हणून त्याचें अस्तित्वच नाहीं असें म्हणणें म्हणजे आपल्या अंगीकृत तत्त्वांच्या बाहेर फार मोठी उडी मारण्यासारखें आहे.

शिवाय अशा मनुष्याच्या लक्षांत येत नाहीं कीं, ईश्वर दिसत नाहीं यावरून 'तो नाहीं' असें अनुमान तो जसें काढतो, तसेंच असेंहि अनुमान काढतां येईल कीं, याच्या डोळ्यांना तें पाहण्याची ताकद नाहीं. पृथ्वी आपणांभोंवतीं फिरून सूर्याभोंवतीं फिरत आहे हा सिद्धान्त आतां निर्विवाद सत्य आहे असें समजलें जातें. पण एखादा अडाणी म्हणूं लागला कीं, "अहो, पृथ्वी फिरते म्हणतां, तर तिचें भ्रमण माझ्या डोळ्यांना दिसलें पाहिजे. ज्या अर्थीं माझ्या डोळ्यांना तें दिसत नाहीं त्या अर्थीं ती फिरतच नाहीं." श्री. बर्वे यांनीं 'चित्रमय जगत्' मधील आपल्या शेवटच्या लेखांकांत एक सुंदर दृष्टान्त दिला आहे. ते म्हणतात कीं, "एका आंधळ्यासमोर उत्तम पिकलेला हापूसचा आंबा धरून त्या आंब्याचें वर्णन त्याचा मित्र करूं लागला कीं, 'या आंब्यास उत्तम सुवास आहे, हा मऊ आहे, याचा रंग शेंदरी आहे.' त्या आंधळ्यानें हातानें चांचपून पाहिलें, तेव्हां

त्याला तो आंबा मऊ भासला; नाकाजवळ नेला, तेव्हां त्याचा उत्तम वास आला; दृष्टीच नसल्यानें त्याला रंग दिसेना. तेव्हां तो आंधळा म्हणूं लागला, कीं, "मित्रा, तूं आंबा सुवासिक आहे, मृदु आहे, असें म्हणतोस तें पटतें! पण या आंब्याला रंगच नाहीं असें माझें मत आहे. कारण, त्याला जर रंग असता, तर तो मला दिसता." वास्तविक सत्य गोष्ट अशी आहे कीं, आंब्यास रंग आहे. तो पाहण्याकरितां लागणारी दृष्टि या आंधळ्याजवळ नाहीं." ईश्वर आमच्या डोळ्यांना दिसत नाहीं, म्हणून 'ईश्वर नाहीं' असें म्हणणारे वरील गोष्टींतील आंधळ्यासारखेच बोलतात, येवढेंच!

वरील प्रत्यक्ष प्रमाणवादाशीं जुळणारा नंबर तीनचा म्हणजे तात्त्विक ज्ञानचर्चेवर उभारलेला वाद आहे, किंबहुना त्याचीच ती वाढ आहे असें म्हटल्यास चालेल. म्हणून त्याची चर्चा येथें करून हें प्रकरण संपवूं.

( ३ ) हें मतहि वरील मताप्रमाणेंच पुरातन आहे व वरील मताप्रमाणें याचेहि उपासक पाश्चात्य व पौर्वात्य दोन्ही देशांत सांपडतात.

जुन्या काळीं ग्रीक तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत हें मत हिऱ्याक्लिटस्च्या मतावर उभारलेलें दिसून येतें. हिऱ्याक्लिटस्च्या मतें या विश्वांत स्थिर असा पदार्थच नाहीं. आपणांस पदार्थांत जी स्थिरता भासते हा निव्वळ भ्रम आहे. कल्पना करा, कीं वाहत्या पाण्यांत आपण बुडी मारली व आपण बुडी मारून वर आल्यावर आपणांस कोणीं विचारलें, "कां हो! कोठें स्नान केलेंत?" तर आपण उत्तर देतों व प्रसंगविशेषीं बोटानें दाखवून म्हणतों कीं, "या पाण्यांत!" वास्तविक ज्या पाण्यांत बुडी मारली तें पाणी बुडी मारीत असतांना-

सुद्धां स्थिर नव्हतें ! तसेंच, ‘संपूर्ण विश्व हें’ आपण ‘स्थिर आहे’ असें म्हणतों त्या वेळींसुद्धां तें बदलतच असतें.

जेथें संपूर्ण विश्वच सारखें बदलत आहे, तेथें ज्ञाता व ज्ञेय हे एकसारखे बदलत राहणार हें ओघानेंच आलें. अशा स्थितींत ज्ञातृज्ञेया-संबंधीं कोणतेंहि विधान करणेंच अशक्य आहे. कारण केलेलें विधान पुरें होण्याच्या आंतच ज्ञातृज्ञेयांचें स्वरूप बदलून जात आहे. अर्थात् ज्ञान कशाचेंहि होणें शक्य नाहीं. जेथें ज्ञात्याचाच पत्ता नाहीं तेथें त्याचा कर्ता म्हणून मानल्या गेलेल्या ईश्वराला कोण पुसतो ? त्याला तर वाव नाहींच नाहीं. हें मत इसवी सनापूर्वी सुमोर ३६५ वर्षें होऊन गेलेल्या नास्तिकानें मांडलें आहे.

या पेक्षां वेगळ्या जातीचा नास्तिकवाद ह्यूम् (१७११-१७७६) नांवाच्या स्कॉटिश तत्त्ववेत्यानें अठराव्या शतकाच्या प्रारंभीं मांडला आहे. व असें म्हणावयास हरकत नाहीं, कीं त्यानंतर झालेल्या नास्तिकांचीं शस्त्रें बहुतेक यानें तयार केलेल्या कोठारांतीलच आहेत. नवीन नास्तिक जरा तीं उजळतो, त्याला नवीन पाणी देतो; पण शस्त्र तेंच असतें.

ह्यूम् हा लॉकनें प्रस्थापित केलेल्या संवेदनावादी पंथाचा कड्डा पुरस्कर्ता होता. सर्व ज्ञानाचा उगम इंद्रियजन्य संवेदनांत आहे, त्यांत-सुद्धां बाह्येंद्रियांचे व्यापार प्रथम सुरू होतात व मगच मनाचे व्यापार सुरू होतात व जोंपर्यंत बाह्येंद्रियांनीं बाहेरून आणलेली माहिती मनांत टाकली नाहीं तोंपर्यंत मन हें शून्यवत् निष्क्रिय असतें असें या पंथाचें म्हणणे आहे. ह्यूमच्या मतें लॉकनें हें जें मांडलें, तें अत्यंत योग्य; पण त्यानें ह्या सिद्धान्तास चिकटून राहावयास पाहिजे होतें तसा तो अथवा त्याच्या मागाहून झालेला बर्क्ले हे दोघेहि राहिले

नाहींत. लॉकपेक्षां बर्क्ले हा प्रारंभीं थोडा अधिक सुसंगत होता; पण पुढें फारच भडकला. उदाहरणार्थ, लॉकनें सर्व ज्ञानाचा उगम इंद्रियजन्य संवेदनांत मानून सुद्धां बाह्य जगाच्या बुडाशीं अज्ञात अशी एक वस्तु मानली; तसेंच, आत्मा व ईश्वर यांचें अस्तित्वहि मानलें. वास्तविक अज्ञेय जड वस्तु, आत्मा व ईश्वर ह्यांपैकीं कोणीहि इंद्रियाचे विषय होऊं शकत नाहीं म्हणून मानण्याचें कारणच नाहीं. बर्क्ले हा लॉकच्या थोडा पुढें गेला. ज्या अर्थीं जड म्हणून कांहीं अनुभवास येत नाहीं, त्या अर्थीं अज्ञात व अज्ञेय जड पदार्थ मानण्याचें कारणच नाहीं, असें त्यानें मांडलें. येथपर्यंत त्याचें म्हणणें योग्य. पण त्यानेंसुद्धां आत्मा, ईश्वर हे मानलेच. ह्यूमचें म्हणणें ज्या कारणांकरितां—इंद्रियजन्य संवेदनांचा अभाव म्हणून—जड पदार्थ मानतां येत नाहीं त्याच कारणांकरितां स्वतंत्र, अखंड असा आत्माहि मानतां येत नाहीं. आपण अंतर्मुख वृत्ती करून आंत जर पाहूं लागलों, तर आपण कोणत्या तरी संकल्पावर आदळूं. आपणांस शुद्ध, निर्विकल्प आत्मा भेटणार नाहीं. अर्थातच ईश्वरासंबंधीं बोलावयासच नको. ईश्वर दिसतच नाहीं, तेव्हां तो नाहींच !

पण कित्येक लोक ईश्वराची अनुमानानें सिद्धि करतात. त्यांचें म्हणणें जगताचें कारण म्हणून ईश्वर मानणें अवश्य. मनें 'मूले कुठारः' या न्यायानें 'कार्यकारणव्याप्ती'वरच घाव घातला आहे. त्याचें म्हणणें आपण कोणत्याहि वस्तूस कारण हवेंच असें जें म्हणतों ही आपली एक कल्पना आहे. अर्थातच बाह्य अथवा आंतरसृष्टींत खरोखरच कांहीं कार्यकारण संबंध आहे असें धरणें अत्यंत चुकीचें आहे. आपणांला एक वस्तु दिसते व त्याच्या उत्तर क्षणांत दुसरी वस्तु दिसते; व आपण उत्तर क्षणांतील वस्तूचें पूर्व वस्तु हें कारण समजतों. पण खरें पाहिलें तर पूर्व क्षणांतील वस्तु व तदनुगामी

उत्तर क्षणांतील वस्तु यांचा संबंध आपणांस दृश्य नसतोच. उदाहरणार्थ, आपण काडी पेटवली व उजेड झाला; अथवा टेबलावर एकास एक लागूत लोखंडाचे गोळे ठेवले व त्यांपैकीं एकास धक्का दिल्यानें बाकीचेहि हलले असें दिसलें. आतां या दोन उदाहरणांत प्रात्यक्षिक म्हणजे डोळ्यांनीं पाहिलें असें काय आहे ? पहिल्या उदाहरणांत काड्याच्या पेटीवर काडी घासण्याची क्रिया प्रथम पाहिली व दुसऱ्या क्षणांत उजेड पाहिला. पण या दोहोंचा संबंध जोडणारी साखळी कोठें दिसली ? अथवा दुसऱ्या उदाहरणांत एक गोळा हलविण्याची क्रिया व पहिल्याचा दुसऱ्यास लागलेला धक्का आपणांस दिसला व तदनंतर दुसरा गोळा हललेला आपणांस दिसला. पण पहिल्या गोळ्याच्या स्पर्शानें दुसऱ्या गोळ्यांत गति कशी घातली गेली हें आपणांस कोठें दिसलें ? तात्पर्य, जर इंद्रियजन्य संवेदना हें ज्ञानाचें मूळ मानावयाचें तर असें मानणें भाग आहे कीं, ‘ कारण ’ आपणांस कधींच दिसत नाहीं.

बरें ! नुसती वस्तु पाहूनहि आपणांस कार्य कळत नाहीं. भाकरी खाल्ली नाहीं तर भाकरी नुसती पाहून भाकरीनें पोट भरतें हें कळेल कां ? तात्पर्य, कार्य-कारणसंबंध हा वस्तु पाहून दिसत नाहीं. जेथें ही व्याप्ती लावतात तेथेंहि कारण दिसतच नाहीं; एकामागून एक वस्तु आली येवढेंच दिसतें. अर्थात् कार्य-कारणसंबंध हा मानवी मनानें कल्पिलेला संबंध आहे. याला बाह्य व अंतरसृष्टींत सत्य आश्रय नाहीं. ‘त्रयाणां धूर्तानाम्’ या प्रसिद्ध गोष्टींतील ब्राह्मणानें प्रत्यक्ष बोकड पाहत असतांनासुद्धां, वारंवार हें कुत्रें आहे असें ऐकून तें कुत्रेंच असलें पाहिजे अशी समजूत करून घेतली, व खांद्यावरील बोकड कुत्रेंच आहे म्हणून तो त्यास टाकून गेला. तसेंच, येथेंहि आहे. आपण निव्वळ एकामागून एक घडणाऱ्या गोष्टी पाहतों व जेथें त्या एकमेकांना वारंवार अनुसर-

27510

तांना दिसतात तेथें कांहीं कार्य-कारण असा निश्चित संबंध असला पाहिजे अशी भ्रामक कल्पना करतों येवढेंच. येऱ्हवीं कारण आपणांस दिसतच नाहीं; व दोन वस्तूंत कार्यकारण असा संबंध नसतोच.

एकदां ही विचारसरणी मान्य केली कीं, ईश्वराचा प्रश्न सहजच सुटला. कार्य-कारणव्याप्तीवर उभारलेलें जेवढें म्हणून ज्ञान आहे तें सर्व अनिश्चित, असाच या विचारसरणीचा निष्कर्ष आहे. अर्थातच ईश्वराच्या अस्तित्वाचे बाबतींत नेहमींच असें म्हणतात कीं, विश्वास कारण कांहीं तरी पाहिजे म्हणून ईश्वर मानला पाहिजे. ह्यूमचें म्हणणें कीं, मानवी बुद्धि ही अगदीं कोती आहे, तिची शक्ति फार कमी आहे. साध्या दृश्य अशा परिच्छिन्न दोन वस्तूंमधील कार्य-कारण भाव निश्चित आपणांस ठरवतां येत नाहीं, मग विश्वाचें कारण कसें ठरवतां येईल ? त्याबद्दल निश्चितता कोठून राहणार ? अनंत, अमर्याद, सर्वज्ञ असें विश्वकारण कोण निश्चित ठरवूं शकेल ? ईश्वराची सिद्धि सृष्टीस कांहीं कारण हवें यावर करणें म्हणजे वाळूवर इमारत रचण्यासारखें आहे.

ह्यूमचें म्हणणें असें कीं, आपण भोळसर श्रद्धेनें जगताला एक चैतन्ययुक्त असें कारण मानतों व त्याला सर्वोत्कृष्ट गुण चिकटवतो आणि पूर्णत्वाची एक कल्पना तयार करतों. पण तर्काच्या कसोटीस हा सर्व व्यवहार उतरत नाहीं. खरें पाहिलें तर आपणांस त्या वस्तूची कांहीं कल्पना करतां येणार नाहीं. त्यास मानवी गुणानुरूप बनविणें हें तर अत्यंत चुकीचें आहे. आपल्यासारखेच गुण त्याच्यांत आहेत असें मानणें हें मानुषतासुलभ आहे, पण ईश्वराचें खरें स्वरूप त्यायोगें व्यक्त होणारें नव्हे.

या विषयींचें जुनें प्रमाण प्रसिद्धच आहे. एलिआ बेटांत राहणाऱ्या झेनॉफेनिस् नांवाच्या तत्त्ववेत्त्यानें पुरातन काळीं या प्रवृत्ती-

विरुद्ध फार सुंदर असें प्रमाण आणलें होतें. तो म्हणतो, " जर एखाद्या कोळ्यानें ( Spider ) ईश्वराची कल्पना केली, तर तो ईश्वर म्हणजे एक मोठा कोळी अशीच करील; अथवा, एखाद्या बैलानें ईश्वराची कल्पना केली तर तो ईश्वर म्हणजे मोठा बैल अशीच कल्पना करील." तात्पर्य, मनुष्यानें ईश्वराची कल्पना, तो एक सर्वगुणसंपन्न मनुष्योत्तम अशी केल्यानें ईश्वर तसा आहे हें सिद्ध होत नाहीं तर ही कल्पना करणारा मनुष्य आहे येवढेंच सिद्ध होतें.

सृष्टीस कांहीं तरी कारण हवें म्हणून ईश्वर मानणें अवश्य, असें जसें म्हणतात, तसेंच सृष्टींत आपणांस जें रचनाचातुर्य दिसून येतें त्याची योग्य व्यवस्था लावणें असल्यास आपणांस कल्पक ईश्वर मानावा लागतो असें म्हणतात. याचा खुलासा मागील प्रकरणांत आलाच आहे. येथें हें प्रमाण खोडून काढण्याचा जो ह्यूमचा प्रयत्न आहे त्याचाच फक्त निर्देश करणें आहे.

ह्यूमचें म्हणणें असें कीं, घरें, यंत्रें, बोटी वगैरे करावयास कुशल, बुद्धिवान् कारागीर लागतो म्हणून हें सृष्टीचें यंत्र निर्माण करणारा यांत्रिक अथवा ही सृष्टिरूपी बाग लावणारा कुशल माळी कोणी असला पाहिजे हें मानणें चुकीचें आहे. कारण अल्प असें घर, बाग अथवा यंत्र यांच्यामध्यें व ज्या विस्तीर्ण, अफाट अशा सृष्टीचे हे बिंदु येवढे भाग आहेत त्यांमध्यें साम्य असें काय आहे? साम्य नाहींच. म्हणून दोहोंच्या साम्यावर उभारलेलें प्रमाण ग्राह्य असें ठरत नाहीं.

शिवाय आपण ज्या वेळेला जगतांत कांहीं कार्यें निर्माण झालेलीं पाहतों त्यांत मेंदूतून उत्पन्न होणारा जो विचाररूप फवारा त्याचा कितीसा अंश असतो? अनेक कारण समुदायांपैकीं तो एक आहे.

अशा स्थितींत या विचाराला सर्वांत श्रेष्ठ असें स्थान काय म्हणून द्यावें ? व संपूर्ण जगताच्या कारणाच्या स्थानीं काय म्हणून त्याची योजना करावी ? घर पाहिलें म्हणजे घर बांधणारा असावा असें आपण मानतों, कारण असा व्यक्त संबंध आपण अनुभवलेला आहे. पण जगत् आणि घर यांत कांहीं साम्य नाहीं. अर्थात् घरास बांधणारा पाहिजे म्हणून जगत् निर्माता कोणी हवा हें उपमान प्रमाणावर रचिलेलें अनुमान चुकीचें आहे.

मानावयाचेंच असेल, तर जगत् हें सजीव प्राण्यासारखें आहे व देव हा त्या सजीव प्राण्याच्या आत्म्यासारखा आहे असें मानावें. पण देवाच्या ठिकाणीं इच्छा, चातुर्य, बुद्धि, इत्यादि मनुष्यधर्म मात्र मानतांच यावयाचे नाहींत.

ह्यूम हा "देव म्हणजे सृष्टिरूपी प्राण्याचा आत्मा, असें मानायचें असेल तर माना" असें जरी म्हणत असला तरी जो आत्माच मानायला राजी नाहीं. तेव्हां त्याच्या ह्या वर्णनास काय महत्त्व द्यावयाचें हें ठरविण्याचें वाचकांवरच सोंपवणें बरें !

येथपर्यंत थोड्या विस्तृत रीतीनें ह्यूमचें म्हणणें मांडलें याचें कारण पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या इतिहासांत याला फार महत्त्वाचें स्थान दिलें जातें. आतां थोडक्यांत ह्यूमनंतर झालेल्या प्रसिद्ध शार्मण्यदेशीय पंडितानें—कांटनें—त्याचें जें खंडन केलें आहे तें देऊन हें बरेंच लांबलेलें प्रकरण आटपूं.

ह्यूमचा मुख्य मुद्दा असा कीं, कार्यकारणव्याप्तीचा उपयोग करून मिळविलेलें ज्ञान निश्चित असूं शकत नाहीं. यांस कांटचें उत्तर असें कीं, ह्यूम म्हणतो तें जर खरें असलें तर कोणतेंच ज्ञान सत्य नाहीं असें म्हणावें लागेल. पण ह्यूम् सर्वच ज्ञान अनिश्चित मानत

नाहीं. तो कांहीं विषयांचें ज्ञान निश्चित मानतो. कांटचें म्हणणें असें कीं, तें ज्ञानसुद्धां त्याला निश्चित मानतां येणार नाहीं.

तसेंच, ह्यूमनें कार्यकारणाची जी फोड केली तीहि बरोबर नाहीं. ह्यूमचे म्हणणें कीं आपण ज्या गोष्टी अनेक वेळां एकमेकांना अनु-सरतांना पाहतों त्या कार्य–कारण नात्यानें जोडून देतों. पण हें खरें नाहीं. आपण दिवसांपाठीमागून रात्र येते हें नेहमीं पाहतों. पण आपण कधीं रात्रींचें कारण दिवस असें मानलें आहे काय ?

आपण घरांत शिरतांना प्रथम भिंत पाहतों व मग दरवाजा पाहतों आणि असा प्रकार नेहमीं घडतो म्हणून भिंत ही घराचें कारण आहे असें कोणी मानलें आहे कां ? या दोन उदाहरणांवरून ह्यूमचा 'कारण' स्वरूपाबाबतचा सिद्धान्त चुकीचा आहे हें स्पष्ट होणार आहे.

मात्र येथें हें सांगणें अवश्य आहे कीं, ह्यूमप्रमाणेंच कांटचें मत आहे कीं, सृष्टींचें कारण म्हणून, अथवा सृष्टिरचनेचें कारण म्हणून ईश्वराची सिद्धि करूं लागलें असतां ती होणार नाहीं. पण याचा अर्थ ती तदितर प्रमाणांनीं होणारच नाहीं असें नव्हे. कांट हा स्वतः आस्तिक असून तो नैतिक भावनेच्या जोरावर ईश्वरसिद्धि कशी करतो हें मागील प्रकरणांत दाखविलेंच आहे.

ह्यूमच्या तत्त्वविचाराच्या बुडाशीं असणाऱ्या इंद्रियसंवेदनाप्रधान अनुभववाद्याचें ग्रीन या आंग्ल तत्त्ववेत्त्यानें फारच उत्तम रीतीनें खंडन केलें आहे. इंद्रियद्वारा होणारी संवेदना ही सर्वसंबंध स्वतंत्र आहे हें समजणेंच मुळांत चुकीचें आहे. अर्वाचीन मानसशास्त्रज्ञ डॉ. वार्ड हे तर अशी संबंधरहित ऐंद्रियिक संवेदना म्हणजे एक मानसशास्त्रांतील कल्पित कथा समजतात. अशा अनेक संवेदनांचा समूह तयार होऊन त्यापासून आपलें ज्ञान तयार होतें असें सांगणें

म्हणजे मिथ्या वस्तूपासून सत्यसृष्टि उत्पन्न झाली असें कथन करण्यासारखें आहे. इंद्रियसंवेदनांची जाणीव घेणारा, त्यांतील संबंध पाहणारा व तें स्मरणांत ठेवून कल्पनासृष्टि तयार करणारा प्रापंची जीवात्मा मानणें अवश्य आहे. असा जीवात्मा मानला नाहीं तर ज्ञानाची उपपत्तीच लागणार नाहीं, असें कान्ट, ग्रीन वगैरे सर्वांचें मत आहे. हा जीवात्मा ज्ञानस्वरूप असून त्याचें जगताच्या बुडाशीं असणाऱ्या व्यापक आत्म्याशीं ऐक्य आहे असें ग्रीन समजतो व कान्ट हा हृदयाच्या ज्या गरजा आहेत त्यांकरितां ईश्वर मानणें अवश्य आहे असें समजतो हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

तात्पर्य, ह्यूमचें तत्त्वज्ञान ज्या मानसशास्त्रांतील सिद्धान्तावर उभारलें आहे तो पायाच कच्चा आहे येवढेंच वाचकांनीं लक्षांत घेतल्यास त्यावरील इमारत कितपत टिकेल याचा उलगडा त्यांचा त्यांना सहजच होईल.

---

# भौतिकविज्ञानावर उभारलेला नास्तिकवाद : १०

मागील मतापेक्षां हें मत अधिक महत्त्वाचें आहे व म्हणूनच यास एक स्वतंत्र प्रकरण देण्याचें ठरवलें आहे. या मतास इतकें महत्त्व कां प्राप्त झालें तें प्रथम देऊन मग या मताचा विचार करणार आहोंत.

मनुष्याच्या सुपीक मनांतूनच नीति, धर्म, राजकारण, काव्य, भौतिकशास्त्रें इत्यादिकांच्या कल्पना उत्पन्न झाल्या. या सर्वच कल्पना जरी मनोजन्य असल्या तरी मन हें सर्वांना सदा सारखीच किंमत देत असतें असें मात्र नाहीं. मनानें या वेगवेगळ्या कल्पनांना दिलेल्या मूल्यांचा इतिहास म्हणजेच एका प्रकारानें मानवी संस्कृतीचा इतिहास होय. फ्रेंच तत्त्ववेत्ता कॉंत्, जर्मन तत्त्ववेत्ता हेगेल इत्यादिकांनीं या कल्पनांची वाढ कोणत्या नियमांनीं होते, कोणच्या कल्पनेची वाढ केव्हां पुरी झाली म्हणून समजावी, यासंबंधीं कांहीं नियम बांधण्याचा प्रयत्न केला आहे. तूर्त आपणांस एवढेंच लक्षांत ठेवावयाचें आहे कीं ज्या युगांत ज्या कल्पनेला महत्त्व असतें त्या कल्पनेवरच तें युग मोडलें जातें किंवा ओळखलें जातें. हल्लींचा काळ अथवा हें युग शास्त्रीय युग म्हणून प्रसिद्ध आहे. पूर्वींचीं धर्म व तत्वज्ञान यांचीं युगें संपलीं. एक काळ असा होता कीं, कोणच्याहि प्रश्नाकडे तिचें मूल्य ठरविण्याकरितां धर्माच्या दृष्टीनें पाहात असत. आतां तो काळ बदलला; इतका कीं धार्मिक दृष्टीनें पाहणें हें आतां बुद्धिमांद्याचें लक्षण ठरतें. या युगांत कोणचीहि कल्पना सुप्रतिष्ठित होण्याकरितां तिचा वैज्ञानिक दृष्ट्याच विचार होणें अवश्य आहे. तेव्हां नुसत्या धार्मिक अथवा तत्त्वज्ञानाच्या भूमिकेवरून ईश्वराच्या कल्पनेकडे

पाहून आतां चालणार नाहीं. म्हणूनच या प्रकरणांत भौतिकशास्त्रें, त्यांच्यावर उभारलेले विज्ञानावाद व जडवाद, व त्यांचे ईश्वराच्या आस्तित्वावर होणारे परिणाम याचा विचार करणार आहोत.

या युगांत भौतिक शास्त्रांना जें महत्त्व प्राप्त झालें आहे तें सहजासहजीं प्राप्त झालेलें नव्हे. भौतिक शास्त्रांची झालेली कल्पनातीत वाढ व तिचे मनुष्याच्या सुखसाधनांवर झालेले परिणाम हे या महत्त्वास कारणीभूत आहेत. गेल्या पांचशें वर्षांत या भौतिकशास्त्रांतील शोधांनीं मनुष्याच्या सुखसोयींत इतकी भर घातली आहे कीं, पांचशें वर्षांपूर्वीं निजलेला एकादा मुचकुंद जागा होऊन जर आपल्या सभोंवतीं पाहूं लागला तर त्याला 'स्वर्ग म्हणून जो आपण ऐकला तो येथें अवतरला आहे' असेंच वाटूं लागेल यांत शंका नाहीं. आगगाडी, मोटारी, विमानें, तारायंत्र, बिनतारी संदेश, रेडिओ, लाऊड स्पीकर, टॉकीज्, विजेचे दिवे, पंखे, हीं एकापेक्षां एक विस्मयकारक व मानवीजीवन सुखावह करणारीं साधनें भौतिक शास्त्रांनीं मानवांच्या हातांत आणून सोडलीं आहेत व याबद्दल जगत् व्याट्, मार्कोनी वगैरे शास्त्रज्ञांचें निःसंशय ऋणीच राहील.

या शास्त्रांची वाढ झपाट्यानें पाश्चात्य देशांत झाली. पण दुर्दैवानें प्रारंभापासूनच पाश्चात्य देशांत प्रचलित असणारा ख्रिश्चन धर्म व भौतिकशास्त्रें यांचा विरोध सुरू झाला. वास्तविक धर्माचा व भौतिक शास्त्राचा विरोध असलाच पाहिजे असा कांहीं नियम नाहीं. पण पंधराव्या-सोळाव्या शतकांत भौतिक शास्त्रज्ञांनीं जे शोध लावले त्या योगानें ख्रिश्चनांचा धर्मग्रंथ जें 'बायबल' त्यांतील भौतिकगोष्टींविषयीं बांधलेले सिद्धान्त खोटे ठरूं लागले. कोलंबसानें अमेरिका शोधून काढली या योगानें पृथ्वीची पूर्वींची कल्पना बदलावी लागली. याहिपेक्षां ग्यालिलिओनें दुर्बिणीचा शोध लावल्यानें ग्रह, नक्षत्रें,

सूर्य यांच्या विषयींच्या समजुतींत मोठीच क्रान्ति झाली. यांना धर्मांत दिलेले देवत्व नाहींसें होऊन हे पृथ्वीसारखेच निर्जीव जड पदार्थ आहेत असें सिद्ध झालें. सृष्टि सात दिवसांत निर्माण झाली वगैरे कल्पना कल्पनाच ठरत चालल्या. यामुळें वैज्ञानिक शास्त्रज्ञ व धर्मज्ञ पंडित यांच्यांत मोठा तंटा सुरू झाला. आणि ग्यालिलिओ, ब्रूनो वगैरे सारख्यांचा फार छळ झाला. कित्येकांना तर सत्याकरितां आपल्या आत्म्याचें बलिदानहि करावें लागलें. तत्कालिन धर्मज्ञ पंडितांनीं शास्त्रज्ञांचा केलेला छळ व बायबलसारख्या धर्मग्रंथांतील भौतिक वस्तूंसंबंधीं खोट्या ठरलेल्या कल्पना यांचा परिणाम असा झाला कीं, शास्त्रें व धर्म यांचा उभा दावा सुरू झाला, व तो अजूनहि मिटला आहे असें म्हणतां येणार नाहीं.

या लढ्यांत भौतिक शास्त्रांनीं लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवाला येईल अशा स्थितींत आपले शोध आणून ठेवल्यानें धर्माची बाजू लंगडी पडूं लागली. विज्ञानाची किंमत वाढत चालली. धर्मग्रंथांवरचा लोकांचा विश्वास उडत चालला. याचा अर्थ त्या वेळच्या वैज्ञानिकांत ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे कोणी नव्हतेच असे मात्र नाहीं. उलट फॅरेडे-सारखे लोक ईश्वरावर अत्यंत श्रद्धा ठेवणारे असेच होते.

पण मनुष्याचें मन हें कांहीं कप्प्याकप्प्याचें बनलेलें कपाट नव्हे, कीं, एक कप्पा उघडला कीं बाकीचे मिटलेले राहूं शकतात. मनाचीं वेगवेगळीं अंगें एकमेकांशीं संलग्न असल्यानें एकांत फरक झाला कीं त्याचा सर्व मनावरच परिणाम झाला असें म्हणावयास हरकत नाहीं. लोखं-डाच्या तुकड्याचें एक टोंक जर विस्तवांत धरलें तर उष्णता ज्याप्रमाणें दुसऱ्या टोंकापर्यन्त जाऊन पोंहोंचते, तसेंच मनाचें आहे. हें सांगण्याचा हेतु असा, कीं, भौतिक शास्त्रज्ञ हा विज्ञानांतीलच शोध करून आपले नवे विचार त्या शास्त्राच्या कप्प्यांतच घालून ठेवील असें होणार

नाहीं. शास्त्रज्ञ हा मनुष्यच; तेव्हां तो ज्यावेळीं जगताचें कोडें आपल्या मनाशीं उलगडूं लागतो त्यावेळीं स्वाभाविकच त्याच्या शास्त्रांत त्याच्या प्रचीतीनें सत्य ठरलेलीं प्रमेयें हीं निरपवाद अबाधित सर्व शास्त्रमूलक सत्यें आहेत असें धरूनच तो चालूं लागतो. तसेंच ज्या पद्धतीनें भौतिक शास्त्रांत अचंबा उत्पन्न करणारा विजय मिळवून दिला ती पद्धत त्यास निर्दोष वाटूं लागते. व तो त्या प्रमेयांचा व त्या पद्धतीचा जगताच्या बुडाशीं काय तत्त्व आहे हें पाहणाऱ्या तत्त्वज्ञानांत उपयोग करतो. याचाच परिणाम जडवाद व विज्ञानवाद होत; व यांनींच ईश्वराची या जगतांतून हकालपट्टी केली.

भौतिक शास्त्राचा व नवीन प्रयोगपद्धतीचा ( Experimental Method ) आरंभ जरी ग्यालिलिओ, रोजर बेकन यांपासून होतो तरी अर्वाचीन तात्त्विक जडवादाचें मूळ पाहूं गेल्यास तें आपणास देकार्त या फ्रेंच तत्त्ववेत्त्याच्या तत्त्वज्ञानांत आढळून येईल. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी आहे कीं देकार्तचा स्वतःचा देवावर विश्वास होता; एवढेंच नव्हे, तर वेगवेगळीं प्रमाणें आणून त्यानें ईश्वराची सिद्धि करण्याचा आटोकाट प्रयत्न केला हें आपण मागें पाहिलेंच आहे. पण त्यानें सांगितलेल्या ज्या दोन गोष्टींतून जडवाद निर्माण झाला त्या म्हणजे, एक या जगतांत दोन पदार्थ आहेत–एक विचार करणारें अनवकाश मन व दुसरा सावकाश पण विचाररहित जडवस्तु—; व दुसरी,आत्मा फक्त मनुष्य शरीरांतच राहतो, बाकीचीं शरीरें नुसतीं चालतीं बोलतीं निर्जीव यंत्रें आहेत.

मनुष्येतर प्राण्यांचीं शरीरें हीं चालतीं बोलतीं यंत्रें आहेत असें एकदां मानलें कीं, मनुष्यशरीर हें सुद्धां असेंच यंत्र आहे हें मानण्यास फारसा अवकाश नाहीं. व पुढें जे शोध निघाले त्यांचा परिणाम असेंच मानण्यांत झाला कीं, चित् अशी वस्तूच नाहीं. सत्य जर असेल

तर जडच; चिदाचा नुसता भास आहे. या मतासच जडवाद असें म्हणतात.

देकार्तीकनें पाया घालून दिलेल्या मतास हार्वे, बॉईल यांच्या-सारख्यांनीं रक्ताभिसरणाच्या वगैरे बाबतींत लावलेले शोध पुष्टि देणारे ठरले. स्पिनोझा ईश्वर मानणारा खरा; पण त्याचें मत सुद्धां एका दृष्टीनें या जडवादास पुष्टि देणारे झाले. कारण त्याने असें प्रतिपादन केलें कीं या जगताच्या बुडाशीं ईश्वराचा कोणचाहि हेतु नाहीं. ही सर्व सृष्टि निर्हेतुक निर्माण झालेली आहे. या स्पिनोझाच्या मतानें निसर्गवाद व जडवाद यांसच पुष्टि मिळाली.

वेगवेगळे जे खगोलशास्त्रज्ञ झाले त्यांतील लाप्लेससारख्यांचा सिद्धान्त या मतास फार पुष्टिकारक झाला. लाप्लेस या फ्रेंच खगोल शास्त्रज्ञानें आपला नीहारीसिद्धान्तावरचा ( Nebular Theory ) ग्रंथ लिहिला व तो नेपोलिअनला वाचावयास दिला. नेपोलिअननें तो वाचला. व जेव्हां दोघांची भेट झाली तेव्हां नेपोलिअन लाप्लेसला म्हणाला कीं, "अहो, तुम्ही यांत ईश्वराचा उल्लेख कसा केला नाहीं ?" त्यावर तो खगोलशास्त्रज्ञ म्हणाला, "मला तशी गरज भासली नाहीं."

या जडवादास खरी मदत डार्विनच्या विकासवादावरील ग्रंथानें झाली. वैचित्र्यपूर्ण सृष्टि ही एका कारणापासून कशी निर्माण झाली हें जडवादास सांगणें कठीण पडे. ही अडचण डार्विननें दूर केली. डार्विननें जो सिद्धांत मांडून क्रांन्ति घडवून आणली तो असा:— 'प्राण्यांची जगण्याकरितां सारखी धडपड चालू आहे. या धडपडींत जगण्यास जे लायक तेच टिकतात; व ही निवड निसर्ग करतो.' वास्तविक हा सिद्धान्त प्राणिशास्त्रांतला म्हणजे चल, चेतन पदार्थविषयक शास्त्रां-

तला आहे. अर्थात् तो चेतनाचें अस्तित्व गृहीत धरून चालतो. शिवाय विकासवाद मान्य असला म्हणजे डार्विनचा सिद्धान्त मान्य केलाच पाहिजे असें नाहीं. व हल्ली डार्विनच्या सिद्धान्तास पूर्वी इतकी शास्त्रीय जगांत मान्यताहि नाहीं. अशी जरि खरी स्थिति आहे तरी, ज्यावेळीं डार्विननें हा सिद्धान्त मांडला त्यावेळीं व तदनंतरच्या अव्यवहित उत्तरकाळीं लोकांना असें वाटलें कीं, जगांतील सर्व कोडीं उलगडण्याची किल्लीच आपल्या हातांत आली. अर्थातच लोकांनीं हा सिद्धान्त सृष्टीची वाढ कशी होते याकडे लावला. व त्यायोगें ईश्वराच्या कर्तृत्वास अजीबात फांटा मिळाला.

या वादास अगदीं अलिकडच्या काळांत मदत प्रो. ल्यूबासारख्या मानसशास्त्रज्ञांच्या लेखांनीं झाली. हल्लीं मानसशास्त्राची वाढ फार झपाट्यानें होत आहे व मानसशास्त्रज्ञांनीं ईश्वराच्या व धर्माच्या कल्पनेंचें मूळ, चैतन्याचें स्वरूप, आत्मा अमर कीं मर्त्य इत्यादि प्रश्नांवर शोध लावण्याचा बराच प्रयत्न केला आहे. यांपैकीं कित्येकांचा कल देहात्मवादाकडेच झुकता आहे. देहात्मवादी लोकांचें म्हणणें असें कीं, आत्मा हा आगगाडीची शिटी किंवा वीण्याच्या तारांतून निघणारा ध्वनि अथवा पाण्यावरील फेस यांच्या-सारखा आहे. तो निवळ भूतकार्य आहे. आपल्याकडचा दृष्टान्त द्यावयाचा तर, जसें कांहीं पदार्थ एकत्र केले म्हणजे त्यांत मादकता हा गुण उत्पन्न होतो तसा चैतन्य हा शरीराचा धर्म आहे. या फेसाला काय महत्त्व आहे ? आपण ज्यांना धार्मिक भावना म्हणतों ह्या पीडित, दुःखी, जगाला विटलेले अशांच्या मेंदूंतल्या कल्पना आहेत. धर्म हा दुःखी कष्टी मनास गुंगी आणून गुंगवून टाकणारी अफू आहे. मूळचें चैतन्यच जर फेसासारखें भूतकार्य तर ईश्वर कोठला आणि धर्म कोठला ?

डॉ. फ्राईड या प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञानें ईश्वराची कल्पना ही लैंगिक कल्पनेंतून कशी निर्माण झाली हें दाखवून त्यास मदत केली, तर अमेरिकन ग्रंथकार मेनेकन् यांनेंहि दुबळ्या मनाचें हें कार्य म्हणून तिची उत्पत्ति सांगितली.

आम्ही आतांपर्यन्त जडवाद असा शब्द वापरला व विज्ञानवाद हा वापरला नाहीं. याचें कारण विज्ञानवाद हा जड वादाचाच आधुनिक प्रकार आहे. विज्ञानवाद व जडवाद यांत फरक एवढाच कीं विज्ञानवादी जड अशी अज्ञेय स्वतंत्र वस्तु जड मानायला राजी नाहींत. विज्ञानवाद्यांच्या मतें जगाचें मूळ चैतन्यरहित अशा गतिमान पदार्थांत आहे. बाकी ईश्वराकडे पाहण्याचा कोन दोघांचाहि सारखाच आहे.

निसर्गवादीसुद्धां यांच्यांतच मोडतात. म्हणून त्यांचा स्वतंत्र उल्लेख केला नाहीं.

तात्पर्य चैतन्याशिवाय जगताचें कोडें उलगडतें असेंच म्हणणारे हें सर्व आहेत.

येथपर्यंत या मताचा इतिहास व सिद्धान्त सांगितला. आतां थोडक्यांत या मताचा सारांश सांगून याची छाननी करूं.

भौतिकविज्ञानवाद हा भौतिक विज्ञान, प्राणिशास्त्र, रसायनशास्त्र, मानसशास्त्र इत्यादि भौतिकशास्त्रांच्या शाखांनीं प्रयोग पद्धतीचा अवलंब करून जे निष्कर्ष प्रस्थापित केले त्यांवर उभारलेला आहे. यामुळें सत्यासत्य ठरविण्याच्या बाबतींत नुसत्या विचारात्मक पद्धतीस हा वाद फार किंमत देत नाहीं. याचा सर्व भर प्रयोग पद्धतीवर आहे. वर उल्लेखिलेल्या व इतर आणखी ज्या भौतिक विज्ञानाच्या शाखा आहेत त्यांत प्रामुख्यानें येणाऱ्या कल्पना म्हणजे जड वस्तु, अंध ( हेतुविरहित ) कार्यकारणभाव संबंध, निरपवाद निसर्गाचे नियम, विकास, अवकाश व काळ यांचें सत्यत्व, जड पदार्थांचें नित्यत्व

( Conservation of mass ) व शक्तिसंस्थिति (Conservation of energy ) या होत. या कोट्यांचें अथवा कल्पनांचें अवलंबन करून भौतिक विज्ञानवादी हा सर्व जगाची व्यवस्था लावण्याचा प्रयत्न करतो. व त्याला ही व्यवस्था लावीत असतां चेतनवस्तु अथवा ईश्वर यांची गरज भासत नाहीं. किंबहुना त्याचें मत असें कीं जीवचैतन्य ( Consciousness ) म्हणजे मेंदूचे व्यापार चालले असतां जें कांहीं जड परिणाम उत्पन्न होतात तदंगभूत एक क्षुद्र कार्य. शरीराच्या हालचालीचा व त्याचा कार्यकारण असा संबंधच असला तर कारण व कार्य असा आहे. मागील दृष्टान्तच देऊन म्हणावयाचें तर असें म्हणतां येईल कीं आगगार्डीनें शिटी फुंकली तर त्या आवाजाचा इंजिनमधील यंत्रांवर कांहीं परिणाम होईल कां ? वीण्याच्या तारा छेडल्या असतां ध्वनि निर्माण होतात म्हणून उत्पन्न झालेल्या ध्वनींचा तारांवर कांहीं परिणाम होईल कां ? तात्पर्य चैतन्य म्हणजे नुसतें इंजिनचा आवाज, वीण्यांच्या तारांतून निघणारा ध्वनि अथवा पाण्यावरील फेस यासारखें आहे. शरीराच्या हालचालीवर त्याचा कांहीं परिणाम होत नाहीं. हें झालें व्यष्टीचें. समष्टीचेंहि असेंच आहे. जें पिंडीं तें ब्रह्मांडीं. शरीरावर ज्याची सत्ता असें चैतन्य मानण्याची जेथें पंचाईत, तेथें विश्वाचा सूत्रधार, नियामक असा ईश्वर कोठून मानणार ?

एके काळीं या भौतिक विज्ञानाची भौतिक शास्त्रांत, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत व व्यवहाराच्या बाजारांत मोठी किंमत होती. भौतिकशास्त्रांनीं लावलेल्या शोधांनीं व त्यांनीं करून दिलेल्या सुखसोयींनीं माणसांचे डोळे दिपून जाऊन भौतिकशास्त्रें सांगतील तेंच सत्य असें मानण्याचा शिष्टसंप्रदाय बनत चालला होता. पण तो चालता काळ आतां राहिला नाहीं. तत्त्वज्ञ हे आतां जगत् चैतन्यस्वरूप आहे

असें मानण्याकडे झुकत आहेत; नव्हे, झुकले आहेत. आयकेन्, टेलर, वार्डसारखे आत्मसत्तावादी (Idealists) अथवा संतयानासारखे पदार्थ-सत्तावादी ( Realists ) तत्त्वज्ञ जडवस्तु मानीत नाहींत यांत नवल नाहीं. कारण खुद्द भौतिकशास्त्रांतच इतकी क्रान्ति झाली आहे कीं एडिंग्टन्, सर जेम्स जीन्स, कीथसारखे मोठमोठे भौतिकशास्त्रज्ञ, बर्गसॉन्, लॉईड मॉर्गन् सारखे प्राणीशास्त्रवेत्ते हे जगताच्या बुडाशीं चेतनशक्ति असावी असें मानूं लागले आहेत. ' भौतिक विज्ञान हें इंद्रियांना गोचर होणाऱ्या जगताची व्यवस्था लावायला अपुरें आहे. मग उच्च भावना, अध्यात्मज्ञान ज्यांत अंतर्भूत होतात अशा उच्च मानवी जगताची रचना तें काय सांगूं शकणार ?' असें भौतिक-शास्त्रवेत्ते आतां म्हणूं लागले आहेत.

भौतिक विज्ञानवादाची जगताची व्यवस्था लावण्याची जी पद्धत आहे तिच्या विरुद्ध खालीलप्रमाणें देतां येण्यासारखी आहेत. ( १ ) भौतिक विज्ञानाचा ज्या वस्तूवर मुख्यतः भर त्या जड वस्तूचें स्वरूप काय याचा आपण प्रथम विचार करूं. सामान्य मनुष्याची जड वस्तूची कल्पना म्हणजे अचेतन, घनीभूत, अवकाशास व्यापणारी अशी अविभाज्य वस्तु. पण तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत अथवा खुद्द भौतिकपदार्थविज्ञानाच्या क्षेत्रांत अशी वस्तु मानावयास कोणी हल्लीं तयार नाहीं. ही स्थिति कशी झाली हें थोडक्यांत आपण पाहूं.

( अ ) प्रथम तत्त्वज्ञान क्षेत्रांतील क्रान्तीकडे वळूं. ही क्रान्ति पाश्चात्य तत्त्वज्ञानांत, प्रथम, आयरिश तत्त्ववेत्ता बर्क्ले ( Berkeley ) यानें घडवून आणली. त्याचें म्हणणें असें कीं, व्यवहारांत आपण जिला जडवस्तु म्हणतों ती आहे तरी काय हें आपण प्रथम पाहूं. ' घड्याळ, दगड वगैरे जड पदार्थ आहे. ' या वाक्याचा अर्थ ज्या वेळेला आपण खोल जाऊन पाहूं लागतों त्या वेळेला आपल्याला

असें आढळून येतें कीं, जड वस्तु म्हणून तर आपल्या हाताला लागत नाहींच; उलट शब्द, स्पर्श, रूप रस, गंध अशा चेतनात्मक संवेदनाच अनुभवास येतात. पौर्वात्य दृष्टान्त जर द्यावयाचा तर, सूर्य हातांत घेऊन अंधार पाहूं लागला तर त्याला त्याची किरणेंच जशीं दिसतात, तसेंच जीवचैतन्य जडपदार्थ पाहूं गेलें तर त्याच्या अनुभवास शब्द स्पर्शादि चेतनात्मक संवेदनाच येतात. तद्व्यतिरिक्त जड म्हणून वस्तु भासतच नाहीं. तात्पर्य, आपण ज्याला जडवस्तु म्हणून म्हणतों तो एक संवेदनांचा गोळाच आहे. ‘ आत्मभानें पदार्थसत्ता ’ या तत्त्वाचा तो अनुयायी असल्यानें तो कधींही अनुभवास न येणारी जडवस्तु मानावयास तयार नाहीं. बर्क्लेनें हें जें जडवस्तूच्या अस्तित्वाचें खंडन केलें आहे, तें इतकें महत्त्वाचें आहे कीं तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत अथवा भौतिक शास्त्राच्या क्षेत्रांत, पूर्वीच्या स्वरूपांत जडपदार्थ मानावयास त्याच्या नंतर झालेले तत्त्वज्ञ धजत नाहींत. एडिंग्टन म्हणतो,*

“ I have already said that scicnce is no longer disposed to identify reality with concreteness. Materialism in its literal sense is long since dead. ”

इतर बाबतींत बर्क्लेशीं मतभेद असणारे तत्त्ववेत्तेसुद्धां ‘ जड ’ नाहीं हें बर्क्लेचे म्हणणें मान्य करतात. बर्क्ले व इतर तत्त्ववेत्ते यांच्यांत फरक जर कोठें असेल तर ‘ जड नाहीं, मग आहे काय ? ’ या प्रश्नास दिलेल्या उत्तरांत आहे.

अगदीं अर्वाचीन काळांत सुद्धां डॉ. वार्डसारख्या प्रसिद्ध व मान्य अशा मानसशास्त्रवेत्त्यांनीं मानसक्षेत्रांतील जडवादा ( Epiphenomenalism ) चें खंडन करतांना असाच युक्तिवाद लढवलेला आहे. डॉ. वार्ड म्हणतात, “ ज्ञानाच्या द्वाराच ‘जड’

* Science And The Unseen World Page 31.

म्हणून जी वस्तु आपण समजतों तिचें ज्ञान होतें. ज्ञान नाहीं तर जड वस्तु नाहीं. अशी स्थिति असतांना जडवस्तूसच प्रमुख मानून ज्ञान व चैतन्य हें नुसतें पाण्यावरील फेसासारखें क्षुद्र दुर्बल पदार्थ समजणें म्हणजे गाडीपुढें घोडा उभा करण्याऐवजीं घोड्यापुढें गाडी ठेवण्यासारखें हास्यास्पद आहे."

टेलर, लोट्झ् सारखे तत्त्वज्ञ 'जड' नाहींच, सर्व चिदच आहे असें म्हणूं लागले आहेत. ज्याला आपण जड जगत् म्हणतों ते सुद्धां वस्तुतः चैतन्ययुक्त जीवांची एक जमातच आहे. या सिद्धान्ताचा भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रांतून कै. सर जगदीशचंद्र बोस सारखे लोक पाठपुरावा करीत आहेत.

(आ) आतां भौतिक पदार्थविज्ञानाच्या क्षेत्रांत जडवस्तूचें स्वरूप काय आहे तें पाहूं. पदार्थविज्ञानवादाच्या इतिहासांत एक काळ असा होता कीं त्यावेळीं भौतिकविज्ञानवादी शास्त्रज्ञांना असें वाटे कीं, आपणांला या विश्वाची किल्ली सांपडली आहे. पूर्वींचे चिद्द्वैत, ईश्वरकारणवाद, वगैरे सर्व मतें टाकाऊ होत. पण आपली मतें मात्र कायम, निश्चित व अबाधित अशीं आहेत. यांत बदल होण्याचा संभव नाहीं. ही सुरक्षितता आतां भौतिक–विज्ञानवाद्यांना वाटत नाहींशी झाली आहे व त्याला, विज्ञानवादी बर्क्ले, व डॉ. वार्ड, टेलर यासारख्या आत्मसत्तावादी तत्त्ववेत्त्यांनीं केलेली टीका तर थोडीबहुत कारण आहेच; पण त्याहीपेक्षां खुद्द विज्ञानाच्या क्षेत्रांत आधुनिक विज्ञानवाद्यांनीं केलेले शोध कारण आहेत.

चेतनकारणवाद सोडून दिल्यानंतर भौतिकशास्त्रज्ञ प्रथम असें म्हणूं लागले कीं, या जगतास आधार जड प्रकृति आहे. व तिचाच हा सर्व परिणाम आहे. ईश्वराचा याच्याशीं संबंध नाहीं. पुढें विज्ञानवादी ही प्रकृति काय आहे हें पाहूं लागले असतां त्यांना आढळून

आलें कीं प्रकृति ही ब्याण्णव मूलतत्त्वांची (Elements) बनली आहे. पण पुढें असा प्रश्न आला कीं हीं मूलतत्त्वें तरी कशाचीं बनलीं आहेत? विचार करतां, त्यांची इसवी सनापूर्वी होऊन गेलेल्या डेमॉक्रिटस्नें सांगितलेल्या अणूंकडे नजर गेली. व त्यानीं सर्व जग परमाणूंचें (Atom) बनलें आहे असा सिद्धान्त मांडला.

परन्तु गेल्या तीस चाळीस वर्षांत एक मोठी क्रान्ति झाली. वीस-चाळीस वर्षांपूर्वी ॲटम हा अविभाज्य आहे असें समजलें जात होतें. पण पुढें असें आढळून आलें कीं ॲटम हा अविभाज्य नव्हे. उलट ॲटम हा सूर्यमालेसारखा आहे. त्यांत प्रोटॉन (घन विद्युत् कण) हा केन्द्राच्या ठिकाणीं आहे, व त्याच्याभोंवतीं अनेक इलेक्ट्रॉन्स् (ऋणविद्युत् कण) फिरत आहेत. तात्पर्य, ॲटम हें घन व ऋण विद्युत्कणांच्या समवायाचें नांव आहे. यावर शास्त्रज्ञांनीं प्रत्येक ॲटममध्यें घन व ऋण विद्युत्कण असतातच असतात, मूळ विद्युत् एकच आहे, पण तिचीं प्रगट होतांना घन व ऋण अशीं दोन रूपें दिसतात असें सिद्ध केलें आहे.अविभाज्य परमाणू हे या नवीन सिद्धांतानें विद्युत् स्वरूप आहेत असें ठरलें जात असतां मागच्या सिद्धान्तांना मोठा धक्का मिळाला. ॲटम् हें विद्युतचें स्वरूप आहे या सिद्धान्तानें जड-वस्तूचें स्वरूप पार पालटून हे विद्युत्कण सचेतन कीं अचेतन याबद्दल वादविवाद सुरु झाला. व्हाईटहेड सारखे लोक ते सचेतन आहेत असें म्हणूं लागले. पण इतर ते अचेतन आहेत असें म्हणतात. परमाणू अचेतन कां सचेतन हा प्रश्न जरि सोडून दिला तरी आपल्या डोळ्यांदेखत दृश्य जगाचें स्थिर स्वरूप बदलत चाललें हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. भौतिक विज्ञानवादी जगत् विद्युत्- स्फुरणरूप मानूं लागणें हा प्रत्यक्ष—प्रमाणवाद्यांस मोठाच धक्का आहे यांत शंका नाहीं.

जणूं कांहीं हा धक्का बसून जडवाद पुरा खिळखिळा झाला नाहीं

म्हणून त्याला आणखी एक धक्का दिला गेला व तो क्वॉटम् (quantum) सिद्धान्तानें होय. क्वांटम् सिद्धान्ताच्यापूर्वी असा समज होता कीं शक्ति ही अखंड आहे. व ती एका स्थलापासून दुसऱ्या स्थलापर्यंत सारखी पोचूं शकते.क्वांटम् सिद्धान्त असा आहे कीं शक्ति (Energy) छोट्या बंडलाच्या द्वारा पसरते व ती अखंड जाते हें म्हणणें चुकीचें आहे. याचा निष्कर्ष असा आहे कीं जडवस्तुचें जसे परमाणू आहेत तद्वत् शक्तीचे (Enegry) ही परमाणू आहेत अशा रीतीनें क्वांटम् सिद्धान्तानें शक्तीची अनस्यूतता व अखंडता जाऊन ती खंडित आहे असें सिद्ध झालें.

या सर्वांवर कळस आइन्स्टीनच्या सापेक्षवादानें केला. या सिद्धान्तानें 'मूले कुठारः' या म्हणीप्रमाणें जडवस्तूच्या मूळ रूपांतच फरक करून टाकला. न्यूटनपूर्वीचे शास्त्रज्ञ व न्यूटन असें समजत कीं जडाचें वस्तुमान व शक्ति हे गुण न बदलणारे आहेत. व न्यूटनच्या गुरुत्वाकर्षणाच्या सिद्धान्तांत सुद्धां ही गोष्ट गृहीत धरलेली आहे. आयन्स्टीननें पदार्थांचे वस्तुमान व शक्ति ही निश्चित स्वरूपानें असूं शकत नाहींत, त्यांचीं आपणांस दिसणारीं रूपें सापेक्ष आहेत असें सिद्ध केलें. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत सापेक्षतावाद फार जुना आहे. तसाच भौतिक विज्ञानाच्या क्षेत्रांतहि तो जुना आहे. परन्तु पूर्वी अवकाश व काल संलग्न आहेत असें समजत नसत. ही कल्पना अर्वाचीन आहे. आइन्स्टीनचा सिद्धान्त असा कीं एकाद्या जडाचें वस्तुमान अथवा लांबी जी दिसतात ती पृथ्वीच्या हल्लीच्या भ्रमणाची जी गति आहे व द्रष्टे जे आपण त्यांचे अवकाशांत जें स्थान आहे त्याच्याशीं असणाऱ्या वस्तूंच्या संबंधावर अवलंबून आहे. दुसऱ्या ताऱ्यावरून पदार्थांकडे पाहूं लागले असतां त्याची लांबी हल्लीं दिसते तशी दिसणार नाहीं व पृथ्वीचा जो हल्लींचा वेग आहे त्यांत फरक होऊन जर तो वाढत

राहिला तर वस्तूची लांबी शून्यापर्यंत सुद्धां येऊन पोहोंचेल. या आइन्स्टीनच्या सिद्धान्तानें जडवस्तूचें स्वरूप पारच बदललें. त्याच्या मतें वस्तूच्या तीन परिमाणांबरोबर कालरुपी चवथें परिमाण मानणें अवश्य आहे. ज्याला आपण जडवस्तु म्हणतो ती म्हणजे विनत स्वरूपाच्या अवकाशाचा एक तयार झालेला भोंवरा ( Kink ) होय. अशा रीतीनें सापेक्षवादाच्या दृष्टीनें विश्वाचें केंद्र सर्वत्र आहे.

तात्पर्य, जड जगत् हें स्थूल स्वरूपापासून निघून शून्यापर्यन्त अथवा अवकाशापर्यन्त येऊन बसलें आहे. आमच्याकडे सांख्यसुद्धा प्रकृति अशीच दिक्कालाधार ' सूक्ष्म ' समजत असत व ती मधूनच स्थूल सूक्ष्म जग उत्पन्न झालें असें समजत.

( २ ) पदार्थ विज्ञानाचा दुसरा मोठा आधार म्हणजे निसर्गाचे नियम ही कल्पना. ह्यांचें परीक्षण आत्मसत्तावादी तत्त्ववेत्त्यांनीं केलेलें वाचकांनीं पाहावें. तें महत्त्वाचें असलें तरी तूर्त आम्हीं येथें देत नाहीं. खुद्द भौतिकशास्त्रच याविषयीं काय म्हणतात तें देऊन पुढच्या प्रमाणाकडे वळूं.

एडिंग्टन आपल्या *पुस्तकांत म्हणतो कीं निसर्गाच्या कायद्याच्या कल्पनेनें धर्म नाहींसा होण्याची कल्पना सोडून द्या. कारण या नियमांना साधे ७×९=६३ हे ७×९=६५ या पेक्षां कां खरें हें सांगणें कठीण आहे.

( ३ ) खगोल शास्त्रज्ञ लाप्लेसनें या विश्वाचें कारण नीहारासारखा पदार्थ ( Nebulous matter ) मानून ईश्वराला स्पर्श न करतां

*"Dismiss the idea that natural law may swallow religion; it cannot even tackle the multiplication table single-handed."

—Science and the Unseen world. Page 36

पृथ्वीची व्यवस्था लावून दाखविली. पण खगोलशास्त्रज्ञांना लाप्लेसचा सिद्धांत अनेक कारणांमुळें चुकीचा वाटला. त्याऐवजीं मिटिऑरिक सिद्धान्त कित्येकांनीं मांडला. हाहि अपुरा वाटून त्या ऐवजीं प्रो. चेंबर्लेन यांनीं Sun-bolt सिद्धान्त मांडला. हाहि निरपवाद नव्हेच. ही झाली पृथ्वीची गोष्ट. मग संपूर्ण विश्वाच्या बाबत निरपवाद सिद्धान्त सांगणें किती कठीण आहे, हें वेगळें सांगावयास नको. या बाबतींत वेस्टवेच्या पुस्तकांतील खालील उतारा देऊन पुढच्या प्रमाणाकडे वळूं.

When, however, we attempt to find an origin of the Universe itself, any hypothesis is necessarily highly speculative. The mind is baffled as it always is baffled when it attempts to follow up an infinite regress. If, however, the mind can bring itself to admit a First Cause, the rest is easy. If it denies a First Cause, the problem admits of no conceivable solution. It may be urged that neither can a First Cause be adequately conceived. But once more, are we not sometimes bound to believe what we cannot conceive ?"

—Science and Theology. Page 150.

लॉर्ड कीथ तर या जगताच्या बुडाशीं चित्शक्ति आहे असें मानणेंच अवश्य आहे असें स्पष्ट म्हणतात.

( ४ ) प्राणिशास्त्रांत डार्विनच्या सिद्धान्तांपैकीं विकास ही कल्पना सामान्य रीतीनें सर्वत्र मान्य आहे. पण तपशीलांत इतका फरक पडला आहे कीं, डार्विनिझम् हें आज प्राणिशास्त्रांत अमान्य असें मत आहे. सत्कार्यवाद जाऊन त्याऐवजीं Creative Evolution मान्य होऊं पहात आहे. उपादान कारणांत न आढळून आलेले नवीन

नवीन गुण कार्यांत उत्पन्न झालेले दिसतात यावरून बर्गसॉन् Creative Evolution व लॉईड मॉर्गन् Emergent Evolution मानूं लागले आहेत. हीं मतें नैय्यायिकांच्या आरंभवादासारखींच आहेत. बर्गसॉन् हे विकास पावणारे जडवस्तु व मन या दोहोंचें मूळ Elan Vital म्हणून मानतात. लॉइड मॉर्गन् त्याला ईश्वर म्हणावयास तयार आहे. वेस्टवे म्हणतो:—

"In which matter leads to life, life to consciousness, and consciousness ultimately to a social existence, in which lofty moral ideas link, we seem to discern the purpose of the whole. The design of man, there seems to be a revelation of man's responsibility to some supreme authority. Thus, we come to have an instructive feeling that all existing things were produced by an intelligent Being for the end which they fulfil, and that no evolution was possible without a pre-existent First Cause. A Deity may have existed eternally; and at some point in past time have initiated the process of the Universe we know. If nothing has existed eternally, nothing can have come into being. But if something has existed eternally, that something may at some point have caused the existence of our Universe."

—Science and Theology, Page 357.

ही 'चैतन्यस्वरूप शक्ति' आहे असें व्हॉन, ड्रीश म्हणतो. पॅटन-सारखे लोक तर या विकासांत रचना दिसते असें म्हणूं लागले आहेत.

तात्पर्य, ज्या भौतिक शास्त्रांच्या शाखांवर भौतिक विज्ञानाची उभारणी तीं शास्त्रेंच आतां चिदाची व अद्वैताची भाषा बोलूं लागलीं आहेत. यापलीकडे भौतिक विज्ञानवादाचें आणखी खंडन काय पाहिजे?

वेस्टवे म्हणतो:—"And yet the vast majority of men, including men of science, are nowadays sincere theists by conviction, though more often than not." —Ibid, preface, Page vii

"...If we want to explain our conceptions of the the Real, the True, the Beautiful, or the Good. in each case alike, we are inevitably driven to the conclusion that without an intelligent First Cause as a Beginning or a Foundation, the whole of our scheme must dissolve and leave not a rack behind." —Ibid

दृश्य जगापलीकडे अदृश्य सृष्टि आहे, दृश्यसृष्टीच्या द्वारा एकच शक्ति आपलें स्वरूप प्रकट करीत आहे, विकासांत रचनाचातुर्य दिसते, व त्यास आदिकारण कोणी असावें असें भौतिकशास्त्रज्ञच म्हणूं लागले आहेत. यावरून वारा कोणच्या दिशेनें वाहत आहे हें सूज्ञ वाचकांस सहज कळून येईल.

(५) नुसती जड प्रकृति जगताचें कारण होऊं शकत नाहीं ही गोष्ट शंकराचार्यांनीं आपल्या सूत्रभाष्यांत (अ. २ पाद २) फार पूर्वींच सुंदर रीतीनें स्पष्ट केली आहे. चेतन पुरुषांचें नुसतें सान्निध्य मानून काम भागत नाहीं. त्याची सत्ता मानणें अवश्य आहे हें सांख्य शास्त्राचा विचार करणाऱ्यास सहज कळणारें आहे.

पदार्थ विज्ञानवादाविरुद्ध आणखी दोन तीन प्रमाणें देऊन हें लांबलेलें प्रकरण आटपूं.

(६) नुसती जड वस्तु मानून जीवनांत आपल्याला जें वैचित्र्य दिसतें, जी कल्पकता दिसते, जी परिस्थिति–विरुद्ध मात करण्याची आकांक्षा व जें बल दिसतें, त्याची योग्य उपपत्ति लागत नाहीं. शरीरांतील एखादा अवयव निर्बल झाला अथवा तुटला तर त्याचें काम जीव दुसऱ्या इंद्रियांकडून करून घेतो. ही शक्ति काय जडांत असणार! जर सर्वच वस्तु जड परमाणूंच्या बनलेल्या तर आपण जो वेगवेगळ्या वस्तूंच्या मूल्यांत फरक करतो, त्याला आधारच राहणार नाहीं. उदाहरणार्थ, कालिदास, शेक्स्पीअर सारखे जगमान्य कवि व ट ला ट, हिंगणबेट करणारा एखादा कवि, शंकराचार्य, ज्ञानेश्वरमहाराज यांच्यासारखे तत्त्ववेत्ते आणि वेडे व पागल यांच्यांतील फरक काय? फक्त मेंदूमधल्या खवल्यांच्या संख्येंतच ना? एकापेक्षां दुसऱ्याच्या परमाणूंची रचना वेगळी व संख्या कमी या उत्तरानें मनुष्याचें समाधान होणार नाहीं.

(७) विज्ञान ईश्वराच्या अस्तित्वाविरुद्ध आहे असें म्हणणारे लोक विसरतात कीं, अर्वाचीन विज्ञान हें पदार्थविज्ञान आहे. सदाचार, सामाजिक रचना, धर्म, अध्यात्म हे पदार्थविज्ञानाचे विषय नाहींत. 'सत्यं शिवं सुंदरम्' हे पदार्थविज्ञानाच्या कक्षेंत पडत नाहींत. येशु ख्रिस्त हा क्रॉसवर कां गेला? चाफेकर गीता म्हणत फांशीं कां गेले? शिवाजी महाराज 'धर्माकरतां मरूं' असें कां म्हणत? घरीं खावयास नसतांना, तुकारामबोवा घरीं चालून आलेलें द्रव्य कां लोटून देत? याचा उलगडा भौतिकविज्ञानवादानें होणार नाहीं. हें स्वतंत्रच जगत् आहे व त्याकरितां वेगळेंच शास्त्र पाहिजे.

भौतिकविज्ञानवादाविरुद्ध प्रमाणें देतांना बरीचशीं पानें व्यापलीं. पण त्याचें कारण त्याची आपल्याकडील बाजारांत असलेली किंमत हें होय. भौतिकशास्त्रांची आपल्या देशांत वाढ करणें अत्यंत अवश्य

आहे. जगाचा विचार करूं लागलें असतां, भौतिकशास्त्रांना गाळून विचार करतां येणें शक्य नाहीं. पण याचा अर्थ भौतिकशास्त्रें जडापलिकडे कांहीं सांगत नाहींत, त्यांनीं इतके शोध केले आहेत कीं, आतां विश्वाचें कोडें उकलण्यास ईश्वराची गरजच नाहीं वगैरे प्रकारची भाषा जी बोलली जाते ती खरी आहे असें नव्हे. भौतिकशास्त्रांचे निष्कर्ष ईश्वराच्या अस्तित्वाच्या आड येतात कां उलट त्यांचा कल त्याचे अस्तित्व मानण्याकडे आहे हें वर जी चर्चा केली आहे त्यावरून स्पष्ट कळून येईल.

भौतिकशास्त्रें व ईश्वर यांत तंटा नाहीं. तीं ईश्वर शोधायला जातच नाहींत. आपआपल्या क्षेत्रांत त्यांची किंमत श्रेष्ठच आहे. ईश्वराचा शोध करण्यास म्हणून प्रवृत्त न होतां सुद्धां त्यांनीं जी विश्वरचना सांगितली ती ईश्वराकडेच येऊन पोंहोंचतें ही महत्वाची गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

# धर्म व ईश्वर : : : ११

मनुष्य निर्माण झाल्यानंतर जेव्हां तो त्याच्यासमोर पसरलेल्या विश्वाचा विचार करूं लागला त्यावेळीं त्याला सुचलेल्या दोन गोष्टी धर्म व ईश्वर एकमेकांशीं अत्यंत निगडित झाल्या आहेत असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. हाताच्या बोटांवर मोजण्याइतके ईश्वर न मानणारे सोडून दिले तर बाकीचे शेंकडा नव्याण्णवपेक्षां अधिक लोक ईश्वर मानणारे असेच आढळून येतात. तसेच कांहीं धर्म न मानणारे सोडून दिले तर बाकीचे बहुतेक लोक कोणत्या ना कोणत्या प्रकारचा तरी धर्म मानतातच मानतात. कित्येक धर्म ऐहिक सुखाचा—अभ्युदयाचा—विचार करतात किंवा नाहीं याबद्दल मतभेद असेल. पण पारलौकिक हिताचा विचार करणार नाहीं असा धर्मच नाहीं असें म्हटलें तरी चालेल. तेव्हां मनुष्याच्या पारलौकिक हिताचा प्रामुख्यानें विचार करणारा धर्म व जगताच्या बुडाशीं अचिन्त्यशक्ति स्वरूपानें असणारा ईश्वर यांचा निकट संबंध असावा, धर्माच्या चर्चेत ईश्वराचा उल्लेख यावा हें अगदीं स्वाभाविक आहे. व म्हणूनच या विभागांत धर्म व ईश्वर यांचे सामान्यतः संबंध सांगून पृथ्वीच्या पाठीवर आज जिवंत असणारे जे चार प्रमुख धर्म आहेत, त्यांनीं मानलेल्या ईश्वराच्या स्वरूपाचें थोडक्यांत दिग्दर्शन करण्याचें योजिलें आहे.

जसें ईश्वराचें अस्तित्व मान्य करणें जितकें सोपें आहे, तितकेंच त्याची सर्वांना पटेल अशी व्याख्या सांगणें कठीण आहे. धर्मासंबंधीं-सुद्धा जवळ जवळ तसेंच आहे. ईश्वराची चालचलाऊ व्याख्या मागें दिलेलीच आहे. तिचा पुनः उल्लेख करून पुढें जाऊं. सर्व शक्तिमान्,

सर्वज्ञ, जगत्कारण सर्व श्रेष्ठ असा पुरुष अथवा शक्ति ही ईश्वराची सामान्य व्याख्या होय.

धर्माची व्याख्या वेगवेगळ्या लोकांनीं वेगवेगळ्या प्रकारांनीं केली आहे. कोणी 'धारणात् धर्ममित्याहुः' अशी त्याची व्युत्पत्ति सांगून 'समाज धारण करणारा तो धर्म' अशी त्याची व्याख्या करतात. 'यतो ऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः' म्हणजे ज्याच्यापासून ऐहिक सुखलाभ व पारलौकिक हित प्राप्त होतें तो धर्म अशीं त्याची कित्येक व्याख्या करतात. पूर्व मीमांसा दर्शनाचे उत्पादक जैमिनि 'चोदना लक्षणाऽर्थो धर्मः' म्हणजे, वेदांनीं विहित म्हणजे पुरुषांस करणीय म्हणून सांगितलेलीं कर्में तोच धर्म अशी धर्माची व्याख्या करतात.

धर्म या शब्दाची व्याख्या देण्याचा असला प्रयत्न न करतां वेगवेगळ्या धर्मांचा अभ्यास केला असतां धर्मांत कोणकोणत्या गोष्टींचा लोक अंतर्भाव करतात तें वाचकांच्या समोर आम्ही मांडतों, म्हणजे आपोआपच धर्माचें सामान्य स्वरूप त्यांच्या लक्षांत येईल. कोणताहि धर्म म्हटला म्हणजे त्यांत आपणांस चार भाग दिसून येतातः—(१) आध्यात्मिक अनुभव (२) तत्त्वज्ञान (३) आचार व (४) इतिहास. अमेरिकन् मानसशास्त्रज्ञ वुइल्यम् जेम्स् यांनीं आपल्या The Varieties of Religious Experience या पुस्तकामध्यें धर्माचे संस्थात्मक धर्म (Institutional Religion) व व्यक्तिगत धर्म (Personal Religion) असे जे विभाग केले आहेत, त्यांच्याच जवळ जवळ येणारे आम्ही दिलेले हे चार विभाग आहेत. धर्माचें खरें अंतरंग, जिवंत स्वरूप पहिल्या दोन विभागांत म्हणजे आध्यात्मिक अनुभव व तत्त्वज्ञानांत आढळून येतें. त्याला सोयिस्कर, योग्य, अंतरंग विभागाचा हेतु

साध्य करण्याकरितां सांगितलेला जो आचार भाग हा धर्माचें बाह्यांग होय. हा कुडीसारखा आहे. आणि म्हणूनच धर्माचा विचार करतांना आपल्या मननीय पुस्तकांत वुइल्यम् जेम्स् यांनीं पहिल्या विभागावरच जोर देऊन त्याची छाननी केली आहे. पहिल्या दोहोंच्या परस्पर-संबंधांचा थोडा विचार करणें अवश्य आहे. कारण या चर्चेनें आपला मुख्य मुद्दा जो धर्म व ईश्वर यांचा संबंध त्यावर चांगला प्रकाश पडणार आहे.

आम्ही धर्माचें अंतरंग स्वरूप म्हणून ज्यास म्हटलें तो प्रत्येक मनुष्यास येणारा आध्यात्मिक अनुभव हा धर्माचा पाया आहे. याच्या-वरच सर्व धर्म उभारलेले आहेत. आपणांस प्राप्त झालेला अनुभव टिकावा, शास्त्रीय भाषेंत बोलावयाचें म्हणजे त्या अनुभवाचें क्षेम व्हावें, अथवा आपणांस मिळालेला अनुभव इतरांना मिळावा, एतदर्थ सांगि-तलेली क्रिया हा धर्मांतील आचार भाग होय. अर्थातच या आचार भागांत ऐक्य आपणांस आढळून येणें कठीण आहे. आपणांस प्रार्थनेनें अथवा ध्यानानें ईश्वराचा साक्षात्कार झाला असें जाणून आपणांस निवांत प्रार्थना करण्यास अथवा ध्यान करण्यास मनुष्य प्रार्थनामंदिर अथवा देवालय उभारतो. आपल्या घरच्या कटकटी, त्रास यांपासून दूर होऊन निवांत ईशचिंतन करतां येईल म्हणून लोकहि आपलीं घरेंदारें सोडून तेथें येतात. अशा रीतीनें प्रार्थनामंदिर व त्यांतील सामुदायिक प्रार्थना यांचा उगम सांगतां येण्यासारखा आहे. अर्थातच अशीं प्रार्थना मंदिरें सर्व एकाच सारखीं असणें संभवनीय नाहीं. येवढेंच नव्हे तर प्रार्थनेकरितां प्रत्येकास प्रार्थना मंदिरांत जाऊनच प्रार्थना केली पाहिजे असेंहि नाहीं. पण ज्यांचा अंतरंगांत प्रवेश नाहीं, जे स्वतंत्र रीतीनें देवाला हांक मारण्याइतके प्रौढ नाहींत, त्यांना प्रार्थना मंदिरांत जाऊन धडा घेणें अवश्य आहे. पण हें तारतम्य लक्षांत न

घेऊन कित्येक लोक ह्या बाह्य गोष्टींसच इतकें महत्त्व देतात कीं, जर एखादा ठराविक आचार पाळीत नसला तर त्याला लगेच लोक नास्तिक म्हणून ठरवतात. खरें सांगावयाचें तर हा बाह्य भाग आहे. कारण याचा दुरुपयोग करणें शक्य आहे, आणि तो सर्वांनाच सारखा आवश्यकहि नाहीं. कित्येक प्रार्थना मंदिरांच्याकडे, मठांच्याकडे, देवालयांच्याकडे पाहून, ' प्रार्थना मंदिराच्या जो अधिक जवळ तो ईश्वरापासून तितका अधिक दूर' ( Nearer the Church, farther from God ') या म्हणीचा प्रत्यय येतो. शेताच्या रक्षणाकरितां लावलेल्या कुंपणानेंच शेत खावें असाच थोडासा हा प्रसंग आहे.

सर्वच मठ, मंदिरांचा असा दुरुपयोग होतो असें म्हणण्याचा अर्थातच आमचा हेतु नाहीं हें वाचकांना सांगावयास नको. इतकें जें वर वर्णन केलें त्याचा हेतु येवढाच, कीं प्रार्थना मंदिरांतील उपासना, मठांतील कर्तव्यें इत्यादि हा आचार भाग बहिरंगाचा आहे.

पण हें या आचार भागाचें बहिरंगत्व लक्षांत न आल्यानें त्याला नसतें महत्त्व प्राप्त झालें व धर्माच्या नांवावर रणें माजूं लागलीं. गंध आडवें लावावें कां उभें, ऋग्वेदियांनीं पहिल्यांदा म्हणावें कां आपस्तंबानें, माळ एकशें आठ मण्यांची कां शंभर,टिळे बारा लावावेत कां चौदा, असल्या क्षुल्लक गोष्टींकरितां नवे नवे पंथ निर्माण होऊं लागले; आणि एकमेकांत तंटे वाढून समाजधारणेच्या ऐवजीं समाजाची शक्ति क्षीण होऊं लागली.

धर्माचें हृदय अथवा प्राण म्हणजे आध्यात्मिक अनुभव व त्याच्याशीं युक्त असें उभारलेलें तत्त्वज्ञान. मनुष्यास कांहीं अतींद्रिय अनुभव आला व त्याची बुद्धि प्रगल्भ असली, कीं तो स्वाभाविकच जगताचें कोडें उलगडण्याचा प्रयत्न करीत असतां आपणांस प्राप्त झालेल्या अनुभवाचा उपयोग करतोच. एखादा भौतिक शास्त्रज्ञ आहे अशी

आपण कल्पना करूं. आतां तो जर हें जगताचें कोडें उलगडण्याचा प्रयत्न करूं लागला तर आपलें भौतिकशास्त्रांतील ज्ञान विसरून तें कोडें उलगडील असें होईल काय? मागें सांगितल्याप्रमाणें मनुष्याच्या मनांत कांहीं एकमेकांशीं विलग्न असे कप्पे नाहींत. तेव्हां भौतिक शास्त्रज्ञ हा जगताच्या बुडाशीं सद्वस्तु आहे हें पाहण्याचा प्रयत्न करीत असतां जसा आपल्या ज्ञानाचा उपयोग करतो तसाच आध्यात्मिक अनुभव ज्याला प्राप्त झाला आहे तो त्या आध्यात्मिक अनुभवाचा उपयोग करतो व तर्काच्या साहाय्यानें अनंतास जाणण्याचा प्रयत्न करतो. या तत्त्वज्ञानांत तार्किक बुद्धीचा बराचसा भाग असल्यानें येथें सुद्धां मतभिन्नतेस व वादविवादास पुष्कळ वाव आहे.

धर्माचा खरा सोलीव भाग म्हणजे आध्यात्मिक अनुभव होय. आणि ईश्वराचा व ह्याचाच खरा व निकट असा संबंध आहे. किंबहुना **ईश्वराचें दर्शन होऊन त्याचें तेज, त्याची शक्ति, त्याचा आनंद यांचे अंशभागी होण्याकरितां केलेला जो जो प्रयत्न, त्यासच खरोखरी 'धर्म' असें म्हणतां येईल.** समाजधारणेकरितां केला जाणारा जो आचार तो धर्म हा मुख्यतः समाजशास्त्राचा विषय होईल.

ईश्वराकडे नेणारा यथार्थ असा मार्ग समाजाच्या हिताविरुद्ध असणेंच शक्य नाहीं. कारण ईश्वर जगताचें अधिष्ठान आहे. व त्याचें ज्ञान हें जगत्‌नाशास कारणीभूत होणें असंभवनीय आहे. खरा धार्मिक अथवा ईश्वरविषयक अनुभव हा बुद्धीचें तेज वाढविणारा, आनंददायक असा असल्यानें त्यानें मनुष्य गाफील, दुबळा, आळशी व कर्तृत्वहीन होणेंच शक्य नाहीं.

धर्मांत क्रियाशून्यत्व शिरलें, आणि विशिष्ट प्रकारचा आचार म्हणजे धर्म असें त्याला लोखंडी चौकटीसारखें रूप आलें व त्या आचाराबद्दल रणें माजूं लागलीं म्हणून धर्म हा टीकेस पात्र झाला. येरवीं धर्म म्हणजे आपलें संपूर्ण जीवित ईश्वरमय करणें होय.

ईश्वराचा व धर्माच्या अंतरंगाचा असा निकट संबंध असल्यानें खुद्द ईश्वरालाच 'धर्म,' 'धर्मज्ञ' अशीं पदें लावलेलीं आपणांस आढळून येतात. तात्पर्य, धर्म आणि तो ईश्वर नांवाची जगतास 'आधार व प्रकाश' देणारी वस्तु मानीतच नाहीं हें असंभवनीय आहे. मानवी बुद्धि या सत्‌चित् तत्त्वाचा विचार करीत असल्यानें त्याचीं वेगवेगळीं अंगें वेगवेगळ्या तपस्व्यांना दिसलीं व त्यांनीं वेगवेगळें त्याचें वर्णन केलें हें अगदीं संभवनीयच नव्हे, तर अपरिहार्य आहे. आणि म्हणूनच जगांत वेगवेगळे धर्म व धर्मपंथ उदयास आले व ते वेगवेगळ्या लोकांना आज जीवन देत आहेत.

आतां थोडक्यांत तूर्त जिवंत असणारे जे चार पांच प्रमुख धर्म आहेत, त्यांची ईश्वरासंबंधींची कल्पना काय आहे हें सांगून, हें प्रकरण आटपूं.त्यांचीं मतें सांगण्यापूर्वी दोन गोष्टी सांगणें अवश्य आहे. त्यांत प्रमुख म्हणजे वैदिक(हिंदु)धर्म,बुद्ध धर्म,ख्रिश्चन् धर्म, मुसलमान धर्म व अनुयायी थोडे पण जुना असा पारशी धर्म. या धर्मांचा विचार करूं लागलों असतां आपणांस जी एक महत्त्वाची गोष्ट आढळून येते ती ही कीं, यापैकीं एक पहिला वैदिकधर्म सोडून दिला तर बाकीचे एकेका प्रेषिताच्या अनुभवावर रचलेले धर्म आहेत. व म्हणून त्यांना पौरुषेय ( Personalistic ) म्हणतां येईल. अनंताचा एका व्यक्तीस जो अनुभव आला, त्यावर उभारलेले हे धर्म आहेत व म्हणूनच ते एका व्यक्तीच्या शब्दालाच प्रमाण मानतात व इतरांचे अनुभव व मतें यांविषयीं असहिष्णु असतात. वैदिकधर्म हा एका

व्यक्तीच्या अनुभवावर आधारलेला नाहीं. मंत्रद्रष्ट्या ऋषींना प्राप्त झालेल्या अनुभवांवर वैदिक धर्माची उभारणी झालेली आहे. यामुळें तो कोणत्याहि एकाच व्यक्तीला देवाचा एकमेव प्रेषित म्हणायला तयार नाहीं. म्हणूनच तो अपौरुषेय *(Impersonalistic) आहे. व यामुळेंच तो परमसहिष्णु आहे.

या प्रकरणांत बुद्ध धर्मास सोडून बाकींच्या चौघांचे ईश्वरविषयक विचार दिलेले आहेत. कारण, एक तर बौद्ध धर्माचा विचार मागें येऊन गेला आहे व मुख्यतः त्या धर्माचा ईश्वर न मानण्याकडेच कल आहे.

## वैदिक धर्म (हिंदुधर्म):—

वैदिक धर्मांतील ईश्वराची कल्पना सांगण्यापूर्वीं आम्ही वैदिक ( हिंदु ) असा जो प्रयोग केला आहे, त्याचें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे. या बाबतींत एक गोष्ट प्रथम लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, जुन्या—वेद, पुराणें, गीता, स्मृति इत्यादि—धर्मग्रंथांतून 'हिंदुधर्म' असा शब्दप्रयोग आपणांस मुळींच आढळून येत नाहीं. हिंदु या नांवाचें मूळ पाहतां असें आढळून येतें कीं, आर्यावर्ताबाहेरील लोकांनीं आर्यावर्तांत राहणाऱ्या लोकांना तें नांव दिलें. यामुळें 'हिंदु' या शब्दांतून ज्यांना हा शब्द लावला त्यांच्या धर्माचा कांहींहि उल्लेख होत नाहीं. हें नांव व्यवहारांतील नडीकरितां उत्पन्न झालेलें आहे, धर्माचें लक्षण दाखविण्याकरितां नव्हे. यामुळें हिंदु या शब्दाची धार्मिकदृष्ट्या व्याख्या करणें कठीण आहे. या शब्दप्रयोगासारखें अगदीं अर्वाचीन काळांतील उदाहरण द्यावयाचें म्हणजे

---

* आपल्याकडील मीमांसक वगैरे ज्या अर्थानें वेद हा अपौरुषेय मानतात, त्या अर्थानें हा शब्द उपयोगांत आणला नाहीं हें सूज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच.

इंग्रज सरकारनें कांहीं वर्षापूर्वी उपयोगांत आणलेला 'अब्राह्मण' अथवा 'ब्राह्मणेतर' हा शब्द. या शब्दाचा अर्थ 'ब्राह्मण नाहीं तो'; पण त्यामुळें अमुक एकाच जातीचा उल्लेख होईल असें तर्कदृष्ट्या म्हणतां येणार नाहीं. त्यांतून व्यवहारापयोगी अर्थनिष्पत्ति करण्याकरितां इंग्रज सरकारनें जो हेतु मनांत धरून हा शब्दप्रयोग केला त्याचें ज्ञान होणें अवश्य आहे; तें झाल्यावरच ब्राह्मणेतरांत कोणत्या जातींचा अंतर्भाव करावयाचा हें ठरवितां येईल.

हिंदुधर्म या शब्दाचेंहि तसेंच आहे. एका परकीय विधर्मी राजसत्तेखालीं दडपले गेल्यामुळें वैदिक संस्कृतीचे लोक 'हिंदु' या नांवाखालीं एकत्र येऊं लागले.हिंदुस्थान या आपल्या भूमीच्या नांवाशीं त्याचा निकट संबंध म्हणून राष्ट्रप्रेमी माणसें हिंदु या शब्दाला चिकटून बसलीं. कारण त्या शब्दानें ज्याला ज्याला ही आर्यभूमि आपली मातृभूमि वाटते त्याचा संग्रह केला जाईल. अशारीतीनें व्यवहारांत हा शब्द उपयोगी आहे. पण धर्माचा निदर्शक होण्यास तो कसा कोता आहे हें त्या शब्दाच्या व्याख्या करण्याचे जे वेगवेगळे अयशस्वी प्रयत्न झाले आहेत, त्यांवरूनच कळून येईल.

मुळांत खरें नांव म्हणजे आर्यधर्म अथवा वैदिक धर्म. आर्यांचा धर्म म्हणून आर्य धर्म; आणि वेदप्रमाण मानणाऱ्या लोकांचा धर्म म्हणून वैदिक धर्म.

( १ ) ह्या धर्माचे मूळ ग्रंथ वेद. वेद हा शब्द, त्यांचे द्रष्टे त्यांना लावलेला 'ऋषि' हा शब्द व त्यांनीं सांगितलेल्या अनुभवांवरून तयार झालेल्या शास्त्रांना लावलेला 'दर्शन' हा शब्द या सर्वांवरून एकच कल्पना प्रामुख्यानें डोळ्यांसमोर येते कीं, या धर्मात अपरोक्ष साक्षात्कार, अनुभवजन्य ज्ञान यांसच महत्त्व दिलेलें आहे. आणि धर्म या शब्दाचा हाच खरा अर्थ आहे. वेद म्हणजे ऋषींनीं

आपली तर्ककर्कश बुद्धि चालवून काढलेलीं ‘ अप्रतिष्ठित ’ ठरण्याचा संभव सदा असणारीं, अनुमानें नव्हत. मिठाची बाहुली समुद्रांत ठाव पाहण्याकरितां गेली असतां, तिची जशी स्थिति व्हावी तशी ईश्वरानुभवांत ज्यांची स्थिति झाली अशा महानुभावीयांनीं कथन केलेले जे अपरोक्ष अनुभव तेच वेद आहेत. आणि तेच या धर्माचे आधारस्तंभ होत. म्हणून हा धर्म कोणाहि एकाच व्यक्तीच्या बुद्धीला मानत नाहीं; अनुभवाला मान देतो. हे अनुभव यांत ग्रथित आहेत म्हणून यांना अपौरुषेय म्हणतात. वेगवेगळे दर्शनकार वेगवेगळ्या अर्थानें अपौरुषेय या शब्दाचा उपयोग करतात. पण प्रस्तुत स्थळीं त्या अर्थांची चर्चा करण्याचें प्रयोजन नाहीं.

( २ ) वैदिक धर्माचे मूळ ग्रंथ जे वेद यांत इन्द्र, अग्नि, वरुणादिक अनेक देवतांचीं वर्णनें व उपासना आहेत. पण त्याच ग्रंथांत ‘ ईश्वर एकच आहे ’ हें तत्त्व सांगणाऱ्या ऋचाहि आहेत. ‘ एकं सन्तं बहुधा कल्पयन्ति ’ ‘ एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति ’

( ३ ) हल्लीं जे पृथ्वीच्या पाठीवर देव मानणारे ख्रिश्चन्, मुसलमान, शीख इत्यादि धर्म आहेत ते सर्व एकेश्वरी आहेत. वैदिक धर्म हाहि ईश्वर एकच आहे असें मानणारा आहे.

ख्रिश्चन, मुसलमान वगैरे धर्मांचे जे धर्मग्रंथ आहेत त्यापेक्षां वेदांचें वैशिष्ट्य असें आहे कीं वेद हे ‘ईश्वर एक आहे’ येथेंच थांबले नाहींत. ते जगत्कर्त्या ईश्वराच्या पलीकडे सर्वव्यापक अनंत ब्रह्म आहे अशा कल्पनेपर्यंत पोचलेले आहेत. त्यांत पुरुषसूक्तासारखीं सूत्रें आहेत कीं ज्यांत ‘पुरुष एव इदं सर्वम्’ असें स्पष्ट म्हटलें आहे.

( ४ ) हा धर्म ईश्वर निर्गुण, निराकार आहे, तसाच सगुण साकारहि आहे असें मानतो. त्याचें वाणीच्या पलीकडे ‘ यतो वाचो निवर्तन्तते अप्राप्य मनसा सह ’ असें ‘ नेति नेति ’ या शब्दांत

वर्णन आढळतें. तसेंच 'अग्निर्मूर्धा चक्षुषी चंद्रसूर्यौ दिशः श्रोत्रे वाग्विवृताश्च वेदाः' या शब्दांतहि वर्णन आढळतें. 'ईशावास्यमिदं सर्वम्' असें हा धर्म मानतो. ईश्वर सर्व प्राण्यांच्या आंत आहे, अंतर्यामीं आहे, येवढेंच नव्हे, तर प्रत्येक जीवाचें खास स्वरूप आहे असें तो मानतो.

( ५ ) सगुण, निर्गुण, सविशेष निर्विशेष हा दृष्टिकोनांतील भेदाचा परिणाम आहे. येरवीं दोन्ही एकच आहेत असें हा धर्म समजतो. 'थिजावें कीं विघुरावें। हें अप्रयोजक आघवें। घृतपण नोहे अनारिसें॥' या दृष्टान्ताप्रमाणेंच सगुण निर्गुण हा पाहणाऱ्यांच्या दृष्टीचा परिणाम आहे. दोन्ही रूपानें ईश्वर एकच आहे.

( ६ ) असा हा या धर्माचा सिद्धान्त असल्यानें ईश्वरप्राप्तीच्या मार्गाविषयींसुद्धां हा धर्म सर्वसंग्राहक आहे. जसा ज्याचा अधिकार असेल तसा त्यानें कर्म, उपासना, ज्ञान यांपैकीं कोणत्याहि पायरी-वरून आरंभ करावा; पण ईश्वराच्या साक्षात्काराकरितां मुख्य गोष्ट म्हणजे साधकाच्या ठिकाणीं तळमळ म्हणजे ईश्वराविषयीं जिव्हाळ्याचें प्रेम पाहिजे. ती नसेल, तर कोणत्याहि साधनाचा आचार हा नुसता देखावा आहे. खरी कळकळ असेल तर कर्माच्या योगानें हलकें हलकें अंतःकरण शुद्ध होऊन साधकाकडून योग्य अशी धारणा-ध्यानरूप उपासना होईल. यांपैकीं कोणी कोठें आरंभ करावयाचा हें ज्याच्या त्याच्या अधिकारावर अवलंबून आहे. ईश्वरप्राप्तीच्या बाबतींत 'सकळांसी येथें आहे अधिकार' असें या धर्माचें मत आहे.

( ७ ) सर्व व्यापक, निराकार, असा एकच देव मानूनहि या धर्मानें देवदर्शन घेऊं इच्छिणाऱ्या लोकांच्या कुवतीकडे पाहून त्याची प्रतीकद्वारा उपासना करण्याची मोकळीक ठेवली आहे. यामुळें

हा धर्म अनेक देवता मानणारा, वाईट अर्थानें मूर्तिपूजक, आहे असें अजूनहि विदेशी लोकांना वाटत असतें.

(८) या धर्मांत मूर्तिपूजा जी सांगितली आहे तिचा खरा अर्थ न समजल्यामुळें व कित्येक ठिकाणीं तिचा अतिरेक दृष्टोत्पत्तीस आल्यानें या धर्माबाहेरचे लोक याची निंदा करतांना 'मूर्तिपूजक' म्हणून या धर्माला नांवें ठेवतात यांत आश्चर्य नाहीं. कारण, याच धर्मांतील प्रार्थनासमाजिस्ट, ब्राह्मो इत्यादि जरा पुढारलेले लोक या मूर्तिपूजेविरुद्ध बोलतांना आपणांस दिसतात. मूर्तिपूजा ही प्रतीकोपासना आहे हें ज्या ग्रंथांतून ती सांगितली त्यांत स्पष्ट लिहिलें आहे. उपासक ज्या वेळीं मूर्तीची उपासना करतो त्या वेळीं तो ज्या मातीची अथवा दगडाची मूर्ति बनवली असेल त्या मातीची अथवा दगडाची उपासना करीत नाहीं. तो ती मूर्ति ज्या सत्तेचें व प्रकाशाचें ती प्रतीक आहे त्या सत्तेची, प्रकाशाची उपासना करीत असतो. उपासनेचा अर्थ अल्पावर महदाची भावना हा होय. उदाहरणार्थ, राजेसाहेबांच्या जन्मदिवशीं राजेसाहेबांच्या फोटोला हार घालतात, त्याची मिरवणूक काढतात. त्या वेळीं जर एखाद्यानें म्हटलें कीं, "अहो, या निर्जीव कागदावर टाकलेल्या रंगांच्या ठिपक्यांत व सजीव राजेसाहेबांत कांहीं साम्य आहे काय? तेव्हां उगीच या ठिपक्यांना हार कां घालतां?" त्याचें उत्तर जर असा प्रचार केला तर काय मिळेल हें न सांगतां समजण्यासारखें आहे. त्याचें तात्त्विक उत्तर असें आहे कीं, आम्ही विलायतेंत जाऊन बादशहांना भेटूं शकत नाहीं, त्यांचे येथील प्रतिनिधि व्हाइसरॉय त्यांनाहि भेटूं शकत नाहीं; पण आम्हांला त्यांच्या सत्तेसंबंधानें आदर तर दाखविणें आहे, म्हणून हा उपाय आम्ही करतों. मूर्तिपूजेचेंहि तसेंच आहे. ईश्वराची सत्ता अमूर्त आहे. त्याच्यावर मनाची धारणा करणें कठीण आहे;

येवढ्याकरितां मन स्थिर होईल असें प्रतीक उपयोगांत आणून आम्ही त्या सत्तेची उपासना करीत आहोंत. ‘ उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणोरूपकल्पना ’ असें जाणून उपासना करणें हें त्याज्य तर नव्हेच, पण ज्याची बुद्धि विकासास पावली नाहीं, अशा किती तरी सश्रद्ध लोकांना ही उपासना उपकारी आहे.

या मूर्तिपूजेंतील तत्त्व तुकारामबोवा खालील अभंगांतून फारच सुंदर रीतीनें सांगतात.

केला मातीचा पशुपति। परि मातीसी काय महती॥ शिवपूजा शिवासी पावे। माती मातीमाजीं सामावे॥ १॥ केला पाषाणाचा विष्णु। परि पाषाण नव्हे विष्णु। विष्णुपूजा विष्णूसि समर्पे। पाषाण राहे पाषाणरूपें॥ ३॥ केली कांशाची जगदंबा। परि कांसें नव्हे अंबा॥ पूजा अंबेची अंबेला घेणें। कांसें राहे कांसेंपणें॥ ४॥

* * *

अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव। प्रतिमा तो देव कैसा नव्हे॥ १॥

वर्म न कळतां, संकोचित भावानें, देव म्हणजे पाषाणप्रतिमा येवढेंच समजून देवाचा संकोच करून जर प्रतिमापूजन केलें जाईल तर प्रतिमापूजेचा इष्ट तो परिणाम दिसून येणार नाहीं. येरवीं ही उपासना अंतःकरणाला स्थिरता व शांति देणारी आहे.

योग्य प्रकारानें केल्यास मूर्तिपूजा वाईट नाहीं तर उपकारी आहे याचा पुरावा हवा असल्यास नामदेव तुकारामबोवा इत्यादि महाराष्ट्रीय साधूंचीं चरित्रें अथवा रामकृष्ण परमहंसांचें चरित्र वाचा. तुकारामबोवा हे इहलोक सोडीपर्यंत भक्तकामकल्पद्रुम पंढरीश श्रीपांडुरंगाची वारी इत्यादि प्रकारें उपासना करीत होते. अगदीं अलिकडच्या काळांत या पूजेंत काय सामर्थ्य आहे हें रामकृष्णपरमहंसानीं दक्षिणेश्वरीं राहून कालीमातेच्या उपासनेनें करून घेतलेल्या

साक्षात्कारावरून स्पष्ट होणारें आहे. अंगावर पांखरें बसण्याइतका सर्व ठिकाणीं परमात्मा भरलेला आहे असा अनुभव प्राप्त झाल्यावर हि तुकारामबोवा पंढरीश श्रीपांडुरंगाचें भजन पूजन करीतच. मीच परमात्मा आहें असा अनुभव प्राप्त झाल्यानंतरहि रामकृष्णपरमहंस कालीची उपासना करीत, एवढेंच नव्हे तर विवेकानंदासारख्यांना 'कालीच्या मूर्तीसमोर जाऊन बस व तुला काय मागावयाचें तें माग' असें सांगत, हें लक्षांत घेतल्यास मूर्तिपूजेविरुद्ध लिहिण्यापूर्वी मनुष्यानें किती विचार करावयास पाहिजे हें सूज्ञ वाचकांस सांगावयास नको.

( ९ ) या धर्मांत सूर्य, शक्ति,विष्णु,शिव,गणपति,इत्यादि देवता ज्यांत मुख्य उपास्य आहेत असे सौर, शाक्त, वैष्णव, शैव, गाणपत्य असे वेगवेगळे पंथ आहेत. यांतील अडाणी, भेदबुद्धीनें पाहणारा वर्ग सोडून दिला व मूळ ग्रंथाकडे पाहिलें तर हें पंथ ' एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ' या वेदवचनाचाच विस्तार आहे असें आढळून येईल. आपण जर सूर्य, शक्ति, विष्णु, शिव, गणपति यांचीं वर्णनें करणारे ग्रंथ आहेत ते पाहिले तर प्रत्येकासंबंधानें ' त्वमेव प्रत्यक्षं ब्रह्माऽसि । त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोऽसि । सर्वं जगदिदं त्वत्तो जायते । सर्वं जगदिदं त्वयि तिष्ठति । सर्वं जगदिदं त्वयि प्रत्येति । सर्वं जगदिदं त्वयि लयमेष्यति ॥ ' असेंच वर्णन आढळून येईल.

हा वैदिक धर्मीय लोकांच्या मनोरचनेचा परिणाम आहे. एकाच वस्तूस वेगवेगळीं नांवें देऊन व त्यांची वेगवेगळी रूपें कल्पून वेगवेगळ्या लोकांची सोय केलेली आहे; पण प्राधान्य एकच आहे. आम्हां वैदिकांचा ओढा स्वभावतःच समन्वयाकडेच आहे. पुष्पदन्तानें महिम्नांत म्हटलें आहे:—

त्रयी साङ्ख्यं योगःपशुपतिमतं वैष्णवमिति ।
प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदःपथ्यमितिच ॥

रुचीनां वैचित्र्यात् ऋजुकुटिलनानापथजुषाम्
नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥

( १० ) वैदिक धर्म हा जसा सर्व संग्राहक आहे, तसाच तो इतर धर्मांच्या बाबतींत उदार मनाचा ( Tolerant ) आहे. मानवी जीवन हें सर्वत्र ईश्वराचाच अंश आहे असें जाणून सर्व धर्मांकडे हा धर्म मोठ्या सहानुभूतीनें पाहतो. वैदिक धर्माचें म्हणणें असें कीं, अनुभव एकच; पण तो प्रकृति धर्मामुळें वेगवेगळया रूपानें प्रगट होतो. ज्यांनीं त्यांनीं आपल्या ठिकाणीं जर यथार्थ अनुभव पाहण्याचा प्रयत्न केला तर त्याला शुद्ध स्वरूपाकडे जातां येईल. असा हा अनुभवाच्या भरभक्कम पायावर उभारलेला व्यापक, सर्व संग्राहक, व उदारमतवादी धर्म आहे.

**इस्लाम** ( मुसलमानी ) **धर्मः—**

या धर्माचा संस्थापक महंमद याचा जन्म अरेबियांत मक्का येथें सन ५७० मध्यें झाला. यानें स्थापन केलेल्या धर्मासच 'इस्लाम अथवा मुसलमान—धर्म' म्हणतात. त्याच्या काळीं अरेबियांत माजलेल्या अनीतियुक्त आचारास यानें चांगलें वळण लावण्याचा मोठा प्रयत्न केला. येशू ख्रिस्तानंतर हा धर्म प्रचारांत आल्यानें या धर्माचे व ख्रिश्चन् धर्माचे एकदेव, मूर्तिपूजाविरोध इत्यादि बाबतींत साम्य आहे. हा एकेश्वरी धर्म आहे.

इस्लामधर्माचे सिद्धांत खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) ईश्वर एकच आहे. तो सर्व शक्तिमान, अजन्मा, अकृत्रिम अदृश्य, अपरंपार, दयाळू, न्यायी, निराकार व निर्विकार आहे. आणि तोच जगताचा स्रष्टा, धाता व जगताच्या विकासाचे कारण आहे. यालाच 'अल्ला' असें म्हणतात.

( २ ) त्या ईश्वराचें चित्र काढणें अगर त्याची मूर्ति तयार करणें हा त्याचा मोठा अपमान आहे. म्हणून हा धर्म मूर्तिपूजेच्या अत्यंत विरूद्ध आहे. याचा मूर्तीच्या विरुध्द इतका प्रचार आहे कीं, यांस ' मूर्तिभंजक ' धर्महि म्हणतात. या बाबतींत खुद्द महंमदासंबंधानें एक गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. तो स्वतः विचारी होता. त्यानें एकेठिकाणीं म्हटलें आहे. ' Revile not the idols which they worship beside God !'

( ३ ) एका ईश्वराला सोडून दुसऱ्याची भक्ति करणें इष्ट नाहीं.

( ४ ) देवाची क्षमा मागितली असतां तो सर्व अपराध क्षमा करतो.

( ५ ) अल्ला हा सर्व भल्याबुऱ्या कर्मांचें फळ देतो व प्रलयसमयीं तो सर्व पापपुण्यांचा फैसला करतो.

( ६ ) ईश्वर अवतार घेत नाहीं.

( ७ ) परमात्मा अनंत होण्यास्तव परमात्म्याचे यथार्थ स्वरूप कळणें कठीण आहे. पण तो जगाचा शास्ता, पोषक, नियामक, अदृश्य, अतुलशक्तिस्वरुप आहे यांत शंका नाहीं.

या धर्मांतसुद्धां शिया सुनीसारखे पंथ आहेत. यांच्यांत सुफी नांवाचा पंथ आहे. त्यांतील वली आपल्याकडील अद्वैततत्त्वे-वेत्त्याप्रमाणें ' अहं ब्रम्हाऽस्मि ' या स्थितीपर्यंत पोंचलेले आढळून येतात.

## खुदाच्या आज्ञा

( १ ) **नमाजः**—प्रत्येक मनुष्यानें पवित्र होऊन दिवसांतून पांच वेळां नमाज पढावा. सामुदायिक प्रार्थना सर्वांत उत्तम. मशिदींत अमीर-गरीब-बडे-छोटे सर्व सारखेच आहेत. तेथें कोणत्याहि प्रकारचा भेद नाहीं.

(२) **रोजा**:—रमजानच्या महिन्यांत सर्व आबालवृद्धांनीं निर्जल उपवास पाळला पाहिजे.

(३) **ज़कात**:—आपल्या कमाईतला कांहीं भाग प्रत्येक इसमानें दीनहीन गरिबांकरितां खर्च केला पाहिजे.

(४) **हज़**:—प्रत्येकानें मक्का—मदिनाची यात्रा अवश्य केली पाहिजे.

(५) **कुराण**:—हा एकच धर्मग्रंथ आहे व त्यावर प्रत्येक मुसलमानानें विश्वास ठेवला पाहिजे.

(६) **धर्मप्रसाराची रीत**:—ह्याबरोबरच कित्येक वेळां असें सांगण्यांत येतें कीं, " महंमदानें एका हातांत कुराण व एका हातांत तरवार अशा पद्धतीनें आपल्या धर्माचा उपदेश करा असें म्हटलें आहे."

एके ठिकाणीं तो म्हणतो, " तरवार ही स्वर्गाचा दरवजा उघडण्याची किल्ली आहे. देवासन्निध दुसऱ्याना आणण्याकरितां पाडलेला एक रक्तबिंदु अथवा हत्यारबंद स्थितींत घालविलेली एक रात्र ह्यांच्याबरोबर दोन महिन्यांची तपश्चर्या अथवा उपवास येणार नाहीं. जो धारातीर्थीं मरण पावतो, त्याची सर्व पातकें धुतली जातात. त्यावेळीं देव सर्वांचा इन्साफ करील, त्यावेळीं धारातीर्थीं पडलेल्यांच्या जखमा हिंगुळाप्रमाणें चमकून लोकांचें डोळे दिपवितील आणि त्यांना कस्तुरीचा सुगंध प्राप्त होईल. देवदूत त्यांना आपले पंख देतील व त्यायोगानें ज्यांचें अवयव लढाईत तुटलेले असतील त्यांना ते परत आणतां येतील."

अशा अर्थाचे उतारे कुराणांतून कांहीं काढतां येतील. याचा अर्थ हल्लीं कित्येक लोक जसा करतात, तसाच केला पाहिजे असें नाहीं. महंमदानें आरंभीं " तरवारीच्या जोरावर धर्मप्रसार करा " असें सांगितलें नाहीं. त्याला स्वतःला छळ सोसावा लागला. तेव्हां

त्यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, "नास्तिक लोक तुमच्यावर हल्ला करून तुम्हांला छळूं लागले, तर तुम्हीं त्यांच्याविरुद्ध शस्त्र उचला. (Take up the swords against unbelievers when they have attacked and persecuted you.)

तेव्हां वरच्यासारखी महंमदाची आज्ञा कोणत्या परिस्थितींत त्यानें दिली आहे त्याचा विचार करणें अत्यंत अवश्य आहे. महंमदास कांहीं काळ "देवराज्या"पेक्षां येथीलच राज्यसत्तेकडे लक्ष देणें भाग होतें. त्यानें जर तसें केलें नसतें तर त्याचा धर्म व तो दोन्हींहि टिकतें ना! अशीच ती परिस्थिति होती.

प्रत्येकास त्याच्या इच्छेविरुद्धसुद्धां इस्लाम बनवायचें असा महंमदाचा अर्थ असतां तर त्यानें (सूरा—दोन, आयत २५७ मध्यें) 'धर्मांत जबरदस्ती करूं नये' हें जें म्हटलें आहे तें म्हटलें नसतें. 'मुलांवर जबरदस्ती करूं नये' असें पैगंबराचें मत होतें असें त्याच्या वागणुकीवरून दिसतें. महंमद स्वतः दयाळु व लीन गृहस्थ होता. कित्येक ठिकाणीं त्यानें कायेनें, वाचेनें, मनानें अहिंसा पाळावी असा उपदेश केला आहे.*

(७) **देववादः**—महंमदानें आपल्या अनुयायांना देववाद शिकवला. महंमदाचा देवावर आत्यंतिक विश्वास होता. ईश्वरानें सर्व गोष्टी आगाऊच ठरविल्या आहेत असें तो मानणारा होता, व लोकांनाहि तो तेंच शिकवी. तो म्हणे, "ईश्वर ज्याचें रक्षण करतो त्यावर तरवार वगैरे चालूं शकत नाहीं. बरें! त्याच्याच

* (१) डॉ. ॲनी बेझंट यांचें व्याख्यान; (२) प्रबुद्ध भारतांतील डॉ. एम्. एच. सय्यद, एम्. ए. यांचा लेख—पान ३३; अंक जानेवारी १९३९.

मनांत मरण आणावयाचें—मारावयाचें असेल, तर त भ्याडपणानें चुकणार नाहीं. तेव्हां उभयपक्षीं लढणेंच बरें!" असा देववाद आपल्या अनुयायांच्या गळीं उतरवून आपल्या अनुयायांमध्यें महंमदानें इतकें चैतन्य उत्पन्न केलें कीं अजूनहि कोठें त्याच्या धर्माविरुद्ध चीड आणणारें कृत्य घडलें कीं, प्रत्येक मुसलमान प्राण अपण करण्यास तयार होतो. महंमदानें या उपदेशानें देवराज्याबरोबर इहलोकचें राज्यहि आपल्या लोकांना मिळवून दिलें हें, देववादाला नांव ठेवणारें जे लोक आहेत त्यांनीं अवश्य लक्षांत ठेवण्याजोगें आहे. देववादानें मुसलमान दुर्बल बनले नाहींत, तर त्यायोगें त्यांच्या वीरश्रीस तेज आलें व त्यांनीं मोठा पुरुषार्थ केला.

लौकिक, व्यावहारिक अथवा धार्मिक भेद त्यांच्यांत जरी कितीहि असले तरी मुसलमानांचें संघटण नांवाजण्यासारखें आहे. मुसलमान येथन तेथून एकच अशी स्थिति आहे. त्यांचें संघटण इतकें वीर्यशाली झालें व होत आहे यास कारण असणारी शक्ति खालील गोष्टींमुळें त्यांच्यांत उत्पन्न झाली आहे. यांचा धर्म अत्यंत सुटसुटीत आहे. इस्लाम धर्मामध्यें खुदा एक, धर्मग्रंथ एक व तो म्हणजे कुराण, महंमद हा एकच पैगंबर, एकच रस्ता, एकच भाषा, एकच भूषण, एकच भाव, एकच रिवाज, एकच मशीद व एकच कायदा.

**झोरास्ट्रिअन् अथवा पारसी धर्म**—ह्या धर्माचा संस्थापक झरथुष्ट्र हा इसवी सनापूर्वीं सुमारें सातशें वर्षें होऊन गेला. ह्या धर्मातील धर्मग्रंथाचें नांव 'गाथा' असें आहे व तो अवेस्ता भाषेंत लिहिलेला आहे. इराणी साम्राज्याच्या वेळीं या धर्माचे अनुयायी ईजिप्तपासून तों थेट हिंदुस्थानापर्यंत पसरलेले होते. हल्लीं या धर्माचे अनुयायी फारच थोडे आहेत व तेहि कांहीं इराणांत व कांहीं हिंदु-

स्थानांतच आहेत. पण धर्माचें महत्त्व हें कांहीं नुसत्या अनुयायांच्या संख्येवर अवलंबून नाहीं, ही गोष्टहि विसरतां कामा नये.

हा धर्म फार जुना खरा; पण त्याच्याहि पूर्वी आर्यधर्म होताच. आणि तोच या धर्माची पार्श्वभूमि होय. आर्यधर्माचे शाखाभेद होऊन वेगवेगळ्या प्रांतांतून वसाहत करण्यापूर्वी तो धर्म ज्या देव-देवता मानी त्यांपैकीं अग्नि, सूर्य, वरुण, रुद्र इत्यादि ह्या धर्मांत प्रथम मानलेल्या आढळून येतात. पण झरथुष्ट्रानें या धर्माला अनेक देवतावादांतून काढून एकदम एकेश्वरी पंथावर आणून सोडलें व ही त्यानें केलेली मोठीच प्रगति होय यांत शंका नाहीं. आर्य लोकांची हिंदुस्थानाकडे जी शाखा आली, तींतील लोकांची गूढ आध्यात्मिक तत्त्वज्ञानाकडे प्रवृत्ति असल्यानें त्या शाखेचा कल निर्गुणाकडे व अद्वैताकडे झुकला. झरथुष्ट्रानें जो धर्म स्थापला, तो एकेश्वरी होय. कारण त्याच्या मताचा पाया हा गूढ तत्त्वज्ञान नसून, सद्विचार, सत्यवाणी, सदाचार—तात्पर्य, नीतियुक्त आचार—हा होता. यामुळें तो जगत् सत्य मानतो व त्याच्या बुडाशीं ज्याचा कायदा या जगतांत मान्य होतो असा ज्ञाता प्रभु ( Ahur Mazd ) मानतो. या धर्मांतील तत्त्वें खालीलप्रमाणें आहेत:—

( १ ) जगताला आधार असा सर्वज्ञ प्रभु ( Ahur Mazd ) आहे व त्याचीच सत्ता या जगांत चालते.

( २ ) जगत् सत्य आहे.

( ३ ) नीतितत्त्वें हीं मानवनिर्मित नव्हेत; तीं सनातन आहेत. याचा अर्थ असा कीं, बरें व वाईट हीं दोन्हीहि सनातनच आहेत. आणि हेंच द्वैत दाखविणारीं या धर्मांत असुर व सुर अथवा आहुर-मझ्द् ( प्रकाश ) व अहरिमन् ( अंधार ) अशीं दोन तत्त्वें मानलीं आहेत. या दोहोंचा झगडा अखंड चालू आहे. पण जय हा सत्याच्या,

नीतीच्या बाजूचा होणार आहे. दोन तत्त्वें मानूनसुद्धां हा एकेश्वरी आहे याचें कारण हा सरतेशेवटीं 'यत्र नीतिस्तत्र जयः' असें मानणारा आहे.

( ४ ) हा धर्म अग्निपूजक आहे.

( ५ ) ह्या धर्मांत सद्विचार, सत्क्रिया, दान देण्याची बुद्धि, सर्व प्राणिमात्रांवर दया, ईश्वरविषयक प्रेम हे ईश्वरी गुण समजले जातात. हा धर्म कसा व्यवहारी आहे हें झरथुष्ट्राच्या खालील उक्तीवरून कळून येईल:—

"He who sows the ground with care and diligence acquires a greater store of religious merit than he who repeats ten thousand prayers."

येशू ख्रिस्तानंतर दोनशें वर्षांनीं झालेल्या आर्देशरनें या धर्माची घडी बसविण्याचा प्रयत्न केला; पण मुसलमानांच्या तरवारीपुढें हा धर्म टिकूं शकला नाहीं व हल्लीं या मताचे अनुयायी फारच थोडे आहेत.

**ईसाई ( ख्रिश्चन ) धर्मांतील ईश्वराचें स्वरूपः**—बायबलमध्यें ईश्वराविषयीं जितकें निरूपण आहे त्यास ईसाई अथवा येशूच्या धर्माचे अभिमानी लोक फार मानतात. पण भिन्न भिन्न सांप्रदायानुसार ह्यांच्यांतहि बराच मतभेद आहे. त्यांच्यांत प्रभू येशूचें प्रगट होणें, प्रभूचें देहत्यागानंतर पुनरुज्जीवन ( Resurrection ) आणि नंतर स्वर्गारोहण या सर्व घटनाद्वारा ईश्वराची अभिव्यक्ति मानिली आहे. ह्या धर्मीयांत परमात्म्याच्या तीन स्वरूपांचेंहि (Trinity) प्रतिपादन मानलें जातें व कांहीं ऐक्यवादी गुणरहित असाही ईश्वर मानणारे आहेत. प्राचीन येशूचे अनुयायी पिता, पुत्र व पवित्र आत्मा ( Father, Son & Holy Spirit ) असे भाग मानीत असत ख्रिश्चन योगी असेंहि म्हणतात कीं, पुत्राच्या

( येशूच्या ) साहाय्याशिवाय पिता ( परमेश्वर ) याची उपलब्धी होऊं शकत नाहीं. संक्षेपतः मुख्य मुख्य विचारांचा आधार घेतां ईसाई लोकांच्या ईश्वरविषयक निरूपणांत खालील गोष्टीस प्राधान्य आहे.

( १ ) ईश्वर सगुण आहे. मानवी आध्यात्मिक जीवन वाढलें कीं, पवित्र आत्मा ( Holy Spirit ) अर्थात् ईश्वर, मानवी ज्ञान, इच्छा अगर संकल्प यांस संचलित व प्रभावी करतो व या पवित्र आत्म्यास परमेश्वराचा प्रेषित असें मानलें जातें.

( २ ) ईश्वराचें स्वरूप अगर सत्ता प्रेममयी आहे. ( God is love. ) बलिदान ( Cross ) ह्या मार्गाचेंच चिन्ह आहे.

( ३ ) ईश्वर सर्वशक्तिमान् व पवित्र आहे.

( ४ ) ईश्वराचें मानवांवर प्रेम आहे. व तो पापी लोकांना तो सन्मार्गावर आणतो.

( ५ ) ईश्वर सर्वशक्तिमान् असून तो मनुष्याला विज्ञान ( Wisdom ) देऊन आपल्या सनातन उद्देशाची सिद्धि करून घेतो.

* * *

वेगवेगळ्या धर्मांत ईश्वराची कल्पना भिन्न भिन्न मानलेली वाचून धर्म अनेक आहेत व कोणाचा कोणाशीं मेळ नाहीं, तेव्हां धर्मच टाकून द्या असा निष्कर्ष काढला जाण्याचाहि संभव आहे ! तेव्हां असा निष्कर्ष काढणाऱ्यांकरितां डॉ. ॲनी बेझंट यांच्या व्याख्यानांतील उतारा देत आहोंत तो वाचकांनीं जरूर वाचावा, व मगच त्यांनीं आपलें याविषयींचें मत बनवावें.

"You know what religions are. They are like the broken rays of the white light of the Sun; the truth broken in the prism of the intellect, which cannot reach the great truth of the unity of the

Spirit. If you were inside some great cathedral in Christendom, you would see windows of different colours, some green, and blue, and some yellow. You will see differences of colours in the world around you where the white light of the Sun is around you, where the white light of the Sun is broken up in the flowers, and they shine with reflected rays of the colours that are hidden in the white light of the Sun. It is only if you are outside the temples of religion that you see the differences in them. From inside you see the truth through a coloured glass of religion which is adapted to the times, to the people, to the wants of the age, when the Prophet gives his teaching to the world. Do not sit outside them all; rather enter into all of them and worship in all of them, the one Supreme, and then you will see the white light, which the lamps there are throwing out, the white light which is coloured by the glass of the windows and not from any change in the light. Go into all religions, and love them, learn them, respect them, realise their Spiritual unity and then India will have a religion in which all the beauties of every faith shall be blended together as it were and shall give out to a wondering world the pure white light of God "*

* 'The Life and Teachings of Muhammad' by Annie Besant; Lecture 1, Pages 19 & 20

# ईश्वरविषयक कांहीं भोळया समजुती : : १२

म्हणून ज्ञानाचि तें अंधारें। ज्ञानासि करी ॥ ज्ञा.अ.९-१७१

मागील एका प्रकरणांत ईश्वराची कल्पना शेंकडा नव्वद लोकांत आहे असें आम्हीं म्हटलें होतें. पण त्याबरोबरच एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे कीं, सर्वांची देवाविषयींची समजूत सारखीच असते असें मात्र नाहीं. उलट देवविषयक समजुतींत आपणांस अत्यन्त वैचित्र्य दिसून येतें. हें वैचित्र्य मनुष्याची सामाजिक परिस्थिति, त्याच्या भावना व त्याचें ज्ञान इत्यादिकांतील भेदाचा परिणाम आहे. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे कीं श्रद्धा अथवा ज्ञान हे शब्द जरी वेगवेगळया ठिकाणीं सारखेच उपयोगांत आणलेले दिसतात तरी त्यांची स्वरूपें अथवा परिणाम सर्वत्र सारखे नसतात. ज्ञान व श्रद्धा ही ज्या वृत्तिद्वारां व्यक्त होतात त्यांत ज्या गुणांचा जसा प्रभाव असेल त्या प्रमाणांत ज्ञान हें त्या गुणानें युक्त असें व्यक्त होतें. पाणी एकच, पण चुन्याच्या निवळीबरोबर तें पांढरें स्वच्छ दिसेल तर पिवळी व तांबडी अथवा काळी पूड मिसळली तर त्यांत पिवळें, तांबडें व काळें दिसेल. ईश्वरविषयक समजुतींचेंहि असेंच आहे. अज्ञानानें बनलेल्या रजतमात्मक ईश्वरविषयक कल्पना ह्या कित्येक वेळां ईश्वरविषयक यथार्थ ज्ञानाच्या आड येतात. अशा भोळया समजुती अनंत आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं दिल्या आहेत.

## ( १ ) नवसास पावणारा देव—

पुष्कळ अशिक्षित व सुशिक्षितहि, त्यांच्यावर कांहीं संकट आलें असतां, देवाला नवस करतांना दिसतात. उदाहरणार्थ, एकाद्याचा

मुलगा आजारी पडला व वैद्याचें औषध देऊन कांहीं उपयोग होत नाहीं असें दिसून येऊं लागलें कीं त्या मुलाचे आईवडील देवाला नवस करतात कीं, " देवा ! आमचा मुलगा या दुखण्यांतून उठूं दे, आम्हीं सत्यनारायण करूं." यांचा देवावर किती विश्वास आहे हेंहि जातां जातां पहाण्यासारखें आहे. देवावर, जर तो कृपाळू, प्रार्थनेला पावणारा, ' कर्तुंअकर्तुं अन्यथा कर्तुं ', असा समर्थ आहे, असा विश्वास आहे तर त्यांनीं आधींच सत्यनारायण कां करूं नये ? पण त्यांची क्रिया असें दर्शवतें कीं त्यांचा देवावर एवढाहि विश्वास नाहीं. प्रथम फल पदरांत पडलें तर त्याची पूजा ! अर्थात् कांहीं लोक असें आहेत कीं तें आधीं एकादशणी वगैरे सारख्या गोष्टी करतात, व देवावर आपल्या कृतीनें थोडा बहुत विश्वास दाखवितात. पण ही कामिक श्रद्धा देवाच्या खऱ्या स्वरूप ज्ञानाच्या आड येतें असें म्हटल्याशिवाय इलाज नाहीं.

नवस कशाकरतां करावयाचा ? देवाला आपल्यापेक्षां अधिक कळतें किंवा नाहीं ? आपली त्याला कळकळ आहे कीं नाहीं ? तो न्यायी आहे कीं नाहीं ? जर वरील प्रश्नांना अस्तिपक्षीं उत्तरें देणें अवश्य असेल व अस्तिकाला अस्तिपक्षीं उत्तर द्यावेंच लागेल तर नवस करणें हें अगदीं निरर्थक आहे. येवढेंच नव्हे तर नवस करणें म्हणजे एकाप्रकारें देवावर गैरविश्वास प्रगट करणें होय.

विनोदानें हीच गोष्ट सांगणें झाल्यास पुढील उदाहरणानें सांगतां येईल. कल्पना करूं या कीं एका गांवीं एका जागेच्या निवडणुकीकरतां दोन उमेदवार उभे राहिले आहेत. उमेदवार दोन; पण जागा एकच असल्यामुळें निवडून एकच येणार ! दोघेहि उमेदवार सश्रद्ध होते. तेव्हां दोघांनींहि देवास नवस केले. एक म्हणाला, " देवा, मला अनुकूल निकाल दिलास तर एक रुपयाचे पेढे वाटीन. " दुसरा

म्हणाला, " देवा, मला अनुकूल निकाल दिलास तर 'सत्यनारायण' करीन." आतां येथें प्रश्न असा आहे कीं देवानें निकाल कोणत्या बाजूनें द्यायचा? पेढ्यांच्या बाजूचा कीं शिऱ्याच्या बाजूचा? देवाला जर सर्व कळत आहे व त्याला जर आपली कळकळ आहे, तर खरी प्रार्थना म्हणजे' 'तुला जें बरें दिसेल तें कर, मी त्यांत संतुष्ट आहे' असें म्हणणें हीच होय.

आपल्या कल्याणाची योग्य अशी गोष्ट असेल तर देव करीलच. नसेल तर आपण त्याला तसें करण्यास लावणें म्हणजे अन्याय करायला लावणें असेंच होईल व तें जर तो करील तर तो देवच राहणार नाहीं. म्हणून एके ठिकाणीं व्होल्टेअरनें म्हटलें आहे कीं या सकाम भक्तापेक्षां नास्तिक बरा. सकाम भक्त देवाचें जितकें नुकसान करतो इतकें नास्तिक करीत नाहीं. त्यानें एक सुंदर उदाहरण दिलें आहे. तो म्हणतो कीं आपण अशी कल्पना करूं कीं एका गृहस्थाच्या देवडीवर दोन रखवालदार आहेत. कोणी एक परस्थ मालकाची चवकशी करण्याकरतां आला असतां एक रखवालदार म्हणाला, "मालक घरांत नाहींत." दुसरा म्हणाला, "छे:, ते घरांत आहेत. पण खोटी नाणीं पाडण्यांत, खोटे दस्तैवज करण्यांत, खोट्या सह्या करण्यांत, चांगलें कृत्य कसें बिघडवावें याचा विचार करण्यांत गुंतले आहेत." व्होल्टेअर म्हणतो कीं दुसऱ्या रखवालदारापेक्षां पहिला पुष्कळ बरा हें सांगावयास नको; कारण तो मालकाची निंदा तरी करत नाहीं. तुकाराम बोवा स्पष्ट म्हणतात, 'नवसें कन्यापुत्र होती। तरी कां कारणें लागे पति'. एकनाथ महाराज म्हणतात:—

अदृष्टा अधीन शरीर। तेथ आलियांहि हरिहर।
अन्यथा न करवे अणुमात्र। वेदशास्त्रार्थ संमत॥

एकाद्या लुच्च्या माणसाप्रमाणें प्रत्येक मनुष्याच्या लहानसहान गोष्टींत मन घालून देव ढवळाढवळ करतो ही अगदीं भोळी समजूत आहे.

**( २ ) योग्य क्रियेवांचून मदत करणारा देव !—**

वरील समजुतीचाच दुसरा प्रकार म्हणजे आपल्या प्रयत्नाशिवाय देव वाटेल तें देतों, वाटेल ते करतो ही समजूत होय. या समजुतीचा परिणाम, जो योग्य तो प्रयत्न न करतां स्वस्थ बसणें अथवा कांहींतरी करणें यांत होतो. कल्पना करा कीं एक मुलगा मुंबई विश्वविद्यालयाच्या प्रवेशपरीक्षेस बसला. पण तींत नापास झाला व म्हणूं लागला, " अहो, मी रोज संध्या करीत होतो; मारुतीच्या दर्शनाला जात होतो, तर मग मी नापास कसा झालों ? याचें उत्तर असें कीं परीक्षा पास होण्याचा व संध्या करणें अथवा मारुतीच्या दर्शनास जाणें याचा कांहींहि संबंध नाहीं. जर मारुति-दर्शनामुळें परीक्षा पास होती तर शाळा काढून मुलांना शिकवण्याचा खटाटोप करण्याचें कारणच नव्हतें ! मारुति दर्शनाचें, संध्येचें फळ परीक्षा पास होण्याहून वेगळें आहे. मनुष्यानें योग्य दिशेनें प्रयत्न केल्यास त्याला यश येईल. आतां मनुष्य हा सर्व शक्तिमान् नसल्यानें त्याला हातीं घेतलेल्या कार्यांत हमखास व हवेंतसें यश येईलच असें नाहीं. पण याचा अर्थ आपण प्रयत्न न करतां ते यश नुसत्या ईश्वराच्या प्रार्थनेनें आपल्या पदरांत पडेल असें समजणें ही भोळी समजूत आहे. देव असलें कांहीं एक करीत नाहीं. उलट वेद सांगतो " एष ह्येव साधु कर्म कारयति तं यमेभ्यो लोकेभ्यो उन्निनीषते । "

**( ३ ) भोग भोगणारा व शेजघरांत निजणारा देव**—देवाला आपल्या सारखा मनुष्य कल्पून सर्व मनुष्यधर्म देवावर आरोपित करणें हा एक देवभोळेपणाचाच प्रकार आहे.

आपली भक्ति वाढविण्याकरितां, आपल्या अंतःकरणांत प्रेमभाव उत्पन्न करण्याकरतां याचा उपयोग होत असेल. पण हाच खरा धर्म समजणें, नव्हे तेवढ्याकरतां भांडणें म्हणजे ईश्वराच्या कल्पनेवर अत्याचार करणें होय. अखंड स्फुरद् रूपानें जागणारा देव निजतो कसा व कोठें? भक्ताला झोंप येऊं लागली कीं निःसंकोच निजतां यावें एवढ्याकरतां देवाच्या मागें त्यानें शय्यागृह लावलें. कित्येक धर्मांत देवाला इतके भोग दिले जातात कीं भक्तांना दर्शन द्यावयालाहि त्याला फुरसद मिळत नाहीं. 'भोग चढा आहे' 'भगवान् सोता आहे' हाच मंत्र कित्येक देवळांतून आपणांस ऐकूं येतो.

(४) **कोपऱ्यांत बसवलेला, धर्माधर्माकडे काना-डोळा करणारा देव**—मनाला स्थिरता प्राप्त व्हावी, एवढ्या-करितां शास्त्रांतून मूर्तिपूजेचें वर्णन केलेलें आहे. त्याचें महत्त्व इतरत्र याच पुस्तकांत सांगितलें आहे. पण या मूर्तिपूजेचें रहस्य न कळ-ल्यामुळें कितीतरी खुळेपणा आपल्या धर्मांत उत्पन्न झाला आहे! देवदर्शनाला मनुष्य जातांना हातांतील पेटलेली विडी टाकून देतो व देवाच्यासमोर उभा राहून त्याला नमस्कार करतो. पण पाठ वळली कीं पुनः विडी ओढूं लागतो! काय ही देवांविषयींची संकुचित कल्पना! देव काय कोनाकोपऱ्यांत बसवलेल्या जागीं तेवढाच आहे? व बाकीची जागा त्याविणें कां रिकामी आहे? देवाची स्थापना एके ठिकाणीं केल्यानें असा समज झाला कीं देव दगड आहे, आपण जेथें स्थापूं तेवढाच आहे, त्यापलीकडे देवच नाहीं. तसेंच असा एक दुष्ट समज होऊन बसला कीं देवविषयक आपलें कर्म म्हणजे प्रतिमेची पूजा करणें एवढेंच. ती केली कीं संपलें. मग बाकीचें आचरण कसें कां असेना? आपण हवे तसे वागावे, खोटे नाटे कागद पत्र करावेत,

व्यभिचार करावा, दुसऱ्याचे पैसे उपटावेत. फक्त ठरल्यावेळीं देवाची पूजा केली अथवा ठरल्यावेळीं आपल्या इष्ट देवतेची यात्रा केली कीं आपली सर्व पातकें भस्म होतात. असें समजणें हीहि भोळी खुळी समजूत आहे. आपल्या भागवतावरील टीकेंत श्रीएकनाथ एके प्रसंगीं भगवंतांचें या बाबतींतील म्हणणें खालीलप्रमाणें सांगतात:—

धर्माधर्म न विचारितां। म्हणती ईश्वर मोक्ष दाता। हे भक्त-पाखंडीं कथा। स्थापूनि चिद्रूपता निवारी॥ टिळे माळा मुद्रा धरणें। लावूनि संतासि निंदिलें जेणें। पाप राहटें भक्तपणें। त्यासि नारायणें नुद्धरिजे॥ अंतरींचे सर्व जाणता मी। यालागीं नांवें अंतर्यामीं। तो मी शाब्दिक वचनधर्मी। चाळविला अधर्मीं केवीं जाय॥ ११।१७८-८०.

वाटेल तसे दिवसां वागावयाचें व संध्याकाळीं देवासमोर जाऊन 'क्षमस्व' म्हणावयाचें व समजावयाचें कीं आपलें सर्व अपराध देव क्षमा करतो, ही भोळी समजूत आहे.

## वकीलाच्या द्वारें भेटणारा देव

प्रस्तुत लेखक एकदां एका तुरुंगांत कैद्यासमोर झालेल्या येशूच्या अनुयायांच्या व्याख्यानांस हजर होता. तेथें त्यानें खालील व्याख्यान ऐकलें. व्याख्याता—पाद्री—म्हणाला, "तुम्ही येथें (तुरुंगांत) आला आहांत यास काय कारण? तुम्ही उत्तम वकील दिला असतां तर येथें आला असतात कां? नाहीं. तसें तुम्हांला जर पातकांपासून मुक्त होणें असेल तर येशुला शरण जा. तो तुमच्याकरतां देवा-जवळ करुणा भाकील व त्यायोगें पातकांपासून मुक्त होऊन तुम्ही सुखी व्हाल. येशूला शरण गेला नाहींत तर नरकांत जाल.'

वास्तविक देवाला शरण जाण्यास मध्यस्त वकिलांची गरज नाहीं. देव हा जगाची 'आई' आहे, त्याला वकील कशाला?. 'पिताऽहमस्य जगतो माता धाता पितामहः' असें श्रीकृष्ण म्हणतात. कोणी मारलें

अथवा त्रास दिला तर आपण आईकडे तक्रार घेऊन जातो. त्या आईकडे जाण्यास वकील कां लागतो ? देवाकडे जाण्यास असा मध्यस्त वकील लागतो हाहि भ्रमच आहे.

## ( ५ ) कामिक भक्तीचा प्रकार—

याचें वर्णन श्री ज्ञानदेवांनीं फारच सुंदर उदाहरणें देऊन केलेलें आहे. तें त्यांच्या शब्दांत खालीं देऊन हें प्रकरण संपवूं.

कुणबट कुळवाडी । तैसा आन आन देव मांडी । आदिलाची परवडी । करी तया ॥ ११ ॥ तया गुरुमार्गा टेके । जयाचा सुगरवा देखे । तरी तयाचा मंत्र शिके । येरू नेघे ॥ १२ ॥ प्राणीजातेंसी निष्ठुरु । स्थावरी बहु भरु । तेवीचि नाहीं एकसरु । निर्वाहो जया ॥ १३ ॥ माझी मूर्ति निफजवी । ते घराचे कोनीं बैसवी । आपण देवोदेवीं । यात्रे जाय ॥ १४ ॥ नित्य आराधन माझें । काजीं कुळदेवता भजे । पर्वविशेषें कीजे । पूजा आना ॥ १५ ॥ माझें अधिष्ठान घरीं । आणि वोवसे आनाचे करीं । पितृकार्यावसरीं । पितरांचा होय ॥१६॥ एकादशीच्या दिवशीं । जेतुला पाडु आम्हांसी । तेतुलाचि नागांसि । पंचमीच्या दिवशीं ॥१७॥ चौथ मोटकी पाहे । आणि गणेशाचाचि होये । चावदशी म्हणे माये । तुझाच वो दुर्गे ॥ १८ ॥ नित्यनैमित्तिकें कर्मे सांडी । मग बैसे नवचंडी । आदित्यवारीं वाढी । भैरवां पात्रीं ॥ १९ ॥ पाठीं सोमवार पावे । आणि बेलेंसि लिंगा धावे । ऐसा एकलाचि आघवे । जोगावी जो ॥ २० ॥ ऐसा अखंड भजन करी । उगा नोहे क्षणभरी । अवघेन गांवद्वारीं । अहेव जैसी ॥ २१ ॥ अ. १३ ओ. ८११-२१

# परिशिष्ट

## थोरांचीं वचनें

( मोठमोठे विज्ञानशास्त्रवेत्ते, लेखक, योद्धे, राजकारणी पुरुष व साधुसंत यांच्या ईश्वरविषयक उक्ति )

## Sir Arthur Keith

"The Human brain is a poor instrument to solve such ultimate problems. We have to recognize its limitations. Yet it perceives how well ordered all things are and how wonderful are the inventions of nature. Design is manifest everywhere. Whether we are laymen or scientists, we must postulate a Lord of The Universe—give him what shape we will. But it is certain that the anthropomorphic God of the Hebrews cannot meet our modern needs. ......

......" Lord is a dangerous word-too apt to assume a human shape......my fellow contributors are happier in their choice; they speak of an 'Immortal Essence', 'a pervading spiritual force', 'a principle of guiding good', 'a great First Cause."
......" How and why the Universe came into existence is beyond our present reach. It is childish

to say it is the work of a potter who stood outside his clay. We have to postulate a 'Lord' that is inside the clay—just as life is an inherent quantity of living matter."

## Sir James Jeans

(The Mysterious Universe Pp. 149)

"The Universe shows evidence of a designing or controlling power that has something common with our own individual minds—not, so far as we have discovered, emotion, morality, or aesthetic appreciation, but the tendency to think in the way, which, for want of a better word, we describe as mathematical."

---

## Eddington

(Science and the Unseen World Pp. 36)

"Dismiss the idea that natural law may swallow up religion; it cannot even tackle the multiplication table single-handed."

---

"I think therefore we are not wrong in embodying the significance of the spiritual world to ourselves in the feeling of a personal relationship, for our whole approach to it is bound up with those aspects of consciousness in which personality is centred."

*Ibid* 50

# Francis Galton

(Life of F. Galton by Karl Pearson; III-A. Pp. 272.)

"Did I ever tell you," writes the greatest of British Scientific thinkers, Francis Galton, "that I have always made it a habit to pray before writing anything for publication, that there may be no self-seeking in it, and perfect candour, together with respect for the feelings of others?"

# Professor Whitehead

(Science and the Modern World; Pp. 238.)

"Religion is the vision of something which stands beyond, behind and within the passing flux of immediate things; something which is real, and yet waiting to be realised; something which is a remote possibility, and yet the greatest of present facts; something that gives meaning to all that passes, and yet eludes apprehension, something whose possession is the final good, and yet is beyond all reach; something which is the ultimate ideal, and the hopeless quest."

"In a prayer it is emotion, not reason that seeks an outlet and therefore words of prayer cannot be explained."

## Lloyed Morgan

( Emergent Evolution. Pp. 39. )

"For better or worse, I acknowledge God as the Nisius through whose Activity emergents emerge, and the whole cause of emergents is directed. Such is my philosophic creed supplementary to my scientific policy of interpretation."

## George Santayana

( Some Turns of Thought in Modern Philosophy—Pp. 116-117 )

"I confess that formerly I had some difficulty in sharing the supreme respect for Infinite Being which animates so many saints: it seemed to me the dazed, the empty, the deluded side of spirituality. Why rest in an object which can be redeemed from blank negation only by a blank intensity? But time has taught me not to despise any form of vital imagination, any discipline which may achieve perfection after any kind......

The man in whom spirit is awake will continue to live and act, but with difference. In so far as he has become pure spirit he will have transcended the fear of death or defect; for now his instinctive fear, which will subsist, will be neutralised by an equally sincere consent to die and to fail. He will live henceforth in a truer and more serene sympathy

with Nature than is possible to rival natural beings. Natural Beings are perpetually struggling to live only, and not to die; so that their will is in hopeless rebellion against the divine decrees which they must obey notwithstanding. The spiritual man, on the contrary, in so far as he has already passed intellectually into the eternal world, no longer endures unwillingly the continual death involved in living or the final death involved in having been born. He renounces everything religiously in the very act of attaining it, resigning existence itself as gladly as he accepts it, or even more gladly; because the emphasis which action and passion lend to the passing movement seems to him arbitrary and violent; and as each task or experience is dismissed in turn, he accounts the end of it more blessed than the beginning."

## William James

( The Varieties of Religious Experience Page 508 )

"He becomes conscious that his higher part is conterminous and continuous with A More of the same quality, which is operative in the universe outside of him, and which he can keep in working touch with, and in a fashion get on board of and save himself when all his lower being has gone to pieces in the wreck."

"If asked just where the differences in fact which are due to God's existence come in, I should have to say that in general I have no hypothesis to offer beyond what the phenomenon of 'prayerful communion,' especially when certain kinds of incursion from the sub-conscious region take part in it, immediately suggests. The appearance is that in this phenomenon something ideal, which in one sense is part of ourselves and in another sense is not ourselves, actually exerts an influence, raises our centre of personal energy,and produces regenerative effects unattainable in other ways. If, then, there be a wider world of being than that of our everyday conciousness, if in it there be forces whose effects on us are intermittent, if one facilitating condition of the effects be the openness of the 'Subliminal' door, we have the elements of a theory to which the phenomena of religious life lend plausibility. I am so impressed by the importance of these phenomena that I adopt the hypothesis which they so naturally suggest. At these places at least, I say, it would seem as though transmundane energies, God, if you will, produced immediate effects within the natural world to which the rest of our expreience belongs."

*Ibid Page* 523-524

## Dr. W. R. Inge

( Christian Mysticism, Page 326. )

" It will be found that men of pre-eminent saintliness agree very closely in what they tell us. They tell us that they have arrived at an unshakable conviction, not based on inference but on immediate experience, that God is a spirit with whom the human spirit can hold intercourse; that in him meet all that they can imagine of goodness, truth and beauty; that they can see his footprints everywhere in Nature, and feel his presence within them as the very life of their life, so that in proportion as they come to themselves they come to him. They tell us what separates us from Him and from happiness, is, first, self-seeking in all its forms; and secondly, sensuality in all its forms; that these are the ways of darkness and death, which of the just is like a shining light, which shineth more and more into the present day ! "

---

## Lin Yutang

( A great Chinese professor and writer )

" The wonders of the heavenly bodies and life on earth are still there, rich, overwhelmingly rich. Not just barely nice and useful for living, but intoxicating us with their beauty and mystery.

Behind it all, we feel a great Force—some call it God—so overwhelmingly great as to compel in us the greatest reverence."

**Jacques Maritain** (French Professor.)

"To my way of thinking, God trains us, through our disillusionments and mistakes, to understand at last that we must believe in Him and not in men, which places us in the proper position to marvel at all the Good which is in men inspite of everything and all the Good which they do inspite of themselves."

**Voltaire**

( Philosophical Dictionary : Answer to a sceptic )
Page 37-38

All this supposition seems to be prodigiously fantastic, for two reasons; first, that in this universe there are intelligent beings, and that you would not know how to prove it possible for movement alone to produce understanding; second, that, from your own avowal, there is infinity against one to bet, that an intelligent creative cause animates the universe. When one is alone face to face with eht infinite, one feels very small......

All that I know is one must worship Him and be just.

## H. G. Wells

( Preface to God the Invisible King. Page 13 )

"The writer's position here in this book is, firstly, complete Agnosticism in the matter of God, the Creator, and secondly, entire faith in the matter of God, the Redeemer. He uses the word God therefore for the God in our hearts only..."

## Beatrice Webb ( A socialist worker )

Her faith: Man is related to the Universe by an emotional as well as by a rational tie, that there is a spirit of love at work in the Universe, and that the emotion of prayer or aspiration reveals to man the ends he should pursue if he desires to harmonise his own purpose with that of the Universe; exactly as the working of the intellect discovers the means by which these ends may he best achieved.

## Marshal Foch says to his brother

"We shall both be serving France, you shall pray for her. And—( Here spoke the true Foch )—who knows which shall offer the better service!"

## George Washington

The biographer writes:—

"He ( Washington ) continued to find time for prayer and meditation, and as the tide of battle ebbed against him, his moral energy increased.

Washington after the War of Independence says, "The hand of Providence has been so conspicuous in all this, that he must be more than an infidel that lacks faith and more than wicked that has not gratitude enough to acknowledge His obligations."

## Abraham Lincoln

His biographer tells us that it was Lincoln's custom, until the end of his life, to pray for God's guidance: and to pray with the simplicity of a child.

## Charles Dickens ( to his son )

"Never abandon the wholesome practice of saying your own private prayers night and morning. I have never abandoned it myself; I know the comfort of it."

## Gladstone

He advised his son, "Daily prayer in the mornings and evenings and daily readings of the holy scriptures."

"As to the holy ordinances of the Gospel there is little need, I am confident to advise you!"

"One thing I would say: that it is not difficult, and it is most beneficial to cultivate the habit of inwardly turning the thoughts to God, though but for a moment, in the course, or during the inter-

vals, of our business, which continually presents occasions requiring his guidance."

The biographer says that this he did habitually.

## Emil Ludwig

(Born in Germany, for many years a Swiss citizen.)

"I recognise God in the logical construction of a crystal no less than in that of a Bach fugue. I see God in the pleading look of a dog as well as in the lovely bosom of a woman. I find him in the iridescent wings of a butterfly, and in the early morning frost which means its death. He appears to me in the hairy covering of the magnolia bud, and in the hand of the child who plucks it before it can blossom. I see him in the revolution of our times which seeks to wipe out old injustices and in the end achieves a modicum of justice. I see him in the smouldering eyes of a man who vows revenge upon his rival in love, and in the poised hand of the surgeon who removes a bullet from the eye after the duel."

## Swami Vivekananda

"What is the proof of God? Direct perception, Pratyaksham. The proof of this wall is that I see it. God has been perceived that way by all who want to perceive Him. But this perception is no sense-perception at all; it is supersensuous, superconscious, and all this training is needed to take

us beyond the senses. Then we will speak a strange language, as it were, and the world will not understand us because it does not know anything but the sense."

## Sri Aurobindo Ghosh

( The Life Divine, Vol. II Part I Pages 86-87 )

"But if it is evident that whatever the posture taken or relation formed in any individual nodus of Purusha-Prakriti, the being is in a fundamental cosmic relation lord or ruler of its nature: for even when it allows Nature to have its own way with it, its consent is necessary to support her workings. This comes out in its fullest revelation in the third aspect of the Reality; the Divine Being who is the master and creator of the Universe. Here the Supreme Person, the Being in its transcendental and cosmic consciousness and force, comes to the front, omnipotent, omniscient, the controller of all energies, the conscious in all that is conscient or inconscient, the Inhabitant of all souls and minds and hearts, and bodies, the Ruler or Overruler of all works, the Enjoyer of all delight, the Creator who has built all things in his own being, the All-Person of whom all beings are personalities, the Power from whom are all powers, the Self; the Spirit in all, by his being the Father of all that is, in his Consciousness—Force the Divine Mother, the Friend of all creatures, the All-bliss-

full and All-beautiful of whom beauty and joy are the revelation, the All-Beloved and All-Lover. In a certain sense, seen and understood, this becomes the most comprehensive of the aspects of the Reality, since here all are united in a single formulation; for the Ishwara is supracosmic as well as intracosmic; He is that which exceeds and, inhabits and supports all individuality; He is the supreme and Universal Brahman, the Absolute, the Supreme Self, the Supreme Purusha. But very clearly, this is not the personal God of popular religions, a being limited by his qualities, individual and separate from all others; for all such personal gods are only limited representations or names and divine personalities of the one Ishwara. Neither is this the Saguna Brahman active and possessed of qualities, for that is only one side of the being of the Ishwara; the Nirguna immobile and without qualities is another aspect of His existence. Ishwara is Brahman the the Reality, Self, Spirit, revealed as possessor, the enjoyer of his own self-existence, the creator of the Universe and one with it, Pantheos and yet Superior to it the Eternal, the Infinite, the Ineffable, the Divine Transcendence. "

## Pandit Madan Mohan Malaviya

( The Immanence of God, Page 41 )

" My devout prayer is that, guided by this divine light, all religious minded persons, after

refining and solidifying their knowledge and replenishing the store of their vigour and zeal, may propagate the truths underlying this creed and convince the whole world that God is one and only one, that in His essence He is present not only in all human beings but in all other animals, and plants, in other words, in human beings, beasts, birds and insects, moths, trees and plants alike, and that the best mode of worshipping Him is to feel the divine presence in all creatures, to be friendly with all and to wish all well. Let us all consolidate and propagate the divine energy by preaching the cult of Universal Love and diffusing this true Knowledge........"

## Mahatma Gandhi

( Young India, 8th March 1925 )

" We may all have different definitions for 'God'. If we could all give our own definitions of God, there would be as many definitions as there are men and women. But behind all that variety of definitions of God there would be also a certain sameness which would be unmistakable. For the root is one. ' God is that indefinable something which we all feel, but which we do not know...... To me God is Truth and Love; God is ethics and morality; God is fearlessness. God is the source of Light and Life, and yet He is above and beyond all

these. God is conscience. He is even the atheism of the atheist. For in His boundless Love, God permits the atheist to live."

## लोकमान्य टिळक

(थोर पुरुषांचीं चरित्रें)

"आपल्या हातून ज्या गोष्टी होण्यासारख्या आहेत त्या आपण कराव्यात आणि ईश्वरी साहाय्याची अपेक्षा करीत बसावें, हेंच प्रत्येक मनुष्याचें खरें कर्तव्य आहे व उद्योगी मनुष्यास ईश्वर साहाय्य करतो त्याचाहि खरा अर्थ हाच आहे. अमुक एका थोर मनुष्यास ईश्वरी अंश म्हटल्यानें इतर मनुष्यांच्या मनांतील उद्योगप्रवृत्तीची इच्छा नाहींशी होते हें म्हणणें अविचाराचें व कोत्या समजुतीचें आहे. ईश्वरी कृपेची अथवा साहाय्याची कोणत्याहि राष्ट्रास अभ्युदय होण्यास जरूरी आहे, या वाक्याचा खरा अर्थ येवढाच आहे कीं, मनुष्याच्या प्रयत्नांहून त्यास इतर गोष्टींची आवश्यकता असते. मनुष्यास मुळींच प्रयत्न करावयास नको असा त्याचा अर्थ होत नाहीं....राष्ट्रांत थोर पुरुष निपजणें हें ईश्वरी कृपेचें लक्षण आहे; व असे थोर पुरुष निपजले म्हणजे त्यांनीं काय केलें पाहिजे हें त्यांस सांगण्यास कोणी लागत नाहीं....ज्या गोष्टी ईश्वर कृपेनें व्हावयाच्या त्या ईश्वरकृपेनेंच व्हावयाच्या. परंतु पूर्वेतिहासावरून येवढी गोष्ट खास दिसून येते कीं, मनुष्य आपल्या उत्कर्षासाठीं प्रयत्न करूं लागला असतां त्यास ईश्वरी साहाय्य पुढें मागें मिळाल्याखेरीज राहत नाहीं."

८९४०

REFBK-0006150

सात्त्विक करमणूक आणि उच्च दर्जाचें वाङ्मय यासाठीं मासिक

# सह्याद्रि

राजकीय, वाङ्मयीन, शास्त्रीय, ऐतिहासिक, अित्यादि अनेक विषयांवर अधिकारी लेखकांनी अभ्यासयुक्त लिहिलेले लेख.

लघुकथा, लघुनिबंध, कविता, व्यंग्यचित्रें अशीं करमणुकीचीं विविध अंगें.

संचालक : न. चिं. केळकर,
५६८, नारायण पेठ, पुणें.

वार्षिक वर्गणी ३॥- रुपये.
किरकोळ अंकास ६ आणे.

कव्हर छपाई—डेक्कन प्रिंटिंग वर्क्स, पुणें शहर.